


# चंद्रहास

## स्फुट काव्यसंग्रह

कै. पांडुरंग सूर्यवंशी



परिचय-

कवी व लेखक कै.पांडुरंग सूर्यवंशी यांचा जन्म-२३जुलै १९२६रोजी वडगांव बेळगांव येथे झाला. कै. पांडुरंग सूर्यवंशी हे बेळगावचे सिद्धहस्त साहित्यिक आणि प्रतिभावान कवी होते .त्यांनी १९४८ते १९६५ या दरम्यान काही कविता ,एक खंडकाव्य, लघुनिबंध व नाटक लिहिले. त्यापैकी कथा व कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या पहिल्याच लघुकथेला पहिले बक्षिस मिळाले होते. त्यांच्या कविता अभिरुची आणि सत्यकथा या दर्जेदार मासिकातून अग्रक्रमाने प्रसिद्ध होत होत्या.' तुला कोणती आणु वानगी', 'माऊली', 'अभिसार 'या कविता 'अभिरुची'त गाजल्या होत्या .'वैशाखाचे स्वप्न' हे खंडकाव्य शार्दुलविक्रीडित या वृत्तात लिहून त्यांनी 'अभिरुची' कडे प्रसिद्धिसाठी पाठविले होते. परंतु अभिरुची मासिक बंद पडले आणि ते खंडकाव्य अप्रकाशित राहिले .या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे कै. माधव जुलियन यांच्या ' विरहतरंग' नंतरचे त्या वृत्तात लिहिलेले मराठीतील ते दुसरे खंडकाव्य होते आणि त्या खंडकाव्याचा विषय हा अखंड आसामच्या डोंगराळ भागातील जनतेविषयी होता. रा. स्व. संघाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि संघाच्या नित्य कार्यामुळे त्यांच्याकडून विपूल साहित्य रचना झाली नाही. मात्र रा.स्व. संघाशी बालपणापासून संबंध आल्यामुळे त्यांच्या विचारात आणि शब्दात भावोत्कटता,लयबद्धता गतिमानता ओज व तेज हे गुण प्रकर्षाने जाणवत होते..

त्यांचे शिक्षण चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज ,लॉ कॉलेज आणि बी. टी. कॉलेज इथे होऊन त्यांनी 'एम. ए .एलएलबी . बी.एड ' या पदव्या मिळवल्या होत्या. त्यानंतर चिंतामणराव हायस्कूल आणि नंतर सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. एक उत्तम व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नांव मिळविले होते.शिक्षक असतानाच वयाच्या ४० शीत ते दीर्घकाळ असाध्य व्याधीने आजारी पडले आणि किट्स , शेले , बालकवी यांच्याप्रमाणे साहित्यिक क्षेत्रात नाम कमावण्याची प्रतिभा असून सुद्धा सगळेच व्यर्थ गेले .साधारण साडेअकरा वर्षे ते अंथरुणाला खिळून होते.नंतर वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी म्हणजे ४एप्रिल १९७६ मध्ये ते वडगांव येथील आपल्या घरी निधन पावले.त्यामुळे त्यांचे सगळे साहित्य अप्रकाशित राहिले. कॉलेजमध्ये डॉक्टर ग्रामोपाध्ये , डाॅ.वि.म.कुलकर्णीआणि कविमित्र शांताराम रामचंद्र यांच्या सहवासात राहून त्यांनी वाङमय प्रकाश मंडळातर्फे' नवधारा 'हा प्राथमिक काव्यसंग्रह आचार्य अत्रे व ग.त्र्यं माडखोलकर यांच्या उपस्थितीत बेळगांवच्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध केला .या कविता संग्रहामध्ये देखील त्यांनी लिहिलेल्या चार ओळींची 'भाव कणिका' गाजली.

पांडुरंग सूर्यवंशी यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित लिहिलेले तीन अंकी नाटक 'माझा मराठाची बोलु' हे अप्रकाशित राहिले होते.ते 'वीरवाणी '१९९७ च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झालेले आहे."हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण लिहिले आहे "असे प्रसिद्ध कादंबरीकार 'ना. सि.फडके यांचा अभिप्राय असलेली टिपणी त्यांच्या हस्तलिखितावर आहे.हे नाटकही www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झाले आहे.

तसेच त्यांनी 'प्रक्षोभ' नावाचे १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यावर आधारित एक अभ्यासपूर्ण नाटक लिहिलेले आहे .ते दोन ऑगस्ट २०२२ रोजी www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झालेले आहे.
तसेच त्यांची अन्य दोन नाटकं "सोम्मा आणि गोम्या" व "झणझणीत अंजन " हीसुद्धा www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झाली आहेत.

या व्यतिरिक्त 'चंद्रहास'हा त्यांचा काव्यसंग्रह ही आजारपणामुळे अप्रकाशित राहिला.यामध्ये त्याकाळी प्रसिद्ध झालेल्या काही प्रकाशित कविता आहेत.व बाकीच्या अप्रकाशित कविता दोन्ही मिळून 'चंद्रहास 'काव्यसंग्रह प्रकाशित करत आहोत.वयाच्या २१/२२ व्या वर्षापासून त्यानी कविता केलेल्या दिसतात.

'हरपला पोलादी पुरुष ' ही कविता सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर त्यांच्या मृत्यूनंतर १८डिसे. १९५०साली 'प्रेरणा'

साप्ताहिकात प्रसिद्ध.

'अंदमानातून' ही कविता सावरकरांवर त्याना अंदमानातील तुरुंगात शिक्षा दिल्याबद्दल लिहालेली आहे. २६ एप्रिल १९४६ रोजी ' संधि ' प्रातिनिधिक कविता संग्रहात प्रकाशित.
तसेच इतर काही कविता - 'कोष आता फोडिला हा,' 'प्रवासी', 'स्वप्नामागें ', 'संभवते तरि का-'. ,'परि आज ' , 'हिंदोळ्यावरची आस',. 'त्या सुंदरतेस्तव फिरतो-', ' असे आमुचा हाच संसार गे' , 'उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं ', 'मानवता ', 'हीच वांछा खुळी! ', 'या रंगभूमिवर ', 'काजवेच!...काजवेच!!' , 'आरती ओवाळणे ही-,' 'मी हिन्दु. .....', ' माझा धर्म निराळा-', 'हा जीवनपथ ' , "मन,श्रद्धा,बुद्धी पुन्हा निराश्रित झाली!' , 'स्वप्नानी सखि निशा बहरली.' , तसेच 'भारताची भूपाळी ' या व अशा काही प्रकाशित कविता वेगवेगळ्या मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.आता एकुण १०० वर कविता चंद्रहास मासिकातून प्रसिद्ध व्हायच्या आहेत.त्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

तसेच वर उल्लेख केलेले ' वैशाखाचे स्वप्नं'हे खंडकाव्य शार्दुल-विक्रीडित या अक्षरगण वृत्तात लिहिलेले म्हणजेच चार ओळीचे एक कडवे व प्रत्येक ओळीत १९अक्षरे याप्रमाणे ३१६ कडवी असलेले हे खंडकाव्य 'अभिरुची' मासिकातून प्रसिद्ध होण्यासाठी दिले होते.त्याच्या प्रती तपासण्यासाठी आल्याही होत्या. पण 'अभिरुची'
बंद पडले.व आजारपणामुळे त्याकडे दुर्लक्ष झाले. तेही अप्रकाशित राहिले. तब्बल साडेअकरा वर्षे ते अंथरुणाला खिळून होते. तरीही जीवनाबद्धलची त्यांची निष्ठाच इतकी सुद्दढ होती की साडे ११वर्षे त्यांचा दुर्दम्य आशावाद कायम होता.आपण यातून बरे होऊन खूप काही करू ही उमेद होती.

'कवचकुंडले' नावाची लघुकथा अप्रकाशित आहे.
त्याचप्रमाणे एक ऐतिहासिक नाटक शिवाजी महाराजांवर लिहायला घेतले होते पण दुर्दैवाने ते अर्धवट राहिले आहे.त्याचप्रमाणै सोम्या आणि गोम्या नावाची विनोदी एकांकिका १६/८/१९५६ ला लिहिली आहे. ती अप्रकाशित आहे.ते जर आजारी पडले नसते तर आता एक नावाजलेले लेखक, नाटककार,कवि व कथाकार म्हणून चिरपरिचित असते.इथे नशिबानी त्यांना साथ दिली नाही असेच म्हणावे लागेल.

संपर्कासाठी पत्ता-
सौ.कुमुद्वती राजेंद्र भोसले
कोल्हापूर.
फोन नंबर-९९७०१०३३७८

चंद्रहास -कविता संग्रह
कै. पांडुरंग दे.सूर्यवंशी

## *हे वृक्षा*

*मी लिहिली कविता घेऊनिया त्यांचा ध्यास
ही पुष्पफले जणु लागलीत. हृदयास .
परि इच्छा असूनहि मज न ठरविता येती
ती स-रस ; नि-रस की ?आणि मग हे मन कढते
तू फळता वृक्षा, तुला कसे रे, होते?

---

१८ऑक्टोबर १९४७

---

**अनुक्रमणिका**

**अनुक्रमांक. कविता**

---

१). प्रवासी, उधळ आपुले हास्य !
२). स्वप्रामागे
३). संभवते तरि का-
४). अभिसार ?
५). तुला कोणती आणु वानगी
६). परि आज
७). हिंदोळ्यावरची आस
८). वैशाखातील स्वप्रे -
९). त्या सुंन्दरतेस्तव फिरतो-
१०). मी आणि तूं
११). असे आजचा हाच संसार गे!
१२). हे जिवित -
१३). तृप्ति न हो
१४). अन्दमानातून -
१५). कोश आता फाडिला हा
१६). उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं
१७). माउली!
१८). आता उंबऱ्यावरती
१९). अतीताची वाणी
२०). मानवता
२१) हीच वाञ्छा खुळी !
२२) या रंगभूमिवर -
२३). हे उज्वल जीवित -
२४). काजवेच !काजवे !!
२५). नैसर्गिक क्षण -
२६). पाणवठ्यावर
२७) प्रस्थान
२८). आरती ओवळणे ही -
२९). स्मृति
३०). हे पोट ?
३१). पृथ्वीचा प्रवास
३२). त्याग
३३). बंध हे तोडू नको
३४). जत्रा
३५). तूं
३६). चाले तपस्या
३७). तूं नाहिस सुंदर ?
३८) एकांत उठे खवळूनी !
३९). हो जीवना,थोर
४०). कसले अश्रू ?
४१). रे मेघा !
४२). मी हिंदु.......
४३). सूर्य, चंद्र आणि तारे

४४). या जीवन-मार्गावरती -
४५). तुझे गीत -
४६). हे मानव आम्ही -
४७). कवि आम्ही -
४८). नव्या मंदिरी -
४९). चल जगा -
५०). झुक् झुक् गाडी झुकुक् झुकुक् !
५१). स्वर चिरवांछित ते -
५२). तुझ्या पदांचा ठेका -
५३). चाहूल सुखाची -
५४). तुरुंगातली भाकर -
५५). गीत -
५६). एक संध्याकाळ -
५७). समर्थ असेल ती -
५८). मधुवेला ही -
५९). केळ वाढली जोमान !
६०). आज सतत मज गावे गमतें
६१). सापडलो मी व्यूही हो !
६२). रडणेहि एक लाजच !
६३). रंग लुटा हो !
६४). 'ठीक सारे' म्हणावे -
६५) तारुण्याच्या प्यार पांखरा ,!
६६) तरिहि भरे अजुनी न हस्त मम
६७) पर्जन्य त्याना गावयाला लावणार होता ! ६८) माझा धर्म निराळा -
६९) पतंग
७०) हरपला पोलादी पुरुष !
७१) माझ्या खिडकीतून -
७२) तू-मी मिळूनी -
७३). तुझेच कर भोवती माझिया -
७४) या जीवनाच्या सुंदरतेचा -
७५) भाव कणिका
७६). - हा जीवनपथ
७७). तुझिया या नयनांत-
७८) मन,श्रद्धा, बुद्धी पुन्हा निराश्रित झाली
७९) नसलाच मी पहिल्यापुनी
८०) आपण आता दोघे झालों !
८१) स्वप्नानी सखि,निशा बहरली !
८२) नटेन नवनव रूपीं ग
८३) या इथें टेकडीजवळी
८४) नित्यनूतन कविता सखी !
८५) अशाच एका गच्चीवरतीं -
८६). सहजीवन हे अपुले !
८७) अर्थ आज मज आकळलें !
८८) भारताची भूपाळी
८९) दगडू धोंडूची विद्यार्थीदशा -
९०) रंगलो माझ्या गावात
९१) कैदी
९२) मृदुल फूल आले

९३)   तुझ्या बाळलीला-
९४).   डोळ्यांना या सर्व लाभले-
९५).   नभी झेपावतो आहे-
९६).    स्मृति
९७).   हवेवर हेलावत आलेल्या पिसा
९८)    एक माझ्या कुंडीत आहे-
९९).   अशीच ये तू-
१००).  आत्मरक्षणी शक्ती अमुच्या-
१०१).  प्राणानो,घ्या पिउनी-
१०२).  नाजुक पातें-
१०३).   मी
१०४).  उगीच कोठे-
१०५).  अजून थोडा -
१०६).  असताना वर चंद्रमा
१०७).  रम्य रम्य ते मीलित जगणे
१०८).  अशाच एका सायंकाली-
१०९).   इच्छा
११०).   एक रात्र ती-
१११).   मी तुझ्याविण
११२).   काही कवी
११३).    स्वप्न
११४).   म्हणवितो मानव!
११५).  अरे, ते द्यायचे होते -
११६).   सांज टळताच–
११७).   क्षितिजाच्या पलिकडून –
११८).  –लोचन ओलावले!
११९)    तरीहि का—?
१२०).  तुझी थोरवी काय वर्णु मी?

### १). प्रवासी उधळ आपुले हास्य !

तू हास प्रवासी उधळ आपुले हास्य
का उगा कवळिशी नैराश्याचे दास्य ?

आयू हा अल्प असोनी
चालत निमिष चरणांनी !
क्षण एक जगशि  तर तेच समज सद्भाग्य;
तो दवडु नको क्षण व्यर्थ,चीज कर योग्य!

पाऊल पडे तव पहिले
परि तेच कुदैवे नडले!
या प्रथमाघाते जर इतुके नैराश्य ;
तर कसे अन् कधी आक्रमिशी आयुष्य?

जा पुढे पुढे रे ,पान्थ
कापीत चाल हा ध्वांत;
बघ तमामागचे तेजाचे सान्निध्य;
ते नाते राहिल कायमचेच अभेद्य!

दुःखद ना केवळ मार्ग
ना केवळ अथवा स्वर्ग
परि तेच खरे बघ जीवित;नाही अन्य!
चलआक्रम हासुनि मार्ग आणि हो धन्य!

कधि सुमने पडतिल हाती
कधि पडेल केवळ माती
गाजेल भोवती कधि प्रीतीचे राज्य
बरसेल आग वा,तरि न मार्ग तो त्याज्य!

घालवू नको क्षण पान्था
वाहू दे जीवन सरिता
घुमवित जाउ दे तिजला हे आरण्य;
रे, हिच्याच तीरी जग पिकविल धनधान्य!

कण-कण या विश्वामधला
नव-नव तेजे भरलेला;
त्यावरी फिरू दे, करांगुली तव दिव्य
उसळेल त्यातुनी शक्ति कदाचित् भव्य!

तू पायिक नव जगताचा
जग हे निधि उल्हासाचा !
तू जागविशी जर जपून तव औसुक्य!
भगवन्त तूच मग ,तुज काही न अशक्य

-------+-------

प्रकाशित. माधवपूर वडगांव
"रोहिणी". २०जुलै,१९४५.
दिवाळी अंक १९४८

---

## २) स्वप्नामागें

उगाच कुठल्या स्वप्नामागे
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?
खडकाळींतुनि खिदळत आली
निर्झरणी बघ तुझ्या पदतली!
अवहेलुनि तिज, सुधेमागुतीं
पळविशि आशा कां वेगवती
जोवरि आहे नीर प्रवासी,--
तहान घे शमवून तोवरी;तहान घे शमवून!
आटल्यावरी एकदा खुळ्या,--
मिळेल ना धुण्डून कदाचित् मिळेल ना धुण्डून!

उगाच कुठल्या स्वप्नामागें
बांधुन बसशी स्मृतिचे धागे?
फुले हासतीं तुझ्या भोवतीं
धुंद डोलुनी तुला बाहती!
तरीही झाकुन हृदय- कवाडे
जाशी कुठल्या सुगंधाकडे ?
जोवरि आहे गंध प्रवासी,----
खुशाल घे हुंगून तोवरी;खुशाल घे हुंगून!
झडल्यावरती धुंद पाकळ्या ----
जातिल कोमेजून प्रवासी; जातिल कोमेजून!
उगाच कुठल्या स्वप्नामागे
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?
प्रकाश नर्तत जागोजाग
आणण्या तुझ्या हृदया जाग !
अजूनी घेशी कशाला परी
पांघरूण हे तमाचे वरी ?
जोवरि आहे तेज प्रवासी --
हृदय घेइ उजळून तोवरी हृदय घेइ उजळून!

क्षितिजावरचे किरण लोपता --
दिसतिल ना परतून कदाचित् दिसतिल ना परतून

उगाच कुठल्या स्वप्नामागे
बांधून बसशी स्मृतिचे धागे ?
मूर्तिमन्त जे ते सोडुनिया
कल्पनेतले जाशी घ्याया !
चंद्रासाठी हट्ट कशाला,
स्वप्नामागे धाव कशाला ?
जोवरि आहे स्वप्न प्रवासी --
खुशाल जा रंगून ;तोवरी खुशाल जा रंगून!
स्वप्नान्ती चंद्रिका विसरुनी--
स्वागत कर हासून उषेचे स्वागत करत हासून!

-------------------------------------------------

माधवपूर वडगांव प्रकाशित
२१जुलै १९४५ वांग्मय-शोभा"
फेब्रुवारी १९४६

---

**३) संभवते तरि का -**

उधळिल्या गिरीशा प्रमत्त लाटा गगनी
गंभीर घुमविला नाद दिशांच्या कानी !
संभवते तरि का कधिकाळी होइन मी -
बुडबुडा क्षणाचा, जैसे जग हे मानी ?

ओंजळींत अपुल्या सुगंध उज्ज्वल भरुनी ,
निःश्वसितें माझी गेली हृदयामधुनी !
संभवते तरि का कधिकाळी होइन मी -
रानटी बगीचा ,जैसे जग हे मानी ?

उडविले विहंगम दशदिशास येथूनी,
गाइली तयांनी मंजुल मंगल गाणी !
संभवते तरि का कधिकाळी होइन मी -
घुबडांचे घरटे ,जैसे जग हे मानी ?

विंधिला तिमिर अन् त्रिभुवनास उजळोनी,
प्राचीस सजविली अनुपमेय लेण्यानी !
          संभवते तरिका कधिकाळी होइन मी -
काजवा क्षुद्र तो ,जैसे जग हे मानी ?

या अनंत विश्वामध्ये ध्वज नाचवुनी,
चमकलों स्वशौर्ये ; आली विश्वें नमुनी !
          संभवते तरि का कधिकाळी होईन मी -
जागृतीत बन्दी ,जैसे जग हे मानी ?

रे जगा आणिशी ज्ञानाचा का आव ?
तू अजुनी असशी अंड्यांमधला जीव !
          गर्वोक्ति नव्हे ,ही बडबड नच वा व्यर्थ -
की विराट ,नवनव रत्नांचा मी देव

-----------------------------------------+---

माधवपूर वडगाव.
७ ऑक्टोबर
१९४५ प्रकाशित
" नवधारा"-
प्रातिनिधिक काव्यसंग्रह

---

**४) अभिसार. ?**

तुषार्त मी मज तूंच निवविली !
ओठामधुनी तरारणारी
कौमार्यसुधा कुणि न प्राशिली ,
अन्तरात नित धगधगणारी
आग उराला कुणि न कवळिली,
नेत्रामधुनी झरझरणाऱ्या
धारा टिपल्या वरच्यावर नच,
उत्सुकलेल्या श्रवणांमधुनी
नर्तले न कधि मृदू, मधुर वच
रसरसलेले कोमल पल्लव
कुणी न गेला क्षणभर हुंगुन ,
चाल धुन्द ,कांपरी ,मनोहर
घेई हृदयी कुणी न कोरुन !

कारण एकच ,- फूल रानटी ! -
उघडी माझी नच मोहकता
सौंदर्याचा अभाव अवघा
झांकी उन्मादक प्रफुल्लता !
झुकला कल कुस्करण्या जीवित

अवचित येउन जळे वर्षिलीं
उभ्या जन्मिची - व्याकुळलेली -
तृषार्त मी मज तूच निवविली !
नूतन घडवुन जीवित माझे
अपूर्णतेला पूर्णता दिली ;
तेवढाच क्षण जिवन्त जगलें
ज्यात आंतली आग निमाली !

पुनरपि तू दिसलास ना , परी -
न्यूनता न मज भासे क्षणही !
क्षणातील त्या चाहूल तुझी
नवनव तेजे क्षणक्षण वाही !
अभिसार तया म्हणती ? म्हणू दे -
नागिणिना या विष ओकू दे ......
तडितेला आसूड ओढु दे ......
ज्वालामुखिचा स्फोट होऊ दे -
तुझ्या पावलांच्या दाट खुणा
इथे दाटल्या येता..... जाता
- स्मृतिचिन्हे ती - अश्रूंनी मम
सिंचिन ,न्हाणिन ,सदैव आता !

---------------------------------------------

माधवपूर वडगांव,. प्रकाशित:
४.नोव्हेंबर,१९४५. 'अभिरुचि'
ऑगष्ट १९४६.

---

**५) तुला कोणती आणु वानगी ?**

तुला कोणती आणु वानगी?

कविकुलगुरूच्या कवितेमधला
मधुर भाव आविष्कृत मननिय ,
प्रभातकालिन गायकांचिया
कंठोद्भव स्वरपंक्तीतिल लय,
अतुलनीयशा कलाकृतींतिल
सौंदर्याचा विलास रमणिय ,
मुग्ध कळ्यांतिल ,सुमनातिल वा
छटा मोहनिय नी हिमकांतिय,
हरिततृणातिल हिरवी -हिरवी
रंगसजावट नेत्रलोभनिय ,
उशी शिळेवर नित घेणाऱ्या
जळांतली वा चमक चांदणिय,

कोठुन आणू मी तुजसाठी ?
- दिधली तरि नच तुज स्वीकारणिय
दिव्ये ती बंधनी कलंकित ;
जोत्स्ना त्यांची आज धूलिमय !

तुला कोणती आणु वानगी

प्रहार प्राणांतिक वज्रांतिल ,
लवचिकता वा पोलादांतिल ,
कठिणपणा एका हिरकांतिल ,
विखारता वा हलाहलांतिल ,
जळजळाट वा उल्कांमधला ,
असह्य दाहहि अग्नीमधला ,
तिखटपणा वा पात्यांमधला ,
कणखर कात्यांची कृत माला ,
चिर दाव्याची वृत्ति अहिंतली ,
प्रखरता उभ्या किरणांमधली ,
तुफानता त्या सागरांतली ,
स्फोटकता जागृत जगांतली
कोठुन आणू मी तुजसाठी ?
-बोजड होतिल जरी आणिली !-
दास्याच्या निद्रेंत घोर तीं
बनुनि लुलीं,दुर्बळ,पेंगुळली!

तुला कोणती आणु वानगी ?-

कोमलतेची कींव करावी !
दाहकतेस्तव दया दाटते !!
मलाच अस्तित्व न ; बंदी मी !-
स्वामित्व कशावर मम येथे ?
अपूर्व जरि वानगी आणिली
उणेपणा तइं दिसेल भरला ;
बंधनात कोठुनी असावी
प्रगतिपथावर अंगची कला
तनू कोठली माझी देवी ?-
निसर्गतः हक्कच तिजवर तव !
रक्त, शब्द, अश्रू हृदयातिल
कोठुन माझे, हृदयच जर तव ?
आणिक आता काय वांच्छिसी ?
परदेशी मी एक या जगीं
कसे नि कोठे काय निर्मु मी
-तुला कोणती आणु वानगी ?

—--+----------------------------------------

माधवपूर वडगाव
४जानेवारी १९४६

प्रकाशित ;
"अभिरुची "
१९४७जानेवारी.

---

**६)-परि आज -**

---

दावानळ होता गिळित रान घोटांत
कोलाहल उठला त्यांतुन  दुबळा ,आर्त
ते दृश्य पाहुनी निर्विकार मुद्रेनें
मी पुनरपि झालो तोऱ्यांतच मार्गस्थ !

शमवुनी प्रथम मी तृषा पाहिले भोतीं
तों तीरावर कोळ्यांच्या दिसल्या पंक्ति
हासुनी निरखिल्या दुर्बळ त्या मासोळ्या
ज्या गळ तोडाया व्यर्थ लाविती शक्ति !

बेहोष,मत्त ढग दोन दिशांतुन येती
गर्जून चढविती हल्ले हल्यावरती
ती आश्रित त्यांची तडिता भंगुन गेली
करमणूक केली घटकाभर त्यावरती !

दलितांस रगडिती दाताखाली मत्त
असहायता रडे धाय मोकलुन तेथ
-जाणार काय मम काही होवो त्यांचे बघितली सुरक्षितता मी माझी फक्त

परी आज?- ऊर  हे  थबथबतें दुःखानें
ओठावर स्फरते करूण ,लाजरे गाणे
की हसलो नसतो जात्यांतिल दाण्यांनां
तर होते नच नरकाचे इतके देणे !

-------------------------

प्रकाशित माधवपूर वडगाव.
"सत्यकथा ". २३जानेवारी१९४६
एप्रिल,१९४६

---

## ७) हिन्दोळ्यावरची आस -

हिंदोळ्यावरची 'आस -परी'
अनुरक्त न अजुनी कुणावरी !

पंचमहाभूते भवतालीं
कर जोडुनियां उभीं राहिली
क्षणभर त्यांना उसन्त नुरली ;
संतुष्टता न परि हिच्या उरी
अजुनीही शोधिते कुणांतरी !

अनन्त जीवां सदा फसविते
निज पाशांनीं तयां ओढिते
लक्ष्मीही पदि लोळण घेते
परि पडली तिचिया न पंजरीं
नित मुक्त धावते वायूपरी !

जनझुंडी नित ज्याच्या दारीं
असे यश सदा उंबऱ्यावरीं
उभे घेउनी आरती करी
क्षितिजात तियेची दृष्टि परी
ढग भेदूनि जाई खगापरी !

सौख्यांची सुमशय्या केली ,
उशालगत चन्दन तनु जाळी,
धूसर चामर अपुला ढाळी !
अस्वास्थ्य हुंदडतं तरिहि उरी
ते तुफान जैसे सिंधुवरी !

हेममणीविभुषित पात्रांतून
सुधा चालली जरि ओसंडुन
- लालस रमणी देती आणुन
तरि निवली न तृषा तीळभरी
वाढते असीम नि परोपरी !

हिंदोळा ही पुढती- मागें
अस्मानावर चढवी वेगें
निकटी बसण्या प्रेमी अवघें
खालती ताटकळलेत, तरी -
अनुरक्त न त्यावर 'आस-परी' !

----------------------------

प्रकाशित. माधवपूर वडगाव.
"नवधारा". २६जानेवारी१९४६
प्रातिनिधिक काव्यसंग्रह

---

## ८).वैशाखातिल स्वप्ने -

---

**(१):-**

शीतल अन् उत्तेजक
वायू मूक हळुच डुले;
उघडतात वेलीवर
सुमनांचे हळु डोळे;
नीलाच्या कासारी
निवळीपरि अति अंधुक,
तेजाचे अति विशाल
उमले हळु कमळ एक;
पाहुनिया पूर्वेचे
लज्जान्वित लाल गाल,
कवण कोंबडा घाली
सांकेतिक साद,शीळ ;
--रम्य प्रभाती असल्या
दाट धुके दृग्-रोधक
तुझियाआणि माझ्यामधिं!
-- विरह तुझा हा दाहक!

**-:(२):-**

कोण कसा असशी तू
नाही मज तवओळख
आजीच्या गोष्टींतुन
नांव श्रवुनि तव ठाउक;
आणि तुझी तेजस्वी
कान्ति ,कीर्ति वरचेवर
सांगत आजी असता
आले हे भरुनि ऊर !
- भान नुरूनि केव्हा मी
तव ध्यानी रंगावे .......
आकृति तव पुसट तरी

चित्रिण्यांत गुंगावे !
आणि असे करताना
नित्याच्या व्यवहारी
सहज घडती किति प्रमाद
मोठाले हास्यकारि !

:-३:-

सागर हे सात भव्य
ओलांडुन येशि आज
अंतर उभयामध्यें
दाट धुक्याचेच आज !
ते वितळुनिया जाता
केवि मला तू दिसशिल ?
- स्वप्नांच्या कोशांतिल
प्रभूवर , तू ना असशिल ?
- लाटांनी कथिलेले
गूज तुझे कधि ऐकत
सागर -तीरी पुळणित
पडले तारे मोजित ;
स्थितिंत त्याच आणि कधी
गाढ समाधी लागुन
मिटलेल्या नयनांतुन
गेली स्वप्ने नाचुन :--

ृ :-४:-

की या तीरावरती
लागताच तंव पाउल,
पांचवीस पूजियल्या
खरबरीत कुडत्यांतिल
दगडावर अंथरल्या
वाकळितिल सुप्त शील;
चिंतेच्या काट्यानी
भरलेले भव्य भाल;
खंडीभर त्रासाने
गेलेले खोल गाल;
झालेसे मज दिसले
क्षणभरात उजळ ,उजळ:
आणि उभ्या जन्माचे
जळले दारिद्य अखिल.....

( पुढती आणिक सरके
स्वप्नांची चित्रमाळ

:-**५**:-

पडलेला भव्य देह
गारठुनी अचल जेथ
रडगाण्याला ज्याच्या
माशा देतात साथ ;
उदराची उंच भूक
खुरटुन ज्याची गेली
भव्यताहि आशेची
नियतीने चेंगरली ;
अन् ज्याचे अगतिक मन
काळाच्या  भोवऱ्यांत
फिरते गवतासमान
लीलेने अन् संतत ,--
त्यात शक्ति नव निर्मित
चैतन्ये नव ओतित
येताना तू दिसशी......
( तोहि स्वप्न- मणि सरकत )

**:- ६ -:**

एक वीत जागेवर
नभ- भेदी भिंतीतुन
जो जाई गुदमरून
पडलेला जो कोंडुन,
श्रमलेला तो जो तमांत
चांचपडुन, ठेचाळुन,
रुतलेलें पदि कंटक
सोशित जो नित कण्हून,--
त्यावरती प्रेमाने
कर फिरविशि हासत तू,
सांधितोस अन्  त्याचे
तुटके जीवित - तंतू :
भिंती त्या उधळुनिया
त्यास करी तव धरून
येताना तू दिसशी......
( उघडतात अन लोचन !)

- या परि अगणित, अविरत
दीर्घ दीर्घ तेजस्वी
स्वप्ने पडली मजला
सौख्यद जी सर्वस्वी !
एक तरी त्यांतिल का

प्रभुवर ,होईल खरे ;
ठरतिल का मूर्तीमन्त
स्वप्नातिल ते तारे ?
स्वप्नांची त्या मदिरा
दर्शनेच धुंद करी
निश्चित ना लाभेलच
एक तिचा बिंदु तरी ?
- उभयांमधि दंव तोंवरीं
तव स्वरूप नच कळणे
- तंवरच का सौख्यद ही
वैशाखातिल स्वप्ने ?

--------------------+-----------

माधवपूर वडगाव .
२४फेब्रुवारी १९४६.

---

**९) त्या सुंदरतेचे फिरतो. --**

ज्यातून निघे बाण अती तीक्ष्ण , विषारी,
निष्पाप जिवांचे रिघुनी ऊर विदारी
त्या क्रूर धनुष्यातिल छातीवर बाण
मी झेलियला हांसत, त्याची बघ खूण.
ज्याचा परि तो तीर -सुमांतीला पराग -
कंपीत करी या हृदयीचा अनुराग ;
काव्या भुवयांचे धनु ते लवविल कोणी-
त्या सुंदरतेस्तव फिरतो मी अनवाणी !

हा वायू उभा चामर ढाळीत उशास !
बन्दा अमुचा सेवक तो रात्र नि दिस,
अन् यास्तव त्याचे न मुळी मोल मनाला:
ना जीव निवे काहिलिने हा उललेला !
ज्यातून परी नाम घुमे केवळ माझे
माझ्या हृदयावर ज्यांचे राज्य विराजे
होईन सखे ,हर्षित त्या निश्वसितांनी -
त्या सुंदरतेस्तव फिरतो मी अनवाणी

छातीवर माला रुळते दिग्विजयाची
पाठीवर आदळती गौरव -वीची !
- ती माळ ,तथा गौरव, सन्मान जगात
लाभे केवळ न्हाउनि येता विजयात
-हे सत्य घटू की- बुडता जीवन -डोही
कोणीहि करी या नुसता हात न देई !

राहीलं परी माळ करांची तव राणी -
त्या सुंदरतेस्तव फिरतो मी अनवाणी !

दुर्लक्षुनि जे जीव भुके व्याकूळलेले -
रत्नाकर धुंडीत युगाचा पथ चाले
जे नीर,- तयाची मज गे येत शिसारी
ना त्यास्तव हा याचक आला तव दारी
पाऱ्यापरि प्रीती चमके ज्यात फुलून,
छाया मम ही ज्यात दिसे स्पष्ट खुलून
त्या चक्षुंतुनी हृदयाचे शिंपड पाणी
त्या सुंदरतेस्तव फिरतो मी अनवाणी !

---------+----------++-------

प्रकाशित. माधवपूर वडगाव.
"हंस". १५मार्च१९४६
मे,१९४७.

---

## १०). मी आणि तू

गवतामधुनी हिरव्या, हिरव्या
उषा- देविच्या कानामधल्या -
कुड्यांतले जे मोती झडले
ते मी वेचित, उधळित आलों !

तू परि वेगाने बाणासम
वादळास नित खेळविणाऱ्या -
अथांग जलधित सूर मारुनी
अद्‌भुत मोती वेचित येशी!

हंसापरि कलकल रव करतें
निळें नीर फेसाळत  हसतें
छाया त्यांतिल मम डुलणारी
बघत उभा मी निश्चल तीरी !

कभिन्न काळ्या फत्तरांतुनी
प्रखर तपस्या सतत खर्चुनी
निर्मिलेस तू निर्झर शीतल
तरि न निरखिले रूप त्यात तूं!

मऊ बिछानी ऊब मिळाली
उरास ती मी गाढ कवळिली
उषःकालच्या उबेस्तव कधीं
तळमळलो वा नच हळहळलो!

मैदानातुन परन्तु उघड्या
वाऱ्यामधुनी गोठविणाऱ्या
सतत धांवत ,आशा जाळित
ऊब निर्मिली तुवां भोंवती

कारंजाचे हे माझे जल;
मेघाची का सर मज येईल?
शब्दांचा मम शोक सदाचा;
कुठे स्त्रोत तो तव अश्रूंचा !
मिणमिणती ही माझी पणती
कुठे तुझी रविमाला जळती !
निर्जिव केवळ सृष्टी माझी
टवटवी तुझ्या जगात ताजी !
मोरपिसावरचा मम डोळा
त्रिनेत्र तू ; तव नयनी ज्वाळा !
माझी ही तर निर्जिव काव्ये

तुझी कृतीचीं जिवंत काव्ये !
बसुनी तीरी अलिकडच्या मी
खडे टाकुनी लहरी निर्मी
पोहत ,पोहत प्रवाहांत
सहज जिंकिशी विराट उर्मि !
-----------+--------

माधवपूर वडगाव
१०मार्च १९४६.

---

**११).असे आमुचा हाच संसार गे!**

---

सुखनैव का कुस्करी मी करांनी शिरोधार्य जें पुष्प तूं अर्पिले ?
सभोवार तूं ऊदही घालता काय मीहूनि तो टाळितो प्रेमले?
स्वयंप्रेरणेनेच का नेत्र झांकी तुझे भाव नेत्रांतले पाहुनी ?
तुझ्या चाहुली ऐकुनी स्वेच्छया का वळे मागुतीं आज मार्गातूनी ?

प्रयासे महा मार्ग स्वीकारिता हा तुझे दीर्घ नि:श्वास मी ऐकतो
क्षणी श्वास माझे जडावून जाती गळा रुद्ध होवोनिया राहतो!
दिशेने तुझ्या वायु वेगांत येई तुझे घेऊनी उष्ण अश्रू- कण
इथे तिष्ठतो आणि मार्गात माझ्या मला अर्पिण्या प्रीतिचे ते धन !
तुझा केशसंभार हो मुक्त शोकें,- जिवा केस अन् केस तो ओढितो
उरांतील धागा नि धागा परन्तु पुढे ध्येय खेचावया लांबतो !
तुझ्या दोन नेत्रांतले बाष्पमोती गळोनी कपोली तुझ्या वाळती
परी ते टिपाया भितो !- आग ओठी असे ;तींत ते गाल कोमेजती !
तुझे रेशमी हात पाहून होई मना मोह लावावया लोचना ;
परी ना धजे मी धरु ते !-इथे हात हे कंटकाकीर्ण माझेच ना !

नको शाप देऊस तूं या प्रवाशा ; तुझा शाप होईल आशिर्वच!
नको दूषणे क्षुब्ध होवोनि लावूं ,मला भूषणे होत ती सर्वच !
"करां गुंफुनी पाहु छाया सलीली" -तुझी आस स्वप्नावरी या जगे
पुढे झेप घ्यावीच ध्येयाप्रती मी ,– असे आमुचा हाच संसार गे!
---------------------------------

माधवपुर वडगाव　　　　प्रकाशित
७ एप्रिल १९४६.　　　　'रसना 'मासिक

---

## १२.). हे जिवीत-

उठलेली खवळुनि क्रुद्ध भूक पोटांत
पडलेले होते जवळ आयते प्रेत
परि तिकडे केवळ दृष्टिक्षेपहि न करता .
शार्दूल हिण्डतो धुंण्डित ताजे रक्त !

जळफळुन ओढिते तृषा जिभेला आंत
खळखळत खिदळतो घळीघळीतुन स्त्रोत
तरि तिकडे नुसता दृष्टिक्षेपहि न करता
हा चातक बघतो नभ- जलदांची वाट !

मानवता वधुनी राज्य- तृषेच्या पुढतीं
सैतानी जग हे फेर धरी तीभवतीं
या अशा युगांतहि बसतो भारत माझा
विश्वसुनी गीतेतील अहिंसेवरती !

जग - रहाटी करू पाही त्यावर मात
परि नमेल का कधिं तिजपुढतीं भगवन्त !
हे जीवित अथवा जिवन्त जगणे हे, कीं -
राहणे चिरंतन धरुनी उज्वल तत्व !

बरसले कधीं जर पीयूषहि वरतून
तर केवळ तिकडे पाहुनि उपहासून -
स्वातिचाच धरुनी थेंब शिंपला मिटतो
अन् तरीच मोती होत तिथे निर्माण !

------------------

माधवपूर वडगाव
१८ एप्रिल१९४६.

---

## १३.) तृप्ति न हो -

तृप्ती न हो ,अवघे -
निळसर मेघ फुले.

राहवें न आता
पाझर फोडावें

धन्यता न वाटे
चंद्रकोर खेची

यापुढे गुलाब हुंगून
वाटती द्यावी कुस्करून!

कालवे काढित सरितेला
वाटते फत्तरांत काळ्या

सोडण्यां होडी दर्यांत
दृष्टिला असीम गगनात!

विहंगमाची या निवे हुर्हुर न राईंत
कल्पवृक्ष नाचे अहर्निश आता नयनात!

या न किनाऱ्याची बंधने साहवती आतां
क्षितिजहि उल्लंघू. पाहते ही जीवन -सरिता!

रमे न ही जिव्हा यापुढे गीत घुमविण्यांत
विराट विश्वच हे घोळवू पाही वदनात !

जग हे तर आहे. संकुचित माझे माहेर
अजुनि जावयाचे थाटण्या विशाल संसार !

-------------------

माधवपुर वडगाव .
२५एप्रिल १९४६.

---

## १४.)अंदमानातून -

विझविलीत पणती. परि कुणा आता भय त्याचे ?
असंख्य हृदयी या दीप हे फुलत्या निष्ठेचे !

कोंडिलेत माझ्या बांधवापासुन मज दूर
मीलन झालेले कधिच परि हृदयाहृदयांचे !

घातलेत टाके माझिया ओठां तारेचे
परि हृदया न्यारे ओठ हे असती वज्राचे !

जखडिलेत कर हे घालुनी सर्पानो ,विळखे
गगन कवळणारे. निराळे कर पण हृदयाचे !

रोधिलेत पद हे शृंखला अवजड घालून
परि पद हृदयाला आगळे ध्येयपथावरचे !

फोडिलेत डोळे ढोसुनी लाल लाल सळई
परि हृदयां तिसरा नेत्र जो आगर ज्वालांचे !

अरे भेकडांनो , गाढिता मजला बर्फांत
थेंब ,थेंब शिजती हृदीं या परन्तु रक्ताचे !

----------------------

माधवपूर वडगाव
२६एप्रिल,१९४६ प्रकाशित
" संधी"
प्रातिनिधिक कवितासंग्रह

---

## १५. कोष आता फाडिला हा -

कोश आता फाडीला हा, - पंख आले कांचनी
पंख हा एकेक घेई विश्वराशी वाहुनी !

फाटुनी हे नील वेगे कोसळे आता जरी -
पंख हे त्यां लीलया घेतील अग्रीं झेलुनी !

पंख हे , - ब्रह्मांड राही यामधें सामावुनी
ठेविती हे दाबुनी ही भंगणारी मेदिनी!

कोश आता फाडिला हा , - कोण आम्हा आवरी ?
झापंणे आता अनन्ती सागरांना प्राशुनी !

दिव्य दृष्टी फेकणे ही अमृताच्या आलयीं
- कुंभ अन् घेऊन येणे तिक्ष्ण या चोचीतुनी !
दीर्घ फुत्कारे विखारी धार सोडी भूवरी -
कालिया तो पिंजणे या राक्षसी पंजातुनी!

कोष आता फाडिला हा, तेजरत्ने उज्वल -
धुण्डणे अश्रान्त ,कल्पान्तींहि अन् रात्रंदिनी !

---------+-++-

माधवपूर वडगाव
२८ एप्रिल १९४६.

प्रकाशित
"प्रसाद"
ऑगष्ट १९४८.

---

## १६. उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं --

पृष्ठी निर्जिव शांति नको वा क्षुब्ध नको वादळें !
तीरावरच्या रोपांना या देतिल जीवन हळू
नाचु द्या तुषार ते मोकळे !

गाढ तम नको, नकोच तेजहि असह्य जे लोचना !
प्रभात - ताऱ्यासवे कुजबुजत ओतिति नव जागृति
फुलो त्या पहाटेतल्या खुणा !

वावटळीसह नको नर्तणे; नकोच नभ चुंबिणे !
मेघातुनि या मुरदाडपणे घुसुनि अखिल पोकळी
निनादे अतां सतत भारणे !

शापभ्रष्ट ते नकोच विष ,वा चषकांतिल  अमृत !
   झळा आगिच्या पदी, हिमाची शीतलता या  शिरी
      यातुनी जावो जीवित -पथ !

नको राक्षसी वृत्ति स्वप्नवत ,नकोच ईश्वरकळा
   असो उरी या अतां एक तो मांगल्याचा निधी
      फुलुनिया मानवतेचा कळा !

कुठल्याही एकाच ध्रुवावर नको मुळी लोंबणे
   उभय ध्रुवांच्या मध्यावरती लगाम घेऊनि करी
      यापुढे ध्रुव ते सांभाळणे !
---------------------+---

माधवपूर वडगाव                    प्रकाशित
१०मे १९४६.                       "प्रसाद"
                              सप्टेबर१९४९

---

## १७.  माउली !

तुझीच लोचनांत या विशाल मूर्ति साठली ,
तुझेच नाम पाझरे जिभेमधून, माऊली !

तुझेच धैर्य ,स्थैर्य या गिरीगिरीत कोन्दले ,
तुझ्या  उरांतले तुफान सागरांत बिंबले !
तुझेच दिव्य तेज त्या नवग्रहात झळ् झळे ,
तुझ्या उदारतेमुळे असीम नील लाजले !
तुझ्याचसाठि तारका कधीकधी तुटे, जळे,
तुझ्याचसाठि रक्त या नसानसात सळ् सळे !
तुझीच गाढ ओढ हा उभार उंच लंघवी ,
तुझीच स्निग्ध प्रीति या दरीत खोल चालवी !

तुझ्या करांत बांधणे अता सुवर्ण -कंकण
 क्षितीजपार फेकणे तुझ्या उरातलें रण !
---------±+---------
माधवपूर वडगाव.                  प्रकाशित
जून१९४६.                      "अभिरुचि"
                           सप्टेंबर, १९४८.

---

## १८.) आता उंबऱ्यावरती --

उंबऱ्याच्या बाहेर ही
दृष्टि हो विशाल ,स्वैर
उंबऱ्याच्या आंत होती
डोळे पाणावून स्थिर .

उंबऱ्याच्या बाहेर ही
' थोर आईची' दुर्दशा
उंबऱ्याच्या आंत आई
तुझी डोळ्यापुढे दशा .

उंबऱ्याच्या बाहेर हें
हृदय हो लाही, लाही
उंबऱ्याच्या आंत तेच
पाणी पाणी होई आई !

उंबऱ्याच्या बाहेर ये
धार उरास विषाची
उंबऱ्याच्या आंत आई
त्यांस माया अमृताची.

उंबऱ्याच्या बाहेर ये
क्रौर्य सिंहाचे डोळ्यात
उंबऱ्याच्या आत आई ,
करुणार्द्र तेज शान्त .

उंबऱ्याच्या बाहेर मी
घेतो गरुड - भरारी
उंबऱ्याच्या आंत आई
लोळे तुझ्या पायांवरी .

उंबऱ्याच्या बाहेर मी
जग विराट व्यापितो
उंबऱ्याच्या आंत आई,
तुझ्या जगी संकोचतो .

उंबऱ्याच्या बाहेर ही
स्मृति  तुझी कांही नुरे
उंबऱ्याच्या आंत येतां
सर्व बाह्य जग विरे

उंबऱ्याच्या बाहेरची
आई करू वाटे मुक्त
परि उंबऱ्याच्या आंत
व्हावया तू नको मुक्त -

- भीती हीच मनी दाटे
उंबऱ्याच्या बाहेर गे.....
उंबऱ्याच्या आंत येता
थोर आई खिन्न हो गे.

उंबऱ्याच्या बाहेर ही
आई थोरली बेजार
उंबऱ्याच्या आत आई
तुझे कृश हे शरीर .

उंबऱ्याच्या बाहेरचे
कार्य मज बोलाविते
उंबराच्या आत दुजे
एक कर्तव्य लोळते

उंबराच्या बाहेर जे
एक मन उल्हासते
उंबऱ्याच्या आंत तेच
कोमेजते....खिन्न होते

उंबऱ्याच्या बाहेर जे
एक मन कोमेजते
उंबऱ्याच्या आंत तेच
उल्हसते ,उमलते .

-दोन मनांचे हे युद्ध
कर्तव्ये दो पारजून
कधी संपणार रण ?
कधी थांबणार  रण ?
--------------------+-------
माधवपूर वडगाव
११जुलै,१९४६.

---

**१९)अतीताची वाणी**

---

ओढिती धरुनिया पदरां मातु:श्रीच्या
तरि स्वस्थ बघुनि मज ; रिघते श्रवणी वाचा :
' हा डोळस असुनी अंधळ्याहुनी अंध !
- का घेत न चेवुनि घोट नरडिचा त्यांच्या ? '

बालके उडवुनी माझी अवकाशांत
झेलिती संगिनीवरती ; तरि मी स्वस्थ :
' हा जागा ; परि निद्रिस्ताहुनि निद्रिस्त !
का दर्यापरि हा खवळतसे नच ?हन्त ! '

शिरिं वज्राचे अति निर्दय पडती घाव
मी शून्य तरिहि ! .....ये शाब्दिक श्रवणी घाव
' या वाचा असुनी मुकाहुनि हा मूक !
- का मेघापरि हा गर्जून दावी भाव ?'

चहूंकडूंनी वणवा सर्पापरि सरपटतो .......
तरि स्वस्थ बघूनि मज शब्द दुरुनी येतो :
' या आत्मा असुनी प्रेताहुनि हा प्रेत !
- का त्यात व्यर्थ हा जळून जाऊ बघतो ?'

हे त्रस्त समंधा ! शब्द जरा तव रोखी
ये विपर्यस्त मम वर्णनही लंव झांकी
-तुजहुनी प्रभावी अतीत !उज्वल त्याचीं -
नित रेंगाळे मम श्रवणीं ही वाणी की, -

' कधिंकधीं रणांतून ढालं फेकुनी पळणे !'
' कधिं अंग रगडते आहे खासें,- म्हणणे !'
' कधिंकधी एकशे एक गुन्हे अति घोर
होण्याची पाहत वाट स्थिरमने बसणें !'

---------------------------------
माधवपुर वडगाव .
१३डिसेंबर १९४६

---

## २०) मानवता

जरि  गोडी मज चंद्राच्या शीतलतेची
तरि नको केविं म्हणु दीप्ति प्रखर सूर्याची
- पांगळे न का मम  जीवित एकाविणही ?
शीतोष्णतेत त्या बीजे जीवित्वाची !

कुणि स्तोम माजवो मासा फक्त जळाचें
वा इन्धन स्वागत करो फक्त ठिणगीचे
पांगळे परी मम जीवित एकाविणही......
तडिता अन् जळ हे लेणें घनराणीचे !

क्रान्तीची गावो कुणि केवळ तीं गाणीं
शान्तीची केवळ करो कुणी आळवणी.
पांगळे परी मम जीवित एकाविणही......
ती क्रान्ती -शान्ति हे घुंगुर माझ्या चरणी !

- ही मानवता मी ; शामक अन दाहक मी
नच राक्षसी तशी देवता न केवळ मी ;
मी पियूशाचें आणि विषाचे धागे -
एकत्र विणूनिया वस्त्र नेसते नामी !

--------------------------------

माधवपुर वडगाव                    प्रकाशित
१४ सप्टेंबर १९४६.              " मंदार "
सप्टेंबर  ,ऑक्टोबर.
दिवाळी व साहित्य विषैषांक १९४६.

---

## २१) हिच वाञ्छा खुळी !

जेथ  ही गांजली- पिंजलेली मनें
जागती रात्र बेचैन शैय्येवरी ,
तेथ माझ्या प्रभो,  अन्तराची अतां
एकतारी जरा छेड मंदस्वरी !

जेथ व्याकुळले,कष्टले, भागले
जीव हे आर्त झाले तृषा लागुनी ,
तेथ माझ्या प्रभो, अन्तराचा अतां
कुंभ हा रिक्त होवोच सारा झणी  !

जेथ हो  कोंडमारा चहूबाजूनी
गुदमरूनी कढे ,आंत आत्मा उले

तेथे माझ्या प्रभो , अन्तराच्या आता
विंझणें घाल वारे जरा मोकळे !

जेथ स्वातंत्र्य - गीते नभीं नादतीं
आणि समृद्ध हो धुलि ही तापली
तेथे माझ्या प्रभो,अन्तराचे अता
सूरही स्वैर नादोत ऊर्जस्वली !

जेथ ध्येयाप्रती धांवता धांवता
धैर्यशाली चढे शीर्ष मानी सुळीं
तेथ माझ्या प्रभो , अन्तराचे अता
पुष्प फेकून दे पाकळी पाकळी !

जेथ अंधार जाळीत ,जाळीत ही
रत्नदीपावली दाखवीते पथ
तेथे माझ्या प्रभो अन्तराची अता
वात ही पेटु दे आचराया तप !

जेथ तू गुंफिशी आणि माला प्रभो,
वेचुनी ही फुले देशभक्तांतलीं
तेथ घे माझिया अंतराचा ,सख्या ,
अल्प धागा ,असे हीच वांच्या खुळी
------------------------------------
माधवपुर वडगाव. प्रकाशित
१८ सप्टेंबर १९४६ -२० मार्च १९४७ "अभिनव"
. दिवाळी पुष्प,१९५०

---

**२२) या रंगभूमिवर -**

या रंगभूमिवर जगताच्या अतिभव्य
हे अविरत चाले अगम्य नाटक -काव्य !
नच आदि - अन्तही कुणा नटाला ठावा ,
परि चराचर इथे अवचित अवतरतात
अन् कामे करून अपापली जातात !

जंव दिवसाचा हा पडदा हळुहळु सरतो ,
जंव रात्रीचा हा पडदा हळुहळु पडतो ,
तंव रंगभूमिवर प्रेक्षक - ग्रहताऱ्यांनो ,
उधळितां कशास्तव उल्कांची पुष्पे ती ?
अभिनये कुणाच्या खुलती तुमच्या वृत्ती ?

फलकावर केवळ शिंतोडे रंगाचे ,
सौंदर्य का तिथे प्रतीत हो चित्राचे ?
बेसूर ,कर्णकटु स्वर मंजुळ ,लयबद्ध

एकत्र ऐकता गमते का संगीत ?
मग हर्षित होते केवि अपुले चित्त

या जगतावर ,या रंगभूमिवर ,इकडे
दारिद्य मूर्त कंगाल कुटींतुन उघडे
परि तिकडे निकटिंच अलंकारिले, सुस्त
वक्षःस्थल उन्नत उघडे श्रीमन्तीचें
उन्मत्त त्यावरी धुन्द झिंगुनी नाचें

पथ कांटे ल्याला तरी कर्म हे चाले
पथ सुमने ल्याला तरि कर्तव्य न हाले
हे उफराटे जग ! द्वैत इथे हे जन्मे !
या ऊर फाटक्या क्लेषे शान्त रहाणे,
अन् सौख्याचें नित चाले नकली रडणे !

हे जग, इकडे हे भीषण रण धुसमुसते,
शोणीत - पिपासू रणचंडी थयथयते,
अन् आगीचा कर फिरवित सृष्टीभवती
अतिक्रूर, भयानक, विकट हास्य उधळीत
निष्पाप बळींचे लावी भाली रक्त!

हे हिडीस असलें नाटक सैतानांचे
अभिरुचीस तुमच्या कधि नच उतरायाचे
मग उल्का का हो अशा उधळिता मुक्त
-हा ! असाल उधळित काही तपस्व्यांवरती
जे मानवतेस्तव लढती ,मरती .जगती !!

---

माधवपुर वडगाव प्रकाशित
२९ सप्टेंबर १९४६ "अभिरुचि"फेब्रुवारी १९४८

---

## २३). हे उज्ज्वल जीवित -

कधि पडतिल कानी अन्तरभेदक बोल ,
कधि खाजुकल्यांची (खाजकुयरीची )पडेल कंठी माळ !
कधि अपमानाचें तोंड सकाळिच बघणें
कधि नैराश्याचे मांजर आडवे येणे !
कधि दुःखाची ही घूक करिल घूत्कार
दुर्दैव विखारी सोडिल कधि फूत्कार!
कधि सुडाच्या त्या भालूंची ओरडणी -
चाहूलहि येइल कधि द्वेषांची श्रवणी !
लोळेल पथावर कधि आगीचा लोळ

कधि दुभंगेल पदतली धरेचा गोल !
कधि तडितेचे ते तीक्ष्ण खड्ग सळसळतें
लटकेल शिरावर लववित चळवळ पाते !
- हे आकाशाचे स्थंडिल उपडे वरतीं
उल्कांची होइल त्यातुन अविरत वृष्टि !
दिशादिशांतुनी शर येतिल वक्षावरतीं
कधि वावटळीसम गरगरतील सभोंती ;
अन् पिंजूनिया अंगांग करूनिया चूर
कापूस उडवतिल मांसाचे चौफेर !

त्या न्यायनीतिच्या भग्न देवळांमधुनी
परतणे कधि तुला हताश अति होवोनी
कधि घोर ,भयंकर, पापी तृष्णेपुढती
सद्‌वृत्ते ,तुजशिच करिल बळी ही नियती !
किति भेसुर स्वप्ने रोज पहाटे पडती
कितिकांची येते व्यवहारात प्रचीति -
तरि सहनशीलतेच्या निकषी तू मात्र
घासुनी गुन्हे ते ठरविशी क्षमापात्र !........

लाभू दे ,न लाभो वैभवशाली जगणे
लाभो न ,लाभू दे असामान्य ती मरणे ;
- हे उज्वल जीवित : क्षमाशील नित असणे
अक्षम्य गुन्ह्याचा कस लागेतो सहणे !!
-------------------------------------
माधवपुर -वडगाव ,
५ ऑक्टोबर १९४६.

---

## २४) काजवेच!......काजवेच !!

शिरतां हळुहळु अवनी
तिमिराच्या कोटरांत
कसले हे तेज:कण
तीभंवती नर्ततात ?

संध्येचे का तांबुस ,
भव्य पुष्प कोमेजुन
झडलेले हे पराग
नाचतात वाऱ्यातुन ?

वा जळ नभगंगेचें
कोसळता क्षितिजावर
उडती का हे तुषार
चमचमुनी वसुधेवर ?

( पाहुनी हे रम्य दृश्य
मोद नयनि नाचावा
लाभावी आणि सतत
चैतन्यें क्लान्त जिवा
परि वाढे भीषणता
क्षणिक अल्प तेजाने ,
उल्हासहि हो मलूल
कोमेजुनि हृद्‌पर्णे !)

मग का हे काळाचे
असति सुळे तेजस्वी ?
धडपडतो जो गिळण्या
मानवता सर्वस्वी ?

दास्याच्या वा गळ्यांत
सळसळती जे भुजंग
शीर्षातुन मणि काढुन
धुंडितात का ते जग ?

शांतीचे कांचपात्र
फोडुनि वा जगताने
उधळियले त्याचे का
कण हे बेहोषपणे ?

वा अपुल्या आईचें
स्मरुनी का गतवैभव
नयनांतुन तारांच्या
गळते हे अश्रू - विभव ?

वा छिलतां कोहिनूर
उडले जे कण वातीं
शोध काय जननीचा
करित ,करित ते येती ?

देशास्तव जे मेले
त्यांचे वा पुण्यात्मे
मातृभूमि त्यजवेना
रेंगाळति म्हणुन इथे ?

अथवा जी गांजणूक
जी झाली पिळवणूक
जी अवरून धरलेली
उदरी नित क्रुद्ध भूक -

- आग तीच काय धुमे
धरणीच्या भग्न उरी
आणि तिच्या का उडती
ठिणग्या या सूचक वरि -

की ,येईल मत्तानो,
- क्षण ; निश्चित येईलच !
चमकतील दृष्टिपुढे
काजवेच ! ........काजवेच !!

----------------------------------

माधवपूर वडगाव प्रकाशित
?.१९४५- ऑक्टोबर १९४६ "सत्यकथा"मे१९४७.

---

**२५).नैसर्गिक क्षण -**

नैसर्गिक क्षण , क्षण तरि जगलो -
आकाशाच्या या पेल्यांतुन
मेघांचा ये फेस फसफसुन
- मयूर मी - ध्वनि त्याचा ऐकुन
सहज नर्तलो ; रंगी रंगलो !
नैसर्गिक क्षण , क्षण तरि जगलों!
धवल मुलामा तमास चढवित
हिमांशु हंसरा ये जग हंसवित
- सागर मी - अति होऊन हर्षित
सहज उसळलो ; रंगी रंगलो !
नैसर्गिक क्षण ;क्षण तरि जगलो !
प्रभाकराचे जरतारी कर
करिति गुदगुल्या मम ओठावर
- कम्बळ मी- ते साहूं कुठवर ?
सहज उमललो ; रंगि रंगलो
नैसर्गिक क्षण ,क्षण तरि जगलो !
लाल लाल तव मादकतेची
अनिर्बंध रग अंगांगीची
यौवनांत मज खुणवी साची
- सहज गुंतलो ; रंगी रंगलो !
नैसर्गिक क्षण ,क्षण तरि जगलो !

- आणि सखे, जइं आज पांगलों
अयोग्य पथ - जग म्हणे- चाललो!
विसरू जग ते !-आम्हि न चुकलो !
यौवनसुलभच आपण जगलो
नैसर्गिक क्षण, क्षण तरि जगलो!

----------------------------

माधवपूर वडगाव.१३ऑक्टोबर,१९४६.

**२६) पाणवठ्यावर -**

---

' पाणवठ्यावर कसा करांतिल फुटला घट पडुनी ? '

' - सौभाग्याचा मंगल कुंकुम
लावी भाळी नुक्ता पश्चिम ,
क्षण तो होता आयुष्यातिल सुवर्ण - कण बाई ;

काळाच्या परि विष - नयनांते
साहवले नच भाग्य तिचे ते
निष्ठुरतेने तिचा तिलक तो हिरावून नेई !

चराचराच्या आणिक छाया
प्राचीला हळुहळु बिलगाया
अनन्तात अन् विलीन व्हाया बघती लवलाही !

गर्द ,गर्द त्या वेळुबनातुन
उनाड वारा क्षणक्षण थांबुन,
पुन्हा चाळवित सुप्त नव्हाळी चोरशीळ घाली !

पंख आपुले सान पसरूनी
बाल - जिवावर जीव जडवुनी
थवा द्विजांचा पोहत ,पोहत एक -एक येई !

ब्रम्हांडाची पुराण गिरणी
सरूं करितसे रजनी - राणी
धूर हळु भरे भंवती : चीजा तारांच्या बनवी !

पटपट उघडुन नेत्र दिव्यांचे
पडदे ओढुन दाट धुक्यांचे
दूर झोपड्या मोजित होत्या दुःखाच्या राशी !

दूर कुठेशी तरुशिखरावर
झाली किलबिल ,-मंजुळ मर्मर .......
आठवली क्षणि अगम्य मजला बाळाची बोली

एकटीच मी पाणवट्यावर !
घडा घेतला भरून भराभर.......
बुडबुड त्याचा शब्दहि गेला दूर , ,.....करूनि घाई

क्षणिच तेधवा आले तिकडुन
तेजस्वी शर दोन नयनांतुन
क्षणात झाले हृदयपार ते अवेळीच अगदी !

बाण फेकुनी अतीव कोमल
  मदन करी हे सावज विव्हल
  मजवर त्याची अकारणच ती दृष्टि वळे  बाई !

परन्तु झाले मंत्रमुग्ध मी
प्रणय दुणावे पुसटशा तमीं
विकारवश मी ! लहर उरी या उसळुनिया आली !

क्षणात अन् मी सहज थबकले
घटांतले तइं जळ डचमळले ......
अंगांगहि हे फुलुनी ,......उलुनी,..., रोमांचित होई!

काय रूप ते ! चन्द्र कोठला
आवस असता कसा  उदेला ?
कवणास्तव अन् भूवरि आला ?-तेजस्वी कान्ति !

- फूल जवळच्या वेलीवरले
  त्याने खुडिले , क्षण हुंगियले.......
  प्रीतिचिन्ह ते म्हणुनी देइल गमले या हाती !

हाय !हुंगिले; परन्तु फेकुन
निर्दयतेने चुरून ,चुरगळुन
पावलेहि ती तडित् गतीने दूर, दूर गेली !

पुन्हा कुठेशी तरूशिखरावर
झाली किलबिल , - मंजुळ मर्मर.....
आठवली क्षणि अगम्य मजला बाळाची बोली !

भानावर मी क्षणांत आले
चुरगळण्यातिल अर्थ कळाले !
-  कर जुळले ती आकृति धूसर पाठमोरि बघुनी !
- करातिल फुटला घट पडुनी !
-----------------------------------
माधवपूर वडगाव,
३० ऑक्टोबर १९४६.

---

**२७) प्रस्थान -**

गर्वांत दण्ड जे गात , तुटुनि ते जात , - खुले पद झाले
चरणांत येत सामर्थ्य,-अखिल भुवनांत अतुलनिय झाले!
प्रस्थान यापुढे अपुलें........

पद जरा दणकतां , धरा बसुनि हादरा , थरारा हाले
नीलांत उडवितां लाथ , तेज - गोलात भीति अति उसळे
पाऊल दडपिता , खोल खोल पाताळ रुततसे सगळे -
- अशि जरी शक्ति वश, तरी असो अन्तरी क्षमेचें जाळें-
प्रस्थान असो हे अपुले......

हे चरण चुकुनि जरि सुमन तुडविती, तरि न दिसो ते चुरलें
पद हेच ,प्रखर परि आंच साहण्या साच दिसो सजलेले!
प्रस्थान असो हे अपुले........

ऐकुनी पाउले, क्षणीं राक्षसी मनीं दिसो भय रिघले;
परि तोच ध्वनी श्रवतांच, करो जग नाच नीतिचे इथलें!
प्रस्थान असो हे अपुले......

जिथ पुढे रण उले ,कढे; तेथ चहुंकडे दिसो हिरवळले!
प्रस्थान असो हे अपुले.......

कंगाल कुटींतील भाल होऊं द्या उजळ, सुखा जे मुकलें!
प्रस्थान असो हे अपुले......

क्षितिजान्त तुडवुनी प्रान्त, तिथे ध्वज शांत रोवु हे अपुले
तेथून स्वर्ग क्षणि चढुन , आणु वाहून सुधाघट सगळे!
प्रस्थान असो हे अपुले........

माधवपुर वडगाव
१७ नोव्हेंबर १९४६ प्रकाशित
"प्रसाद"
जुलै१९४९

**२८)आरती ओवाळणे ही** -

हीन स्वार्थाचे तराणे गात नाही जो गळा ,-
घालणे ही त्यास माला,
नाम माझे सासरीचे तोच ठेवो आवडीं !

भेदूनी दिक्काल ये जी दृष्टि तीरासारखी ,
शांत राही सौख्यदुःखीं -
तीमधे आपादमाथा स्नात होवो ही कुडी!

भव्य छाती सांधते जी ध्येय तंतूतंतुनी -
तीवरी हे शीर्ष मानी ,
टेकण्याची वांछिते मी सोनियाची ती घडी !

लेवुनी उत्साह जाती पाय जे प्राचीप्रती
शोधण्या स्वातंत्र्य ज्योती -
तीर्थ त्यांचे प्राशिण्या घे अन्तरी आशा उडी !

जेथ स्नेहाच्या लुटाव्या केवढ्याही दौलती,
पेटवाव्या प्राणवाती ,
सावली लाभो तिची ; - ती जीर्ण राहो झोपडी !

घाय युद्धांतील त्याला चंद्रमा जो हासरा
तोच या नेत्रास प्यारा
आरती ओवाळणे ही त्यास आता एवढी !

माधवपुर वडगाव प्रकाशित
१८नोव्हेंबर १९४६ 'अभिरुची'
सप्टेंबर१९४७

**२९) स्मृति**

हात मायाळू फिरावा माझिया पाठीवरी
आणि व्हावी कंटकांची रासही पुष्पापरी.

शब्द तूझे ऐकता यावी उतू ही चेतना
संकटे भेसूर सारींही बनावीं हांसरी

पाहुनी वात्सल्ययुक्ता दृष्टि नेत्रींची तुझ्या
लोपुनी नैराश्य आशा फेसळावी अंतरी.

या मुखी तू घालता कोंड्याचिही ती भाकरी
  पंचपक्कान्नेहि झाली तुच्छ त्या घांसावरी

चोळुनी तू अंग पाणी घालताना वाटले :
  अमृताचे कुंभ झाले पालथे माझ्या शिरीं

मागुनी तू चालता टेकीत काठी वांकडी
मृत्यू झाला खेळणें मज त्याच आधारावरी

आणि गाठी ठेविले तूं अल्प कांही राखुनी
काय त्याचे या जगाला ?- मी कुबेरच भूवरी

-  साठलेल्या अन्तरी गे ज्या स्मृतींच्या दौलती
त्या कुठे ठेवू ?  स्फूर्तिकाव्यांची तिजोरी ना पुरी !

---

माधवपुर वडगाव
१९ नोव्हेंबर१९४६

---

**३०) हे पोट** - ?

टांगुनी वेशीवरी अब्रू कुणी
रंगवोनी तोंड बैसे कामिनी
भाव नेत्री कोठलासा तो भुका.......
एक वीतीचे असे हे पोट का ?

लाथ बैसें मातली पाठीवरी
राख होते स्वाभिमानाची ;तरी -
चाटितो ते पाय कोणी सारखा .......
एक वीतीचे असे हे पोट का ?

फावड्यांनी ओढण्यां लक्ष्मी कुणीं
नीच कृत्यांचा धनी हो हासुनी ;
रौरवाचा लावितो पेला मुखा .......
एक वीतीचे असे हे पोट का ?

मातृ भू किंवा जीवांची माणसें
कोण ना स्वार्थापुढे कोणा दिसे
आणि केसाने गळा कापी सखा ( ?) .......
एक वीतीचे असे हे पोट का ?

न्यायनीतीची प्रभावी देवळे
धर्मप्रेमाची सुसंस्कृत राउळे

जीर्ण होती....... भंगती कोठे फुकां .......
एक वीतीचे असें हे पोट का ?

**३१) पृथ्वीचा प्रवास**

लक्ष जातींच्या फुलांचा सुरेख
छान गजरा खोप्यांत हंसे एक .....
आणि शालू सळ्सळत हिर्वळींचा......
शोभतो ज्यां कांठ सावल्यांचा
पैंजणातुन स्वर गोड विहंगाचे.......
कंकणांतुन  मधुगीत मानवाचे .......
पर्वतांचे उत्फुल्ल तिचे उर -
ज्यास सरितांचे बिलगतात हार......
भालिं तेजस्वी तिलक रवि -प्रभूचा......
घेतलेला हा पदर शिरिं नभाचा !
कमरपट्यातिंल चंद्र कधि मधेच -
पूर्ण दिसतो वा अल्प कधि हळूच ........
कटीवरल्या सागराच्या घाटांत -
विश्वकुंडातिल उदक भरुनि शीत.......
करी झारी अन् दुज्या हले रिक्त -
वाळवंटाची ;.......वायु - केश मुक्त........
- असा सांभाळित सर्व व्याप, थाट
तारकांच्या राईमधील वाट -
नित्य पृथ्वी ही चालते असीम........
कोणते परि शोधीत शान्ति - धाम ?

दूर मानवता - बाग असे काय ?
- शिंपिण्या ती, का त्वरित अशी जाय ?
'नाहि चुकले मी पथ तरी?- म्हणोनी
थबकता ही ,डहुळतें घटी पाणी ?

माधवपूर वडगाव.
२०  जानेवारी १९४७

## ३२)  त्याग

काव्य तुला ऐकवितों
कर्णकटू शब्द रचुन
घेशी परि तेहि श्रवुन
जाशी  तन्मय होवुन !

उधळितसे स्वप्न भोंतीं
पिचलेल्या वेणूतुन
त्यातुनि परि तू घेशी
जुळवून जीवित फुलवुन !

कधि एकांती बसतों
फुटकी वीणा घेऊन
बद्द तिचे सूर परी
घेशी तू गोड करून !

नादवितों दगडावर
टिपरी एकच बडवुन
थबकतेस परि मार्गी
तू लोभुन ,भारावुन !

वाजवितो एकच हा
टाळ अन्य करिं मारून
रेलतेस खिडकीमधिं
परि तू कीर्तनि रंगुन !

रेखित मी बसतो हे
अवघे  अधुरे जीवन
परि घेशी तेहि उरा
कवळुन, अश्रू शिंपुन !

- अश्रु न अगतिकतेचे .....
आपुलकीचे ते पण.......
हेच गमे तुज जीवन......
म्हणुंत मरण इतरे जन !

माधवपुर वडगाव
२३ जानेवारी १९४७.

**३३).बन्ध हे तोडू नको. ?**

बन्ध हे तोडूं नको तर काय मी सखये,  करू ?
एक ओझें या शिरीं मी अन्य केंवी सांवरू ?

भोवतीं हा दाटलेला तम कधीचा भीषण
त्यांत नेत्री पटल मोहाचे पुन्हा कां मी धरू ?

या पदांना सर्प दास्याचा कसूनी आवळी
देठ पुन्हा पद्मिनीचे बांधुनी केंवी सरु?

कंटकांची  माळ  नियतीनें गळा ही घातली
तीवरी तव मृदुल बाहू कोणत्या हृदयें वरूं ?

स्थंडिलांतच जीव माझा जन्मला ज्वालातुनी
केवि सन्निध वाढवूं तव भावनांचे पाखरूं ?

आज हृदयीं जीवनास्तव वादळांचे रण उठे ?
ताज केंवी तव  स्मृतीचा ढासळे तो आवरू ?

कालगंगा वाहते  दुथडी भरोनी आज ही
एक तीरी मी ,दुज्या तू : येत नाही तुज तरू-

सांग मग, पोहून आधी तुजकडे आल्याविना
येत का उभयास कर हे गुंफुनी तीरीं फिरूं ?

- केस पिंजारुन काळां मारूं दे टकरा मला
वाचलों तर मीलनोत्सव साजरा आम्ही करूं !

---

माधवपूर वडगाव
१३जानेवारी१९४७

---

**३४) जत्रा**

---

आज आमुच्या गावी जत्रा

विसरूनि गेली पोरेबाळें
घरी यायचे ; जेवायाचें
डंवरुनि गेले क्षणात एका
रोमरोमही आज तयांचें
इकडुन तिकडे ; तिकडुन इकडें
भिरभिर फिरती डोळे त्यांचे
अनवाणी तरि उगाच फिरती
विसरूनि क्षण- कण सुखदुःखाचे !

तरूण झाले सारे गोळा
'गाडे 'काढुनि चाले मेळा
' हुर्यो ' 'भिर्या' नाद दुमदुमे
अपूर्वच खरा असा सोहळा
ठेवणींतले कपडे अंगी
गुलाल उधळा खुशाल त्यावर
श्रमकृष्ठांचा भार राहु द्या
जरा बाजूला एक दिवस तर

प्रौढ वयस्कहि विसरून गेले
क्षणि अपुले वय : क्षणी मरण - भय
बालपणाचा , तारुण्याचा
पोटी त्यांच्या उठला जयजय !
कुणि केले त्यांअल्लड ऐसे
फिरून्  फिरून् त्यां कुठली ये सय?
एक दिवस तरि हांस नाचती
उदासीनता पावे  क्षय ,....लय ,!

आज आमच्या गावी जत्रा -
दूर झाल्या चिंता सत्रा !

' दुकानांत या कुठल्याही  चल
कांहीही घे : केवढेहि खा
एक दिसाची ही तर जत्रा
हात कशाला अपुला राखा ?
बाजारहि हा फिरूया अवघा
वस्तच खरीदूं मनमानिल  ती

जत्रेची जरि महाग हाटी
कशास त्यास्तव मनास खंती ?

'पाळण्यांमधे बसुनी घेऊ
हिंदोळ्यावर झोके काढू
जत्रेच्या या छत्र्यांवरती
बसून गरगर फिरुनी घेऊ
दोन चार तर नारळ उडवूं
  ओलेत्याने इंगळ न्हाऊ
  नारळ फुटती अनन्त त्यांचे
  तीर्थ ओंजळी भरभरूनि पिऊ !

' रणालगी ही इथे वाजते -
कुस्त्यांची ही दंगल मोठी
आखाडा हा त्यास मोकळा -
शक्ति नि ईर्षा जया मनगटी
इथे फडफडे एक निशाणी
मिरवित तोडा शिन्देशाही
रग कोणाची असे कोंडली
देत तया आवाहन पाही ! '
-जो तो बोले यापरि मित्रा -
' आज आमच्या गावी जत्रा !'

जत्रेची ही रात्र येतसे.......
- येते कुठली ? पळे दूर जणु
तिची मोहिनी : ऐश्वर्य तिचे
पडे तोकडी भाषा वर्णूं
जल्लोषातच : उन्मादातच :
नशेत बुडती जीवजिवाणू
रात्रच आत्मा जत्रांचा या
धुन्द सुन्द हो तै अणुरेणू !
कुठे पडतसे थाप डफावर
कुठे तुणतुणे रिझवी लोका
  कुठे छोकरी लचके , मुरडे
भंवती माना घेती हिस्का
कुठे जुगारी अड्ड्यावरतीं
डबडे वाजे धरुनी ठेका
कुठे पिताना अनिर्बंध क्षण
मद्य सांडते लागुनि ठस्का !

-  पळापळांनी रात्र पळे परि
का न स्थिरावे युगानुयुग ती ?
कशास इकडे  नभ हे लोटित
पहांटच्या या कन्या येती ?

ताठरल्या या नयनी किंवा
आग रवीची पडण्यांपरती
कायमचे का नच ते मिटले
- जीवन जत्रा सरली असती

अखेर झाली सरली जत्रा

जत्रेचा परि अतर्क्य महिमा
चक्र बदलते प्रतिदिवसाचे
देवहि असतिल बघत जोश हा
हळूच खालुन द्वार स्वर्गिचे ;
जत्रेभर या जो फोफावुन
वृक्ष मोहरे सुखतृप्तीचा
असेल मोहर लाजलाजला
स्वर्गामध्यें कल्पतरूचा

---

माधवपुर, वडगाव .
१९मार्च १९४७.

---

### ३५). तूं

तू चांदण्यात धुतली जणु पुष्पवन्ती
निश्वास हे तव सुगंधवितात राती
हास्ये तुझी उजळती धरणी दिगन्त
कोठून गे ,तव उरी बसणार खन्ती ?

विद्युलता उजळता नभिंच्या ललाटीं
वा मासळी चमकता क्षण क्षुब्ध लाटीं
हत्यार फेकित गमे कुणि पारजून
घायाळ त्यापरि करी तव तिक्ष्ण दृष्टि !

खारीपरी गति तुझ्या पदिं चालताना.......
आत्मीयता तुज बघून जडे लताना
जाळीमध्ये थबकती क्षण नागकन्या -
तू मान ही मुरडता - डुलवित माना !

वक्षी तुझ्या कनककुंभ सखे सुधेचे......
डाव्या कटी अन् शिरीं घट दो जळांचे.....
चिंचेतळीच असलो जरि मी प्रभाती
लागून वेध असती हृदया तृषेचे !

---

माधवपूर वडगाव
२६ मार्च१९४७.

## ३६) चाले या तपस्या -

चाले तपस्या अविराम माझी
हासेल का येथ कधी वसन्त,
का साजरी होइल ही दिवाळी
येऊन गेही मम साधुसन्त
पुष्पा -फुलांनी लवल्याविना वा
पावेल का हा श्रमवृक्ष अन्त
- चिन्ता अशी पोखरते मनाला
का.ही घडो ! मात्र नको उसन्त !

चाले तपस्या अविराम माझी
ना ती प्रतिसृष्टी सृजावयाला......
ना भीति तेव्हा तप भंगण्याची,
ना कष्टही त्या सुरमेनकेला!
किंवा न मी इन्द्रपदास वांछी.....
पावेन निद्रापद मी कशाला?
तिन्हीं जगे ना मज जिंकण्याची.....
दडपील पाताळिं प्रभू कुणाला ?

ओती जरी हे नभ आग माथी
येती जरी भीषण काळ राती
पृथ्वी थरारे जरि वा दुभंगे
लाव्हा रसाचे जरि स्फोट होती
शास्रामुळे सूड पिसाळलेले
भस्मासुराचे जरि रूप घेती
चाले तपस्या तरिही प्रशान्त.......
सीमा तिच्या ना मज सांगु येती !

चाले तपस्या अविराम माझी -
ही मानवांची ह्रदयें हराया
जिंकून स्नेहे पुरतेपणी ती
संपन्न झाली फिरुनी,पहाया;
चाले तपस्या अविराम माझी -
अश्रू तुझे मानवते,पुसाया
लावून'शिव-सत्य-सौंदर्य'-कुंकू
ओटीत तूझ्या 'धरणी 'भराया !

---

माधवपूर- वडगाव
२७ मार्च १९४७

---

## ३७) तू नाहिस सुन्दर ?

शिंपले लोचना ओबडधोबड दिसती
परि सुरम्य मोती आंत तयांच्या दडती
कस्तुरी मृगाला नसोच मोहक काया
परि सौरभ त्याचा काय असे लंव कमती

तू नाहिस सुंदर...... परंतु कवणा खंन्ती ?
- तव भाल विशाल न ; परि तेथे ना आठी .........
ना केस लांब ;परि माझा जप ते करती
ना अनुपम भुवया , परि न वक्र कधि होती .......

ना कमळ नेत्र ,परि उणा न मुळि अनुराग........
ना सरळ नासिका ; परि अग्रीं ना राग.......
ना लाल ओठ ; परि शब्द उणे नच स्फुरती
ना रम्य हनुवटी ;परि तीवर ना ढंग ..........

तव उन्नत उर न ; परि अंचळ ना ढळतो........
रेखीव न बांधा ; परि खांदा ना उडतो ........
काया न गौर ; परि अंतरंग ना काळे
ते पिऊन तर मी माझी कविता लिहितो !

---

माधवपुर वडगाव
२८ मार्च १९४७.

---

## ३८) एकान्त उठे खवळूनी !

एकान्त उठे खवळूनी
त्या सहस्र फुटती जिव्हा , गर्जतो चहूंबाजूंनी !
हिन्दुभूमि तुज खंडिले
निष्पाप तुझ्या रक्ताने, हे विश्वगोल माखले !
तव उरी सुरी खुपसुनी
सैतान नाचले हर्षे,कन्यका तुझ्या भोगुनी
हे नेते अमुचे तरी
पुजितात त्या सैताना........लाचारच श्वानापरी !
एकान्त म्हणूनि खवळतो
त्या सहस्र फुटुनी जाव्हा, गर्जतो ; असा गर्जतो :
"हे हिन्द - निद्रित मना,

शार्दूला,दीर्घ निद्रिस्ता,रे ऊठ करी गर्जना !
तु कोण ?-का न तुज कळे ?
हे रोमरोम तव हिन्दू - जे चन्दनापरी जळे !
जंव जगतीं या शर्वरी
तंव होती की वेदांची रविमाला तुझिया करीं !
या जन्मभूमिच्या मुळे
हो स्वर्ग तुच्छ श्रीरामा,- तो तुला वारसा मिळे !
गीतेचे अमृत तुला
ठेवियले श्रीकृष्णानी,निशिदिनीं इथे प्यायला
सम्राट किती जाहले
विक्रमादित्य भूपाचे सिंहासन तुज लाभले !'
स्वातंत्र्यास्तव झुंजुनी
तव 'प्रताप 'स्वर्गा गेला - छे, आहे रानींवनीं
तव हिन्दूशीर्षावरी
तो मुकुट शिवरायांचा होता ना परवा तरी !
इतिहास तुझा दिव्य हा!
तो तोच असशि तू हिंदू; तू विश्वपुरुषहि महा !
संकोच काय वाटतो -
म्हणविण्या स्वतःला हिंदू ? छे; हीन भाव सोड तो !
कर आणिक आवाहन
त्या उग्र, शास्त्र तेजाचे ; -जे मनुजांचे जीवन !
पूर्वि त्याच तेजापुढे
त्या शिकंदराची येथे गर्वाची नांगी पडे !
त्या तशाच तेजामधे
पारशी - जरी परदेशी - नाहले ,डुंबले, मुदें !
ते तेज उसळता वरी
दचकतील रावण कोणी ; हसतील बिभीषण परी
ते हिंदू तेज पाहुनी
या सर्व दिवाभीतांच्या दाटेल रात्र लोचनी!
ते दिव्य तेज उगवता
आक्रोश सर्व लोपोनी नान्देल जगी शांतता !
कर म्हणुनी आवाहन
त्या उग्र , क्षात्र तेजाचे ; जे जगताचे जीवन!
हा अखंड भारत तुझा
तुजकडे याचितो अस्थी ; हो नधीचि तूंही दुजा
- एकांत असा खवळतो
अंगागही खवळे आई ! उरी चूड पहा पेटतो !

---

माधवपुर -वडगाव ' प्रकाशित
२० जुलै १९४७ '"तरुण 'हिंदुस्तान साप्ताहिक"
३ जानेवारी,१९४८.

---

**३९)- हो जीवना, थोर !**

फुलता इथे फूल , मन होत मश्गूल
भुंगाहि येऊन , मधु जात चाखून

छाया तळी शान्त असतां न कां पान्थ
जाईल थांबून....... श्रमभार उतरून ?

जल स्वच्छ अन् खोल पाहून कुणि सांग -
घेई न पोहून डुंबून , डुंबून ?

फळ लवथवित लाल पाहून द्विज कां न
खाईल फोडून .......टोचून ,टोचून ?

अग्नी इथे दीप्त ,तर कोण थंडीत -
घेई न येऊन तळहात शेकून ?

पोटात जर प्रीत तर कोण पीडीत
जाईन गाळून अश्रू मुके दोन ?

- हो जीवना थोर ! तू आज तर पोर
तू आज तर सान येऊन ,जाऊन !

माधवपुर -वडगाव
२५ऑगस्ट १९४७.

**४०). कसले अश्रू** ?

कसले अश्रू टपटप जमले कविवर, तव नयनी ?

प्रभात झाली, उषा सुन्दरी गालीं स्मित करिते,
तिच्या कुशीला बिलगुन गाती खग मंगल गीते;
उरांत अपुल्या तेज सांठवुन निर्झर खळखळले
किरीट चढले चराचरावर , तिमिर - बंध गळले -
आनंदाचे असल्या वाहे नीर काय नयनी ?
कसले अश्रू टपटप जमले कविवर तव नयनी ?

उडते अथवा कुणा बळीचे तप्त रूधिर भोतीं
सम्राटांच्या सुखसरितांना त्यातूनि ये भरती

दानव अथवा आज नाचती आग पेटवून
दुबळ्या अन निष्पाप जिवांना खाती भाजून -
त्या दुःखाचे उग्र रूप हे जळजळते नयनी ?
कसले अश्रू टपटप जमले कविवर तव नयनी ?

तुझीच अथवा होत उपेक्षा म्हणूनी का अश्रू ?
रसिक कुणि तरी असे म्हणुनि का सुखमय हे अश्रू ?
तहान आणिक भूक विसरूनी : टाळुनिया मोह
जगताचा संसार सजविण्या होमियले गेह -
वैफल्यच की पूर्ति तयाची ही प्रगटे नयनी ?
कसले अश्रू टपटप जमले कविवर तव नयनी ?

---

माधवपुर वडगाव
१४ऑक्टोबर १९४७.

---

## ४१). रे मेघा !

रे मेघा , कुठूनी असा अवेळी येशी ?

का क्षितिजामागें सोन्याचा प्रासाद ?
या विश्वाची का राणी वसते तेथ ?
तिज आज अचानक काय लहर ही आली
अन् तिने सोडिला फुगा एक आकाशीं
तो तूच हवेवर रांगत रांगत येशी ?

का कुणी आजही यक्ष जळे विरहाने
प्रिय आठवणींनी भरतो सारी रानें
पडसाद ऐकुनी करूण त्या गीतांचे
प्राचीन यक्ष , तो मेघ स्मरुनि कळवळशी !
त्या पूर्वजापरी दूत व्हावया निघशी ?

का तुलाच अपुली लहर येत या काली
भू 'सुजला सुफला' पहावया हिर्वळली
कुणि पिता - बाळ अन बाळंतिण ज्या नयनी
न्याहाळुन पाही ! तशा सुखाच्या राशी -
अनुभवीत अपुला रेंगाळत तू येशी ?

तुज पाहुनि मजला बाल्याची स्मृति होते :
गोष्टीत कोकरू उनाड एका असते
त्यापरी चुकवुनी भगवन्ताची दृष्टि
मेघांचा सोडुनी कळप काय तू सुटशी

अन असा बागडत नभी मोकळ्या येशी?

तो हवा कशाला उद्देशच हृदयांत
ती वेळ , बंधने जीवित हे लुटण्यात ?
-हे जाणुनि अगदी झुगारुनी वेळेला
तू असा अवेळी जगताभंवती फिरशी
कधि गूढ उकलिशी ? कधि सौंदर्यी रमशी ?

छे; प्रभू -आज्ञेविण हलतें कुठले पान ?
इच्छेने त्याच्या असे तुझें हे भ्रमण ?
का जगती आहे दुजा भुका बंगाल
बरसण्यास तेथे आज त्वरित तू जाशी ;
परि सैतानाचा अंश रोधितो तुजशी ?

वा कत्तल चाले आज भारती घोर
सांडले मानवी येथ जेवढे रुधिर
त्याचीच वाफ ही आकाशाच्या पोटी ?
हे रक्त - मेघ ! वद काय करावे आम्ही ?
तू 'उत्तर दक्षिण ' प्रवास कां हा करिशी ?

---

माधवपुर - वडगाव
१६ऑक्टोबर १९४७

प्रकाशित
"सत्यकथा"
मे १९४८

---

## ४२)-.  मी हिंदु.......

हा ,मी हिंदू ! पुन्हा पुन्हा पुसतसा का प्रश्न 'तू कोण '?
देता उत्तर ,नाक का मुरडता ? आठ्या अशा घालता ?
कोठे यात कमीपणा ? कुठुनि वा वाटेल लज्जा वदा ?
त्या शब्दात उदात्त ,उच्च भरली आहे किती संपदा ?

शोधी मानवता युगानुयुग हे सारे जगत् आंधळे ,
ती होवोनि प्रसन्न दर्शन तिने केव्हाच आम्हा दिले ;
तेव्हा एकमुखे तिलाच दिधले 'हिंदुत्व' हे नावही
- कालाचीच वही पहा उघडुनी , देईल ती साक्ष ही

"जे स्वप्नांतिल राज्य -दान करणे प्रत्यक्षिही पाळिती
- पावे सत्य विकास पूर्ण इतुके ज्यांच्या हृदी या रिती
जे घेती विकुनी स्वतःस - वचने व्हाया पुरी शब्दशः
जे ना बिंदुहि प्राशिती जरि करी व्याकूळ जीवा तृषा ,

आज्ञापालन राज्यत्याग करुनी केले , वनी राहिले
एखादाच प्रजेत शंकित तरि अर्धांगिला त्यागिले
दुष्टांना वधुनी ऋषीवर तसे रक्षीयले सज्जन
ज्यांनी गौरविले प्रदेश जितही शरणार्थिया देउन
ज्यानी घोर गुन्हे सहस्त्र अपुल्या पोटामधे घातले
स्त्रीचे वस्त्र बळेच फेडिति तरी वृत्तीस ताणू दिले
गीता गाउनि धर्म थोर कथिला ,कर्तव्यही दाविले
- जैसे बोलूनि दाविले , तसतसे चालूनही दाविले !

ज्यांनी 'संतु सुखी निरामय जगत 'हे मागणे इच्छिले
ज्यांनी 'ही वसुधा कुटुंब अवघी' मंत्रे नभां भारिले
ज्यांचे काव्यच 'मा निषाद' म्हणुनी उत्स्फूर्तले अवचित्,
संतापून मुक्या जीवास्तवहि तै त्या पारध्या शापित -
ते हे हिंदू !"

- वदा कुठे वसतसे मानव्य ? -येथे वसे !
आम्ही हिंदू ! स्वतःस का न म्हणवा ? लज्जा कुठे ती असे?

____________________ माधवपुर - वडगाव                प्रकाशित
६ नोव्हेंबर १९४७.   "तरुण हिंदुस्तान साप्ताहिक "
१३ डिसेंबर,१९४

## ४३-)सूर्य, चंद्र आणि तारे

नील, भव्य आकाशी
ताऱ्यांनो, जमता अन्
रात्र - रात्र हीच सभा
घेतो नित हा मी पण

विनवितसे कळवळून
परि देता सहकंप न !
जाता तुम्ही निघून
मूक वदन , अश्रूमलिन !
आज परी सोक्षमोक्ष
- चंद्र म्हणे ,- मज करू द्या
निर्णय तुमचा कळू द्या
उत्तर मज निश्चित द्या !

थोडीशी पूर्वकथा
ऐक आज चांदोबा
- कुणि वडील तारा हे
बोलाया राहि उभा -
आणि म्हणे - ती श्रवतां
तुज कळेल आम्ही कां
तव म्हणण्याला रुकार
देत न मुळिही इतुका !

आज जसे हे आम्ही
त्या परीच तो भास्कर
होता तारा लहान
कोपऱ्यात विश्वावर
येता आम्ही थकून
विश्वाच्या गिरणींतुन
बसत असू अंगणांत
जाळित चिलामीत दैन्य !
एके निशि तो आला
हंसत हंसत आम्हाप्रत
'अमुचा उध्दार असे
अमुच्या करि ' म्हणत, म्हणत
बोलुनि तो खूप ,खूप
करि सकला मंत्रमुग्ध
- सोनेरी स्वप्नांवर
झालो बेहद्द लुब्ध !
क्षणि गमले आम्हाला

याला जर अनुसरलो
तर होऊ सर्व सुखी -
  ज्यास्तव झटलो ,.....थकलो

स्वर्गी वा इन्द्रपुरी
अथवा त्या यक्षपुरी
होते जे उग्र तेज
अमुचे सत्ताधारी -
त्यापासुन मिळवाया
योग्य न्याय आम्हाला
त्याचा तो एक बेत
आवडला ;आचरिला -
- आज जसा तू म्हणशी ,
की अमुच्या शास्त्यांचें
सहण्याला उग्र तेज
द्या मज ऋण तेजाचे ;
मग भिडविन मी लोचन
शास्त्यांच्या नयनांना
अन् वेशीवर टांगिन
अखिल दुःख -दैन्यांना
यापरीच तो वदला -
आम्हीही विश्वसलो
  अर्धे-अर्धे नि तेज
  त्याला देऊन बसलो !

परि बघशी आज तूंच
अमुची गत झालेली
- मूर्खताच पदरांमधि
  केवळ ही पडलेली !

येतो भास्कर येथे
आम्हासच वितळवितो
अधिक दुःख ,अधिक दैन्य
माथी मारुन जातो !

गेला आम्हा विसरुन
गेला विसरुन सकलां
विसरुन गेला स्वतःस
पूर्वाश्रमही अपुला
आणि तोच आज येत
  जळत जळत त्वेषाने
  घेतो जीवित अमुचे
  शोषुनि निर्दयतेने !

- हा ,चंद्रा ,बघ बघ ती ,
लवकर बघ उल्का ती
जी दिनभर शोषियली
सूर्याने तारा ; ती -
सोडूनिया क्षीण प्राण
पडते बघ दूर , खोल !
- हे जीवित : हे जगणे !
- हा असला क्रूर खेळ !
झाली ती स्तब्ध सभा
स्तब्ध चंद्र, स्तब्ध सृष्टि -
गवतांवर ,पर्णांवर
पृथ्वीवर अश्रु – वृष्टि !

माधवपुर- वडगाव,
२४ नोव्हेंबर १९४७

### ४४) या जीवन-मार्गावरतीं –

या जीवन - मार्गावरतीं येतां,..... जाता
क्षण दृष्टिभेट ही अमुची होता, होता
गे नकळत वदनी हास्य मधुर उमलावे
अन् सुखद , तीव्र कळ झोंबुनि जावी चित्ता !

ही त्रुटित भेट ! - परि गगन व्यापुनी उरतें !
तिजवरती मन हे प्रचंड इमले रचते
ग्रहगोलावरती चढुनी त्यांना हसते
ब्रह्मांडच अवघे थिटे तयाला होते !

हे तुटक दृष्टिचे मीलन दिसते जगता
परि युगयुग निरखुनि जे न येत आकळता -
ते स्पष्ट उमजते ! अवधी त्यास नकोच
प्रीतीला दृढतर पीळ पडे नच कळता !

हे असेच होते पीळ अजुनि बसण्याचे
परि आज न अमृत वर्षिलेस हास्याचे
गेलीस समोरुन क्षणभर बघतच खाली -
हृदयावर पडले दडपण अमित युगांचे !

तै सांगत होतो कांहीतरि मित्राला -
मी तोल मनाचा गेलेला सांवरिला
ती सांवरताना त्रेधा, हे कळले की ,
तू जसे वागलिस तेच बरोबर प्रेमला

-  का प्रदर्शन जगी प्रीतीचे मांडावे ?
हे मानस आम्ही इतुके उथळ करावे ?
अन् म्हणुनी  असता मित्र संगती माझ्या
तू नाटक केलें तेंच नित्य शोभावे !

यावे न चुकुनिही हास्य ओठ उघडून
डोळे मज बघतिल बंड पुकारुनि म्हणून -
तू भरभर गेलिस !......हा ,पण त्याच गतीने -
तुज फसवुनि , हृदया तुझ्या दिले उघडून !

या जीवन - मार्गावरती येता..... जाता
कधी दृष्टिभेट जर होणे चुकली आता -
तरि प्रीति -बंध हे सैल न मुळि व्हायाचे
ती नुरली आता प्रेमाला दुर्बलता !

---

माधवपुर - वडगाव
२डिसेंबर१९४७.

---

## ४५). तुझें गीत -

अग्नीवर हळुहळु राख जमू लागावी ,
शेवाळे अथवा जळांवरी पसरावी ,
लखलख शस्त्रांवर गंज चढू लागावा ,
माळावर पाखरण पाचोळ्याची व्हावी -

त्यापरी निराशा कधी मनावर यावी
या जीवनांतली मधुर चवी संपावी !
जग भासावे हे वाळवंट वैरण
मृत्यूची केवळ आळवणी  चालावी

हा माथा भणभणणारा ,फणफणणारा
घेऊन शिरावे - ही खोलीची कारा ;
टाकुनी स्वतःला तप्त बिछान्यावरतीं
हे शरीर द्यावे लुटण्या अंध:कारा !

त्यावेळी अवचित तुझी आठवण यावी -
नभ-सारीता अवचित दुथडी भरुनि वहावी ......
आकस्मिक वृष्टी सृष्टीवरती व्हावी ......
सागरा अचानक उदंड भरती यावी .......

घोंघावत यावे वादळ धरतीवरती .....
जागृति क्षणि यावी पर्वत -डोळ्यांवरती......

क्षणभर गगनाचा तृतिय नेत्र उघडावा.......
वा प्रळय काळ तो नाचत यावा  भंवतीं ........

स्थित्यंतर आणिक व्हावे एक क्षणांत :
पावुनी जुने लय ,यावें नव तेजात .......
लोपुनी निराशा, आशा फिरुनी यावी
अन् तुझेच पुनरपि गात उठावे गीत !

---

माधवपुर -वडगाव
१४ डिसेंबर१९४७

---

## ४६) हे मानव आम्ही -

पंजरी पाखरूं पाहुनि काव्यें रचतो
ती वाचित आम्ही मानव  रंगुनि  डुलतो.
या काव्यानन्दा मुकल्या ज्या दो कोटी -
त्यामध्ये एक का तुम्ही देवगणांनो;
अन् दुजे अभागी तुम्ही पशुपक्षानो ?

या पिंजऱ्यामधे ,- या जीवनमरणाच्या ,
या संसृतिच्या , या अनन्त अज्ञाताच्या,
हे देवांनो ,ना अमुच्यापरि बंदिस्त
अन् म्हणून नाही काव्यच तुमच्या भोंतीं
- काव्याविण जीवित ?-नको विचारच पुढती !

हे पशुपक्षांनो, तुम्ही जरि बंदिस्त
नच माथा तुमच्या विचार ठेवी हस्त !
तडफडता ,उधळित जिणे कसेही.... मरता,
का जगता ? गाता?  रडता?  ठाऊक नाही -
अन्  म्हणून काव्यच तुम्हास कळणे नाही !

हे मानव आम्ही; - आम्ही मानव राहूं
हे मानव म्हणुनी मरुनी ,  मानव जन्मू -
वरदान मागु हे ! जीवित इतुके श्रेष्ठ !
- ना देवांनो , ते बदलू 'नंदन' मोले
का पशुपक्षांनो ,तुम्हास कांही कळलें ?

---

माधवपुर -वडगाव
१८डिसेंबर १९४७

---

**४७)कवि आम्ही -**

कवि आम्ही करतों उपासना तव देवा !
तो येईल क्षण ,- तू ऐकुन येशिल धावा !
वरदान द्यावया प्रगटविशील निजरूप -
'जग सर्व रचो हे कविता '-वर हा द्यावा
सौंदर्ये आम्ही उकलुनिया चहुंभंवतीं
विणितसू वसन हृदयाच्या 'मागा'वरती
ते पांघरावया देउनि या वसुधेला
तिज निवारुं बघतो अमंगलाच्या राती
वर्षुनिया अमृत कधि अमुच्या स्फूर्तीचे
क्षण थरारवीतो सौख्य - बीज जनमनिचे

पालवू पाहतो तरारले उन्मेष
- हे केले ; करतो ; तेच उद्या करण्याचे !
तिमिराने इतुके विश्व मात्र भरलेले !
जीवन हे भंवतीं आज अखिल सडलेले

स्वार्थाचे अपुले कुटुंब घेऊनि जग हे
करितसे तयाचे लालन -पालन -सगळे
जग असे जणू हे पुराण वाल्ह्या कोळी
अन् वाटमारि ते करिते रानोमाळी;

कर्तव्य - प्रीती -धर्मादि वाटसर सारे
मारिले ; मारिते ;मारिल ज्या त्या वेळी !
पापाने रांजण लक्ष आज भरलेले
भरणार केवढे अजुनि , न काही कळले !

परि क्षय वृद्धीवर, वृद्धि क्षयावर विश्वी !
जगताच्या पापा शेवटही ठरलेले !
तरि पाठव देवा ,मुनिवर नारद येथ
इतिहास होउ तो जुनाच पुनरावृत्त ;
उपरती होउ दे आज सर्व जगताला !
मुनि त्यास सांगु दे जपण्या ' कविता' मंत्र !

' कविता 'ही 'सुंदर ; 'सत्य 'हि ती कविताच !
तिज जपु दे जग हे घेऊनि सतत ध्यास
हे महाकाव्य मग जग-हृदयात स्फुरेल
ते ' शिव'-चरिताचें भविष्य होईल खास !

माधवपुर -वडगाव
२४ डिसेंबर १९४७.

## ४८)नव्या मंदिरी -

लग्न लागुं द्या तुमचे वधूवर !
मार्गशीर्ष हा महिना आहे
दुपारचा हा मुहूर्त आहे
ऊन उभे हे पृथ्वीवरती
रखरख ,वणवण नाचत आहे ?
वारा तापुनि , अंग मोडुनी
वावटळीचे हात पसरुनी
केस पिंजुनी , डोक्यामध्यें
घेतो आहे धूळ उडवुनी ?
सृष्टीवरची छवी मनोरम
म्लान तीहि या क्षणी जाहली
सर्व पाखरे घरट्यामधुनी
निर्विकारशा मने बैसली ?

लग्न लागु द्या तुमचे वधूवर !
-उभी आसवे कसली नयनी ?
कसली करता खन्त एवढी
- लोक न जमले लग्ना म्हणुनी ?
- मित्र न आले लग्ना म्हणुनी ?
- आप्त न आले लग्ना म्हणुनी ?
- बंधु न आले लग्ना म्हणुनी ?
- बहिणि न आल्या लग्ना म्हणूनी ?
- बाप आणखी आया तुमच्या
जन्म तुम्हाला दिधला ज्यांनी
तेही तुमच्या या लग्नाच्या
विरुद्ध उठले ,......गेले म्हणुनी ?

लग्न लागु द्या तुमचे वधुवर !
- मांडव आहे भव्य तेवढा ?
प्रेमहि आहे भव्यच तुमचे !
- बघते आहे जग उपहासुन ?
हृदयातिल जग तुमचे आहे !
पुसा आसवे नयनांमधली -
लग्न कुणाचे ? त्यांचे ?- तुमचे !
- तुम्हास बघती घालू बंधन ?
काय म्हणुनि ते मानायाचे !
तुमचे तुम्ही बांधा बंधन......
नव्या युगाचे बांधा कंकण......
नव्या मंदिरी नव जग, तुमचे -
तुमचें पहिलें करील पूजन !

## ४९) चल जगा -

चल जगा शस्त्र तव पारज कल्लोळांचे
अन् फाड उदर या विशाल नीरवतेचें
ही एकांताची लांव खात मज बसतें
सोडवी ग्रहण हे माझ्या मन -चंद्राचे !

पक्षांच्या चढु दे ललकाऱ्या गगनांत !
जे पोटासाठी दिवसरात्र मरतात ,
त्या सर्व रात्रभर शिणल्या शेतकऱ्यांच्या
जंबुरी विटा भरलेल्या ज्या गाड्यात -

त्या येऊ दे कुर् कुर् त ,,रडत , खड्खड्त........
त्यापुढचें थकले बैल फेंस फुंकीत ,
घंटिका गळ्यातिल उरावरी बडवीत
- मरतुकडी कुत्री स्वागतार्थ भुंकोत !

थंडीत वाजु दे राममंदिरी घांट
लोटु दे महारिण लालधुळीची वाट
त्या टेकडीवरी "घुमट -मारुती "चाही
चौघडा झडू दे धडधड..... धडधड तेथ

बुरुडास फोडु दे वेळू कामासाठी
रडु देत तयाची पोरे पेजेसाठी
खानावळ करू दे कळकट नाच कपांचा
गाऊ दे तबकडी चहा पिणाऱ्यासाठी !-

या नांदीने कर नाटक चालू जगता !
हसु दे वा रडु दे भंवती एकुण जनता
वेगांत चालवी वाहन गोंगाटाचे
शान्तता चिरडुं दे चाकाखाली आता

आदळु दे कानी कसलाही तो नाद
पडु दे कर्कश वा मंजुळ, मंगल शब्द !
शान्तता क्षणहि करील येथे राज्य
माजेल अराजक ,आन्तर होईल क्षुब्ध

आरोप तुजवरी करील मन मग भलतें (?)
'जग -सगळे बघता एक -हृदय त्या नसते
पावित्र्य- मूर्ति हि न पवित्र नयनां याच्या
भावना आमुच्या बळी सर्व ते घेते !'

हे बंड (?) मोडण्या माझ्या अंध (?) मनाचे
न्यायी अन डोळस जगता (!!)गोंगाटाचे
ये पाजळून ये शस्त्र खुपस ते कानी;
मन मरगळेल विसरून कारण क्षोभाचे !

जमु देत सर्व ही पोरे - पोरीबाळी
खेळत ती करू दे गिल्ला संध्याकाळी
ती झोपी जाता घुबडे जमवी रात्रीं
परि ठेवु नको ते शस्त्र कधींही खाली !

---

माधवपुर -वडगाव
१६जानेवारी१९४८.

---

### ५०). झुक् झुक् गाडी झुकुक् झुकुक्!

---

झुक् झुक् गाडी झुकुक् झुकुक् !

अशीच होती गाडी धांवत
समोर होती सृष्टी सरकत
किरणे देहां स्पर्शू लागत
लहर वायुची सुखकर लहरत
डब्यात एका दोघेही
चढलो होतो लंवलाही
नकळत दोघांही कांही
परि क्षणिं एका
एकामेका
गमली ओळख व्हावीशी
झुक् झुक् गाडी झुकुक् झुकुक् !

कशावरुनि तरि ओळख झाली
कशावर तरी चर्चा झाली
उगीच कधिमधि नजर मिळाली
स्थिरावली क्षण पुन्हा परतली
उगाच ओठहि लंब हसले
इतरां न कळू ते दिधले
- निदान त्यास्तव मन झटले !@
- असेल कळले :
नसेल कळले !
केले चाळे मधु असले
झुक् झुक् गाडी झुकुक् झुकुक्

परंतु सखये ,जमलें नाही

हृदय मोकळें करणें काहीं
-इतर बोललो कांहीबाही
निरर्थ गमले मनास तरिही !
स्थानक आले तों माझें
उतरे घेउन मी ओझें
काय करावे ,नच उमजे;
तुहि उतरलिस
गाडि बदललिस
मार्ग भिन्न माझें नि तुझे
झुक् झुक् गाडी झुकूक झुकुक्

फलाटावरी मात्र तेथल्या
पावलांत या बेड्या पडल्या
परन्तु गाडी सुटण्याच्या त्या
मधल्या वेळिहि नच व्यक्तविल्या -
स्नेहभावना मधु शब्दें !
'प्रेम कोठले', मनहि वदे -
'जन्मे एका क्षणामधें?
उगी कशाला
बोल आपुला
दवडितोस शून्यांत इथे ?'
झुक् झुक् गाडी झुकुक्  झुकुक् !

परन्तु गाडी तुझी हालतां
काय जाहले तुझिया चित्तां ?
नयन विकसले कुणां पाहतां ?
अधर हालला कुणां बाहतां ?
हेच भाव उरि तव होते ?
बोलवले ना तुजशिहि ते ?
-मुकस्तंभ मी ! अजुनि इथे ?
धावधावलो......
पकडु न शकलों
जीवन -गाडी ती प्रमदे
झुक झुक गाडी झुकुक  झुकुक् !

---

माधवपूर -वडगाव
९मे १९४८.

---

**५१) स्वर चिरवांछित ते** -

प्रत्यहीं प्रभातीं पोटासाठी उठणें
पोटास्तव सारा दिवस राबणें , झिजणें
पोटाची करूनी  तरतुद शयनीं पडणें
पोटाच्या चिंतनि दचकुन जागे होणे.

या असल्या जात्यामध्यें भरडला जातो
त्यामधे बदलही हवा न आता गमतो !-
या जीवनांतलें कणकण निखळुन जाती
पडतसें पीठही भळभळ जात्याभोंतीं

परि कधिकधि येते अज्ञांतांतुन हांक
अन् नकळत जागी हृदयाची हो भूक :
विसरतो बंधने ; गगनी तरळत जातो
स्वर चिर वांछित तें कांही ऐकूं बघतों !

माधवपुर -वडगाव ,    २२जून १९४८

**५२) तुझ्या पदांचा ठेका** -

तुझ्या पदांचा ठेका उमटे माझ्या हृदयात -
संवादी परि नाही भंवती जीवन - संगीत

तुझ्या दृष्टिचे अमृत माझ्या भरलें नयनांत -
कालकूट परि डहुळत आहे जीवनकुंडात ;

तुझ्या अधरिची लाली माझ्या निद्रास्वप्नांत
रसलेली आग प्रखर परि जीवन -  पात्रात

तुझ्या स्मृतींचे कण तेजाचें रोमारोमांत -
धूर दाटतो परी तमाचा जीवनव्योमात !

- नव-ग्रहांच्या मालेमध्ये ग्रह नव दो आम्ही
जास्तीचे गे, आजपासून हे होताहोत .

ग्रहाग्रहांचे उत्कट वसते परस्परी प्रेम
परन्तु कक्षा सांभाळित त्या फिरणे विरहांत .

तयांपरी या कक्षांमधुनी यापुढतीं आम्ही
करीं दाबूनी जखमा अपुल्या फिरणें विश्वांत !

माधवपुर -वडगाव , २३जून १९४८

## **५३). चाहूल सुखाची** -

चाहूल सुखांची येत राहते कानीं
हांसुनी लागते डुलण्या आशा - श्रेणी
        परि वादळेहि ती याया नलगे अवधी
एकाच क्षणीं अन् सृष्टि निघे निपटोनी

कधिं कडा उभा हा दमांत चढण्या जावे
उत्साहावरती स्वार मनाने व्हावे
        परि उपहासहि क्षणिं होतां या धैर्याचा
पायथ्यास पुनरपि तोल सुटुनियां यावे.

कधिं रम्य उपवनी पुष्प दूरवर डुलते
- ती सुंदरता मजसाठिच फुलली गमते !
        त्याकडे धावण्या वाट शोधितां , फिरतां
नच वाट गवसते ;......फुलहि लपते ,......नसतें.

मजपुरत्या तर मी स्वप्नांच्या या नावा
सोडितो प्रवाहीं जाण्या कांचन -गावा
        परि वादळेहि ती याया नलगे अवधी
अन् दूर होतसे दुरगांव ते देवा !

- दु:सह्य क्षणांचे राक्षस मग क्षणि येती
- क्षण एक पुरे तो ! - ठिकऱ्या माझ्या उडती !
        भोंवती ,पुढे मज दिसतो घन अंधार
अन् भुतें सुखांची त्याच वेढिती अंती !

---

माधवपुर - वडगाव ,
२६ऑगस्ट १९४८.

---

## **५४) तुरुंगातली भाकर** -

मी तुरुंगांतली खातों भाकर - भाजी
का अधिकाऱ्या रे ,कींव करिशि तू माझी ?
        तव दृष्टीला ही भाकर दिसते राठ
        नि:सत्व आणखी बेचव पुढचे ताट -

परि भाग्यदेवतेचेकडची ही मज भेट !
मम आनंदाला पारावार  न आजी
मी तुरुंगातली खातो भाकर भाजी !

नयनात माझिया फुललेला आनन्द
गालावर स्मित हे खेळतसें स्वच्छंद
ओठांतुनं झरते उत्साहाची धुंद
हे दृश्य पाहुनी थक्क असा का होशी ?
मी तुरुंगातली खातो भाकर- भाजी !

मम वदनी कसले तेज न ठावें तुजला ?
मी दिसे एक परि एकटा न बसलेला
अदृश्यस्वरूपी गण भंवतीं जमलेला
एकेक तयांतिल घास भरवितो मजशी
मी तुरुंगातली खातो भाकर -भाजी !

हा घास भरविला पहिला श्रीशिवबांनी
हा दुजा भरविला वासुदेव फडक्यांनी
हा तिजा भगतसिंगादि तीन सिंहानी!
लोकमान्य तैसे महात्माहि येवोनी
हेगडेवार ,नेताजी युगपुरुषांनी -
जाहले हुतात्मे जे जे राष्ट्रोध्दरणीं
ते घास भरविती मला - स्वतः घेवोनी !
ही पंगत असली बसली असता भंवतीं
मी तुरुंगातली  खातो भाकर -भाजी !

ज्या सत्तांधांचा बंदा सेवक असशी
या दृश्याचे  कर कथन रसाळ तयाशीं
-सत्तेचे  त्यांच्या इंधन जाळुन ऐशी
सत्याची जणु ही केली भाकर -भाजी
मी तुरुंगातली खातो भाकर - भाजी !

या अन्नापुढती  अमृत तृणवत् मजला
त्या कामधेनुचे दूधहि लाजे याला !
- हा निवाराहि या सान कोठडीमधला
अल्हाद देतसे कल्पतरूहुनि मजशी
मी तुरुंगातली खातो भाकर -भाजी !

---

हिंडलगा- केंद्र -कारागृह.
४ ऑक्टोबर१९४८.

---

**५५). गीत -**

---

धिक्कार त्या मृत जीविता जेथे वसे नित स्तब्धता !
ते काय जीवित ज्या नसें अपुली अशी गतिमानता ?

आनन्द काय महान होई गौरिशंकर लंघनी !
- कोणा क्षिती जरि आपदी पुरलेहि जाऊ हिमातुनी!

किती मोद हो नवखंड ते शोधावया निघता - क्षणी!
-कोणास भीति जरी पडू दर्याचिया रुद्राननी !

किती सौख्य हो द्याया लुटू कोठार अधिकारांतले
- कोणास खेद जरी सुळी जावे तयास्तव लागले ?

परि यापरी जगणे कुणी स्वीकारण्या कधी धांवता
'हा काय व्याप वृथा 'म्हणोनि  तयास कां उपदेशिता ?

उपदेशितां (!) ' कर रे खुळ्या ,संसार चौघासारखा
संसार हा तव फाटका तो तूं करी अधिं नेटका !'

सामान्य तुम्ही ! पाहुनी का नाक ना मुरडाल हो ?
- आम्ही असेच पुढे चलू - याही पुढेच , पुढेच हो

'धिक्कार त्या 'म्हणु ' जीविता जेथे वसे नित स्तब्धता ;
ते काय जीवन ज्या नसे अपुली अशी गतिमानता ?

---

माधवपुर - वडगाव प्रकाशित
१४ मार्च १९४९ "चिकित्सक" दिवाळी अंक१९४९

---

## ५६) एक संध्याकाळ -

पवनावरच्या पिसाप्रमाणे ,
वावटळीतिल पाचोळ्यापरि
वादळांतल्या वृक्षासम ,वा
प्रळयामधल्या ब्रह्मांडापरि;
त्याहुनि किंवा अज्ञातातिल
अशाच भयकर अनामिकापरि
विचार -चक्रांच्या वेगावर
भरभर होतो फिरत कुठेतरि,

नुकता होता सूर्य बुडाला
विडा रुचिर अति हलके चघळित
पिकपात्र अन् कुणितरि सेवक
क्षितिजावरती धुवून टाकित ;
अन् जगताच्या गडावरिल या
वृक्षांचे हे पहारेकरी
रात्रीचा देण्यास पहारा
करीत होते पूर्वतयारी -
कुणि कांबळी काळोखाची
पांघरोनिया होते सजले
कुणी धुक्याशी खेळत होते
कुणी जरा बेफिकीर दिसले

मीहि बेफिकिरित समयि त्या
तन्द्रीमध्यें माळावरती
स्थलकालाविण , हेतूविणही
भरकटलेला होतो भरभर !
कुणीतरी मज परी हटकले
अंगावरूनी मम जाताना
चमकुनिया मी क्षणी पाहिले
तो मज दिसले ते पळतांना

"का पळता रे ?" "पाऊस येइल
मेघ दाटले ते बघ तिकडे
तूहि परत चल पळत " कुणितरी
पळतच यापरि कांहि बडबडे

खरेच तेव्हा उत्तरेकडे
घनश्यामल मेघांची सेना
कुरुक्षेत्ररणभूसेनेपरि

व्यापित होती नभ: प्रांगणा

माझेही पद क्षण शिरशिरले
परन्तु नच ते मागे फिरले
- मनच सुकाणू !-वळविल्याविना
तारू तनूचे वळेल कुठले
सौंदर्यास्तव तहानलेलें
मन हे असतें टपून बसलें
रौद्रांतीलहि दाह सोसुनी
वेचित जाते चारूता -फुले !

भयकर होते रूप सृष्टिचें -
ढग ते नव्हते ; होते राक्षस
सैरावैरा दक्षिणेकडे
धांवत होते गिळीत तेजस्
परन्तु मन भय क्षणीं विसरले
काहूरहि पूर्वील  निमाले
गतिहि पूर्विची पावलांतली
मंद होऊनी पद स्थिर झाले

गगनगोल एव्हाना अर्धा
कृष्ण ढगांनी क्रमिला होता
आणिक अर्ध्या गगनांगाला
प्रकाश -चाफा फुलला होता
अर्ध गगन पाहुन मेघांकित
अर्ध गगन मंगल तेजांकित
काय वाटले मनास तेव्हा -
कसे करावे ते शब्दांकित ?

मनी भासाचे फुटले अंकुर  :
अर्धनग्न कुणि राधा अवखळ
स्नानोत्सुक ही नदितीरावर !
- कृष्ण मागुनी ओढी अंचळ!
किंवा येथे दर्शन द्याया
अर्धनारिनट प्रगट जाहले -
गौरकांति ही अर्धी गौरी
अर्धे अन् हे रुद्र सांवळे
किंवा विष्णू : सजुनि मोहिनी
नाचविती हा नव भस्मासुर
अधुन मधुन अन् त्या असुराच्या
विद्युत् चमके कृष्ण - करांवर !
की हा रेडा मस्त धावतो
पोटीं याच्या राक्षस लपला
म्हणून लक्ष्मी  मागुन धावे

शस्त्र पारजुन कापायला

किंवा आहे मुखमंडल तें
कर्पुर -कांती परमेशाचे ;
आणि जटांचा कृष्ण भार हा
मुक्त होऊनी मागे नाचे !

जटांतली त्या अखेर आली
गर्जत गंगा भूमीवरती
तिर्थिं त्या मी स्नात जाहलों
दुथडी भरली आंतरस्फूर्ती

---

माधवपुर -वडगाव
४ एप्रिल१९४९

---

**५७) समर्थ असेल ती** -

---

कां कंकणांची कारिका,नसताहि ' ती कुणि ', नादते ?
आभासमय मधुसंगिताने त्या जळावे मन इथे ?

पाऊल - हलके फूल -कोठिल मागल्या दारी पडे ?
हृदयात त्याचा उमुटुनी ध्वनि, स्वस्थ खग कुणि गडबडे ?

का वाटते अज्ञात ती कुणिं वावरे माझ्या घरीं ?
चलचित्रपट मनचक्षुंना तो चाळवी चकवी तरी ?

प्रत्यक्ष का कुणिं येतसे, अन् का तिच्या या चाहुली ?
परि का समाधानाहुनी बहु आर्तता सामावली ?

किंवा कुणी येणार जी , हे दूत आलेले तिचे ?
परि स्वागतार्ह न हे मूळी : हे मूळ विकृति -वृद्धिचे !

- आशा अशाहि स्थितीत एक वसे मनी चिरफाडल्या :
ये जी , समर्थ असेल ती वारूं अमंगल सावल्या !

---

माधवपुर - वडगाव
२एप्रिल१९४९

---

**५८) मधूवेला ही -**

घडिभर तुज तन्वंगी ! चिकटुनि बसु दे या समयास
एकच घडिभर पथिक इच्छितो मादक तव सहवास

- काम हातचे ?- नशीबींच ते ! सदाच ते मागे !
त्याची भुणभुण यावेळी कां ?- पाहू नको रागे.

वसन्त दारी आज नाचतो गृह हे मोहरलें
आयुष्याच्या क्षण मधुपांना मधु -कण आढळले !

गुंजारव हा त्यांचा चाले सुख - मधू टिपती ते
या गोडीने वेडावुनिया नाचतात भंवते !

मधुवेला ही आजची प्रिये , तुजसह रमण्याची
एकमेकांसमोर बसुनी नयनी प्यायची ;

झिंगुनि घडिभर , नीरस काळां विसरूनि जाण्याची
जीवनांतले गीत -घडे अन् रिक्त करायाची !

---

माधवपुर - वडगाव
२९मार्च१९४९

**५९) केळ वाढली जोमानं!**

केळ वाढली जोमानं ग केळ वाढली जोमानं
न्हाण्या -धुण्याच्या पाण्यानं ग केळ वाढली जोमानं
केळ वाढली जोमानं ग कोण पाहतं रोखून
कोण पाहतं रोखून ग परसदारच्या रोखानं !
सारी नवलाई ,बाई नवलाई
ग नवलाई ,ही नवलाई !
या नवलाईनं जीव गेला येडावुन
जीव गेला येडावुन ग केळ वाढली जोमानं !

आणि कुठल्या मोहानं ग जीव गेला लोभुनं
वाटतया चावुन ग टाकु कुणां खावुनं
टाकुं कुणां मुर्गळुन ग फेकू कुणा पिंजुन
सारी दांडगाई बाई दांडगाई
ग दांडगाई ही दांडगाई !
या दांडगाईनं उठवलं माणसातुन
उठवलं माणसातुन ग केळ वाढली जोमानं !

---

माधवपुर -वडगाव
९मे १९४९.

## ६०) आज सतत मज गावे गमतें

आज सतत मज गावे गमते !- का कोणाला ठावे !
भोंवतांलचे सारे माझ्या मधुसंगितमय व्हावे !

लय तालासह मनोहारिणी एकसंध स्वरमिळणी -
साधुन ,मादक गात रहावे सन्निध अथवा कोणीं !

ती लयलूट स्वरांची हृदयी सामावित पहुडावे
लुटत लुटत आनंद ,स्वतःसच आनंदा लुटु द्यावे

जड शरीर ! परि फुलाहूनही हलकें हलकें फूल -
वाटे अजि , हा अनुभव अभिनव अननुभूत अतिखोल

हवेवरी मी अहा चढत हा ! सुखद किती या लहरी
प्रसन्नतेची इथे पसरली प्रशस्त सुंदर नगरी

हाती आली तारापुष्पें ! स्वर्गंगेचें पाणी -
ओठी माझ्या !- हृदयामध्यें गाणी, गाणी,गाणी !

माधवपुर- वडगाव
२ऑक्टोबर १९४९

## ६१) सापडलों मी व्यूहीं हो!

सापडलों मी व्यूहीं हो !
मार्ग मला माझाच कळेना
दिशा अशी मज मुळीं दिसेना
प्रकाश कोठेंही उजडेना
अगतिक केवळ झालो हो !

हृदय आज हे सुनेच सारे
इथे विचारांचे नच वारें
- काहीसे हृदयात गुद् मरे
व्याकुल केवळ झालो हो !

पान नवे उलटावे गमते
' नवे ' न परि निश्चित आकळते
- येणे तगमग नवीच होते !
कासाविस मी झालो हो !

प्रकाश दावा , प्रकाश दावा
मार्ग मला मम होवो ठावा
इष्टाचा निश्चित मागवा
अति त्वरित मजा लागो हो !

ना तरि जग हे हिडीस होइल
चोयटीच ते ठरेल निव्वळ
माझीसुद्धा माती होइल
तारा यांतुनि आता हो !
निष्ठुर काळा ! काय तडाखा :
काय तुझा हा सूड अनोखा :
-कळू नये व्यूहहि कसला का ?
भेद कसा मग त्याचा हो ?
सापडलों मी व्युही हो !

---

माधवपूर -वडगाव,
३ ऑक्टोबर१९४९.

---

### **६२) रडणेहि एक लाजच** !

---

हृदयांत व्याप्त आसूं ; परि ना खुले रडूं ये
हृदयात त्वेष खवळे ; परि ना प्रहार करुं ये

- ना ये प्रहार करता ; येवो न तो बिचारा
परि का रडू न द्यावे ? हा कोण कोंडमारा ?

डोळाहि भैरवाचा तिसरा उणाच जेथें
अमुचा प्रहार दुबळा करणार काय तेथें ?

परि तोहि योजिण्याचें आहेच दिव्य भारी ;
-वरती, रडावयाची होऊन जाय चोरी !

त्वेषे प्रहार करणे येथें मुळीं अशक्यच !
एकांत साधुनी वा रडणेहि एक लाजच !

---

माधवपुर -वडगाव
१३डिसेंबर १९४९.

---

**६३). रंग लुटा हो** !-

---

रंग लुटा हो , रंग भरा हो ,उधळा रंगच रंग
सौंदर्याने तटतटले हो,अंग ,अंग, प्रत्यंग !

कदर जगाच्या कां डोळ्यांची
उघडझाप जरि मिश्किल त्यांची?
का न तुम्ही बेगुमान , काय न छन्दामध्ये दंग ?

हातहि टाकिल जग अपुल्यावर ?
भयास असल्या तरि कां अवसर ?
का न आपुली जिवन्त रग ,का निष्ठा नच निसंग ?

उरांत ज्यांच्या उसळे उबळ
धडपडते जगण्याचे गजबळ -
त्यांचा त्यांचा मार्ग निराळा , त्यांचा न्यारा चंग !

वेढा देती जरी बंधने
दृष्टि तयांची कुठली चळणे ?
धडक मारिता पिसति अडथळे ,अथवा त्यांचे अंग !

असे विधीनें ढील दिलेली
पतंगास या चिन्ता कसली ?
आकाशी या गिरक्या घेऊन, खुलवु मनाचे रंग !

संगरात जर खचायचे मन
तुम्हीहि सरला ; सरले जीवन !
तसे नका करू ! सुंदरतेचे लुटा अंग प्रत्यंग !
रंग लुटा हो , रंग भरा हो ,उधळा रंगच रंग !

---

माधवपुर - वडगाव
२५जानेवारी१९५०.

---

**६४) 'ठीक सारे' म्हणावे -**

---

कास ही बंधने बांधुन घेशि तूं ?
- मात्र काया तुझी जखडिशी तू वृथा ;
सहज - गति अडविशी ; ओघ आवरोधिशी -
अडमुठेपण तुझे ,-छे; तुझी रड -कथा !

रडकथेवर अशा आणि जग नित्य हे

पांघरूण शब्द -पट रेशमी घालिते -
क्षुद्र काळी किटे झांकुनी ......सजविते !
त्याहुनी अन्य ना चरित  तव वाटते .

दिन दुबळेपणा दडवूनी ,नाटके -
अल्प नाहीत कांही जगी चाललीं !
धैर्य - सम्राट झाला पदच्युत , तशी
श्वान -अवलाद गादीवरी बैसली !

आज जर प्रेम तू जाशि लाथाडूनी
आणि उज्वल ,महा शब्द नादावुनी
तव कृतीचें समर्थन करू पाहशी
नाटकीं त्याच ही भर नवी मानुनी -

मार्ग जाईन मी आक्रमित आपुला
आणि डोळे उदासीन पाहून हे
प्रश्न टाकील मार्गात कोणी; तरी -
'ठीक सारे'  म्हणावे ! समाधान हे !!

---

माधवपुर - वडगाव
२८मार्च १९५०

**६५) तारुण्याच्या प्यार पांखरा** !

तारुण्याच्या प्यार पाखरा , लक्ष्य कोठला देश ?
झांपाया कुणिकडें पंख तव स्फुरती आज सावेश ?
उजळणार जी कुणी उंबरा , फुलविणार संतोष -
घेऊनि जाया काय सज्ज तू  तीप्रत  हृद्संदेश ?
तारुण्याच्या प्यार पाखरा -

तिला म्हणावे " 'ह्याला 'करशील तू अपुला हृदयेश
असावीच 'तू ' रत्न , अशा , 'हा ' सकंप धरि इच्छेस !
सशंक, कातर  हृदयी घेई ' हा ' चाहूल हमेशा:
आढळेल तकलुपी ? बेगडी ? खळाळ निव्वळ ?फेस ?
श्रान्त , क्लान्त  यामुळे हृदयि  'हा ' बघू शके न उषेस ;
धडपडतो पदि अडखळतो 'हा ' तडफडतोहि  विशेष !
तारुण्याचा प्यार पाखरा-

. तिला सांग " खेचतील क्लेषांचे दुःशासन केश
तरीहि येथे स्वागतायचे  निष्ठेने दिन शेष.
हताश- चिखलीं फुलवायाचे सुख- कमळांचे कोष
सुन्दरात एकंदर अंती ठेवायाचा अंश
जीवनघनिंच्या त्याग-जलाने शिडकावित उन्मेष
गाठायाचे संसृतीचिया विशाल ,दिव्य शिवेस ! "
____माधवपूर -वडगाव १४मे १९५०

**६६)तरिहि भरे अजुनी न हस्त मम**!

तुझ्या कृपेच्या आकाशी या सुपर्ण झेपावत मी निर्भर
तुझ्या व्योम -नर्मदेमधें नित जलक्रीडारत मी सहस्त्रकर
नृप शोभे मी सिंहासन-स्थित मिरवित  तव नभछत्र शिरावर
तुझ्या गगन-अंड्यात जीव शिव मी वर्धिष्णु असे अति सुंदर!

घट देहाचा नाशवन्त हा रिता करिशि ,भरशी वरचेवर -
खेळ तुझा ?आनंद तुझा ? यापरि करशी तू मज अजरामर!

सान वेणु ही तुवा वाहिली वनरानांतून दरिकुहरांतुन
आणि फुंकुनी प्रस्फुट केली स्वरावली नितमधु , चिरनूतन

अमृतयुक्त  तव करस्पर्शने इवले मम काळीज उमलतें
असीम आनंदांत बुडुनिया निगूढ काही कूजन करते

तुझ्या कृपेची वृष्टि  अरोधित अनंतहस्ते अंजलीत मम !
-युगे उलटती - वर्षतोस तू -तरिहि भरे अजूनी न हस्त मम!

माधवपुर -वडगाव
१७  मे१९५०             "गीतांजली"स्वैर अनुवाद

**६७). पर्जन्य त्याना गावयाला लावणार होता**!

असेल सुकुमार , राजबिंडे तुमचे नव्हाळ तारुण्य
असेल रग ,मस्ती अनुभवलेली
असेल चुंबिले , कुस्करलेले ,
लाभलेले तुम्हा - म्हणून झालेले 'तुमचे'- सौंदर्य
निःसीमा सौंदर्य ;
तर तुम्हाला हे म्हणता येईल :
'जयापरी आम्ही सौंदर्य प्राशिता बेहोश झालो
झालो  अनिवर
तयापरी मोठ्या पर्जन्याच्या धारा
मोठ्या उन्मादाच्या मोठ्या जल्लोषांत
पृथ्वीचे अंगांग चुंबित होत्या !

अथवा असाल भारतामध्ये या
दुर्दैवी परंतु चिवट ,चिकट ,मुर्दाड भारतीं
स्वातंत्र्योत्तरहि भुकेने पिडलेले ,वखवखलेले
पोट पाठीला चिकटलेले
काळ्या बाजाराचे ,नफेबाजाराचे ,
आंतरराष्ट्रीय कीर्तिबाजाराचे भक्ष ठरलेले

तर तुम्हाला हे म्हणता येईल :
' जयापरी आम्ही अन्नाच्या मागे:- नव्हे अन्नकणाच्या-
आहो वखूवखून ,
आढळता आणि कोठे अन्नकण
तुटून पडतो आवेशे, आवेगे
तयापरी महा पर्जन्याच्या धारा
महान भुकेच्या महान आवेगे
पृथ्वीचा गोळा हा चघळीत होत्या ! '
असेल किंवा मन भावनाप्रवण,धेयाचे पूजक,शिवाचे उपासक

असाल ' जगाच्या कल्याणा विभूति '
मृत्यूला खद्‌खदा हासून जगणारे
मुक्त फिरणारे मृत्यूलाच पुरून
तर तुम्हाला हे म्हणता येईल
'जयापुरी आम्ही अग्नीवर उड्या धेयास्तव टाकता
बेहोश झालो
झालो अजिंक्य ,अमोघ ,अस्खलित ,असहनीय
तयापरी संतत पर्जन्याच्या धारा
संतत आसक्त ,संतत धारेनें
धरेचा भूभाग जिंकित होत्या !

अरुणोदयाची वेळ ती होती
परंतु कोठला अरुणोदय ?
आकाश फाटून पडत होते :
ढगांचे राक्षस
अक्राळ विक्राळ दाटले होते ;
नभाच्या साम्राज्यपदावरूनी
अरुण होता जाहला च्युत .
कुठले पक्षांचे स्वागत -गीत ?
कुणाचे स्वागत करणार ते ?
चिंब जाहलेले बिचारे कोटरी
अंग कवळीत ,आकसत होते.
स्वागत गाऊन त्यांनी करावे कसे
आणि कुणाचे ?
ज्याने सुख दिले तोच च्युत झाला
अशा वेळी कसा कंठ फुलणार ?
'चालव पर्जन्या ,सपाटा तुझा हा
कितीहि वर्षालास
तरी थोडेच आम्ही गाणार आहो ?'
-असेच जणू तया म्हणायचे होते
समजून हेतू हा पर्जन्य मात्र
'गावया लावीन तुम्हाला ' म्हणून
आपल्या शक्ति एकवटून
प्रतिज्ञा पूर्वक एकच कहर करीत होता

दुसऱ्या दिवशी.......
बिचाऱ्या पर्जन्याला
सगळे पक्षी
त्याच्याच महान पुराच्या प्रवाही
मरून वाहताना आढळून आले !!

माधवपूर -वडगाव
२३जुलै.१९५०

## ६८). माझा धर्म निराळा -

माझा धर्म निराळा हो , माझा धर्म निराळा !
का मज आतां उगाच छळतां ?अन्य जखडिता दाव्याला?
फुलाहूनही फुल असे मी , मूर्तिमंत जणू कोमलता
नख लागे जरि मृदुतर तुमचे रक्ताळत मम देहलता -
फरफटण्याचा परंतु नयनी तुमच्या भाव दिसे जळता !
आवरून घ्या या क्रौर्याच्या लळलळत्या भीषण ज्वाळा !
माझा धर्म निराळा हो माझा धर्म निराळा!

मी स्वप्नांचा राजा राहे निर्मुनिया दुनिया न्यारी
त्या दुनियेच्या आकाशी मन मुक्त भरारावे लहरी ;
संधानाचे परंतु नयनी तुमच्या विष खेळे जहरी !
नका पेटवू चूड राहुनी दुनियेच्या खालींच तंळा !
माझा धर्म निराळा हो माझा धर्म निराळा

माझ्या उदरी वाढत आहे बीज सर्व -कल्याणाचे
मज जपणे आवश्यक व्हाया पालन- पोषण गर्भाचे;
- कुस्करण्याचे परंतु नयनी नर्तन नाना रंगाचे!
प्रकाशवा हा खुनशिपणाचा तम किटला काळा , काळा! -
माझा धर्म निराळा हो माझा धर्म निराळा

तुमची दुनिया , लंका तुमची , तुमचे धन लखलाभ तुम्हा
त्यासाठी नच जन्म घेतला ,ताप तयापरि तोच महा
तेच लादण्या परंतु तुमच्या नयनी सजली क्रूर स्पृहा!
डोळ्यांच्या त्या गुहा ,आवरा क्रूर विकारांचा मेळा
माझा धर्म निराळा हो माझा धर्म निराळा

माधवपुर- वडगाव
२६ सप्टेंबर १९५०

प्रकाशित
'कल्पना' प्रथमांक
१५ऑगष्ट १९५१

**६८) पतंग**

---

अंधारी ही कुठली जागा ?
प्रकाश येतो कोठुनी फिका ?
-खिडकी कां ती ? छान !आणि ही
खोली आहे तुझी बालका ?
ऐट  तुझी ही आणि केवढी !
ब्रम्ह्याचा आवेश ,आव हा !......
" तयार झाला पतंग !"....हो का ?
काय बांधिशी हे मम देहा ?
"सूत्र घालणे कठिण बब्या ,बघ --"
अस्से ? आता कोठे नेशी ?
"बब्या , बने ,हं, चला जाड्या
पतंग उडवू ; गंमत खाशी !"
अबब ! केवढे विशाल जग हे ?
कुठे जगी मज सोडणार या ?
वाऱ्यावर ?त्या ढगात ? तेथे -
निळ्यात त्या ? छे, नको ;परत न्या !
ऐकावें कुणि माझे आता ?
परंतु गंमत खरीच तर ही
चढलो सरसर किति वेगाने
मधेच गिरकी डौलदार ही !
अहा ! वायूवर नाचनाचतो
मधेच थोडा कुठे फाटतो
कुठे दंवाने ओला होतों
कुठे उन्हानें ताठर बनतो !......
खेंच !खेंच मज ! वा ,वा !आता-
उंचावर या वादळ नाही
संथ, शांत मी ! स्थिर संतत मी !
'सर् सर्' नाही , गिरकी नाही !......
अरे, परंतु काय जहाले ?
कसला हिसका ? काय चालले?
पुढे पुढे मी कुठे चाललो ?
जग हे मागे मागे उरले ?
कुठे असे तो सूत्रधार मम ?
कौतुकयुक्त ती मुद्रा कोठे ?
इतके मज स्वातंत्र्य कोठले ?
आणि पुढे तम ? कोठे?... कोठे ?....

---

माधवपूर - वडगाव.
२२ ऑक्टोबर१९५०.

**६९) हरपला पोलादी पुरुष !**

भारतमाते , मूर्तिमंत तव शक्ति आज खचली
पोलादाची तुझी मनगटे आकस्मिक पिचली !

तुझ्या गळ्यांतिल निखळुन पडला तेजस्वी तारा
सुना , रिकामा तव भाग्याचा झाला देव्हारा !

मूर्तिमन्त जणु राष्ट्रभक्तिची मानच मुरगळली
राजकारणी चतुराईवर ग्लानी कोसळली ?

अंधाराला उधान भरती उसळूनिया आली
दिशादिशांना दुर्दैवाची खिंडारे पडली !

तुझ्या उरी ही किती थोरली खोल खांच पडली
काळाची त्या निष्ठुर ही नव टाच एक रुतली !

स्वातंत्र्याच्या गरुडाचे क्षण अडले उड्डाण
अनिर्बंध या वाऱ्याचाही गुदमरला प्राण !

मनुष्य पशुंनी भूकंपांनी उघडे केलेले
जन निर्वासित आज खरोखर निर्वासित झाले !

अभय हस्त तो , वरदहस्त तो , पोलादी हस्त
एकाकी अदृश्य जाहला काळसागरात !

शब्द निश्चयी ध्वनी करारी , कणखर आवाज
-वज्राचा जणु प्रहार !-झाला क्षीण मुका आज !

जाइ महात्मन् कास रडावे तुझ्याच रक्ताने
येई जन्मुनी पुन्हा नव्याने आमच्या जन्माने !

माधवपूर -वडगांव
१५डिसेंबर १९५०.

प्रकाशित
'प्रेरणा ' साप्ताहिक
१८डिसेंबर १९५०

**७० ). माझ्या खिडकीतून**

ती झाडी , ती रम्य वनश्री ती तरुश्रेणी , वृक्षालि ,
त्या विटपांच्या मागे वसली गांव-घरे ती  इवलाली ;

त्या गांवाच्या पुन्हा मागुती तशीच राईची रचना ,
घरे वेढिली तशीच जणु ती कुशीतला छकुला तान्हा !

या दृश्याला उठाव आणित निळे मागुती हले ,झुले
कधी शुभ्र , कधी नानारंगी , कधी शाम ढगमाळ फुले !

- या चित्रातिल प्रकाश -छाया हिरवी, गहिरी सजीवता
सारे काही कसे  संयमित!अभिजातच ही सुंदरता

कोठे थोडे ऊन सांडले पानफुलांवर हंसणारे
कोठे दडली दाट सावली कुशीत तरुच्या स्नेहभरें !

'हिरवी ' चे तारण्य झिळमिळें अवखळ वारा सळ्सळता
  कुठे एकटी वठली फांदी आढळते बघता बघता-

जणू नवथर संसाराच्या अन गभीर वैराग्याच्याही
सर्व भोग उपभोगून आल्या तृप्तीशांतीस्थैर्याच्याही -

- सकल छटांच्या रंगसंगती या चित्रांमधि साधुनिया
सर्वंकष सौंदर्य मूर्त हे उभवियलेले या ठाया !

असे चित्र हे जिवंत माझ्या खिडकीमधूनी लटकियले
काय प्रयोजन अन्य कागदी चित्रांचे येथे उरले ?

---

माधवपूर -वडगाव
२७ डिसेंबर १९५०

---

### ७२) तू-मी मिळूनी -

तू-मी मिळुनी गातां गाणीं सूर सूरी जुळवुनी
उजळेल उषा जीवनी !

तू-मी मिळुनी,हात गुंफुनी ,क्रमिता दिनयामिनी
येतील बहर जीवनी !

तू-मी मिळुनी चरण बळ उचलुनी धूळ तुडविता क्षणीं
स्त्रवतील रागरागिणघी !

तू-मी मिळुनी एक चिंतनी जातां 'मी' विसरुनी
प्रगटेल श्रेय लोचनी !

तू-मी मिळुनी रंग मिसळुनी देता शिडकावुनी
सुन्दरता होईल दुणी !

तू-मी मिळुनी शिळा निवडुनी चालविता वर छनी
हांसेल कला कंचनी!

तू-मी मिळुनी जाता विरुनी सान्ती तम भेदुनी
राहिल किरण मागुनी !

---

माधवपूर -वडगांव
४जानेवारी १९५१.

---

### ७३). तुझेच कर भोवती माझिया -

तुझेच कर भोंवतीं माझिया -
नसता सन्निध , दृष्टीपथी वा तव काया -छाया !

मीन जसा जाळ्यांत सापडे
जसा रेशमी कीट गुरफटे !
तुझ्या स्मृतींच्या कोशामध्ये सुख गवसे ह्रदयां !

प्रीतीचा हा प्रपंच असला;
'मी'विरुनी तवरूप जाहला!
तुझ्या -विना मी?-आत्मा कुणि जणु नसताना काया !

-रंग-रुप का तयास कांही?
सुंदरतेचे शिल्पहि कांही ?

तालबद्धता कुठली ?-सारे बेतालच वाया !

तुझ्याविना हे कसले जगणें ?
जगणे कुठले प्रेत सजवणे !
तवसंगे परि मृत्यु जिंकुनी स्मशान ये फुलवाया !

केविं तुला यावे विसराया ?
तुझेच कर भोवती माझिया-
नसता सन्निध, दृष्टीपथी वा तव काया - छाया !

---

माधवपूर-वडगांव. २७फेब्रुवारी १९५१

---

**७४)या जीवनाच्या सुंदरतेचा –**

परडी फुलांनी भरुनी ये फुलमाळी तव दारी
तू येउनी फुलराणी , सामोरी ती स्वीकारी !

मधुऊब शेजेची
अति गाढ झोपेची
झटकून परिभ्रमला धुक्यांतुन हा दिशा चारी
अन् पातला सोत्कंठ तुझिया आज प्राकारी

की एकही फूल
जर भृंग चुंबील
तर सेवना राहील पात्र न -भीति ही जबरी !
-अनमोल जिवेभावे जमवियली फुले सारी !

वृक्षालि भंवतींची
झुलवी पवनवीची
पानावरी त्यांच्या दंवाची माणके भारी -
या जीवनाच्या सुंदरतेचा येई , मान करी !

रथ दिव्य अरुणाचा
पूर्वेस यायाचा -
झाला समय ;रंगायचा ' रसराज' मनहारी -
या जीवनाच्या सुंदरतेचा येई , मान करी !

ही वेळ जर टळली
की संपली सगळी !
सुकतील पुष्पे , बसतिल माफक निर्घृण बाजारी !
चुकली फकीरी येईल भाळी , रुळली चाकोरी !

---

माधवपुर -वडगाव २६जानेवारी १९५१.

## ७५) भाव - कणिका

ये वायुमंडली पसरूनि पंख सुपर्ण
ये अमृत जिंकुनी ; धरुनि सार्थ अभिमान ;
ये एक एक ग्रहगोल टाकुनी मागे
परि पृथ्वीवरती येता थबकुनि राही :
अभिमान गळे जंव येथ ' मराठी' पाही

*

होऊनिया पुतळा सकल गुणांचा आता
नच वाटतसे तुजपुढती द्यावा कित्ता !
परि होवुनि केवळ सान जलाशय स्वच्छ
प्रतिबिंब जसेच्या तसे तुझे दावावे
ते मंगल ?- ओंगळ ?-तूच सख्या ठरवावे !
(२७सप्टेंबर १९४६)

*

कंगाल बघूनि हा दयार्द भगवन् ! झाला
अन् लाख करांनी सुवर्ण घेउन आला ;
झोळीत दान ते ओतुनि झाला गुप्त
-परि उचलित असता जीर्ण फाटली झोळी
कां दयाहि तें विच दलित अन्तरा जाळी ?
( १२ऑक्टोबर १९४६)

*

"वाटे न जगावे तव प्राणांच्या मोले !"
- हे शब्द न : कानी कढत तेल ओतियले !
- ही सद्गति माझी परमानंदच माझा
की , भरता भरता जीवन तुझिया धामीं
हक्काची तनु ही माझी यावी कामी
( ९ जानेवारी १९४७)
(प्रकाशित सत्यकथा ऑक्टोबर१९४८).

*

प्रेमिक हे आम्ही दृष्टिसुखास भुकेले -
अपुरेच पडावे युगभर दर्शन घडले !
परि कधिमधि येता समोर जीवन - मार्गी
क्षण एकहि , पुरते मिळती नच हे डोळे;
तू सखे ; लपविशी अपुलीं निळसर कमळें !

ही उषा - निशा : ही आशा आणि निराशा
हे सौख्यदुःख : हे मधुकटु :असल्या वेषा -

परिधान करूनिया जीवित येते दारीं
- हे वैचित्र्यच जर जगण्याला या नसते
कधि मानव -जीवित काव्याने लावथवते?

*

दावीत धरेला अपुला दिव्य प्रकाश
ग्रहतारे होते करित तिचा उपहास
हो खिन्न बिचारी वसुधा ,तेज न अंगी !
परि निमिषीं तिजला स्मरले कांही -खुलली ,
अन् मानव - रत्नें तीहि दाविती झाली !
(२८मार्च१९४९ )
(प्रकाशित 'हंस' मार्च १९५१)

*

मी अशाच एका पिठूळलेल्या रात्री
काहूर शमविण्या गेलो सरिता -तीरी
जळ ल्याले होते साज उरी तारांचा
ते वैभव विरले शिळा टाकितां त्यांत
- पण क्षण एकच अन् क्षणी पूर्ववत् होत !

*

उठताच गर्जना हृद्भेदकशा भंवतीं
वन सर्व हादरुन वनचर कांपत पळती
त्या मधेच दिसले गव्हर एक निवांत
निष्पाप जीव ते आश्रय घ्याया रिघले
तो क्रूर चमकले तेथहि आंतुन डोळे !

(प्रकाशित " हंस" फेब्रुवारी १९५१)

*

नवधारा या , सर पहिलिच वळवाची ही
थेंबातुन असतिल हिच्या धूलीकण कांही
परि हीच करितसे वातावरण प्रसन्न
शमविते जीवाची तगमग दाहि दिशाही;
अन् वर्षर्तूचें कुशल निवेदुन जाई !

(प्रकाशित "नवधारा")

*

पूर्वेवर फुलले चंद्रबिंब पाहून
कवि करी कल्पना ' चेंडू खेळे कोण!'
तितुक्यात 'चंद्र ' हा शब्द कुठुनसा आला
ते असेल ' कवितागायन' म्हणुनी देखी
परि चंद्रा पाहत 'भूगोलच 'कुणिं घोकी !

(१६ मार्च १९४९)

*

पाठीवर घेऊनि चराचरांचा कबिला
दैनंदिन धावें कुठें धरेचा गोळा ?-
तो जातां कोठे कुणां न ठाउक कांहीं
परि सूर्य निशिदिनी कक्षी त्याला फिरवी .
-कुणि जीवित अमुचे जडवी , घडवी , सजवी ?

*

गे तुला समर्पित जीवित माझे झाले !
मन तुझ्यात बुडले, ' मी 'पण माझे विरले
मज नित्य प्रभाती जाग लोचनी येतां -
तव नाम हृदयिच्या कमळांतुन मुखिं स्फुरते !
- प्रातःस्मरणीय केवि न म्हणणे तूते !

(२३ फेब्रुवारी१९५१)

---

## ७६). - हा जीवनपथ

तव नजरेचा अमोल , नाजुक
नजराणा सखी, मला पोचला ;
हृदयींच्या रसराजाला क्षणि
भाव आगळा तव आकळला !
तदाच माझ्या नजरेकडुनी
आमंत्रण तव हृदयां गेले
सुस्वागत तव करावया अन्
रोमरोम मम फुलुनी सजले ,!
तनूत माझ्या विजेप्रमाणे
तळव्यापासुन आमस्तक हे
तुज केलेले आवाहन सखि ,
सळसळुनी जलदीने वाहे ,!

परंतु तू हा आरंभियला
नवीन असला डाव कोठला ?
- डाव नव्हे तो , ते बुजरेपण ,
ज्याने माझा जीव चालला !

नुक्ते होते ,संच जुळवुनी
स्वर कुंडातुन फुलत चालले
एवढ्यात ते - काय म्हणावे -
अर्ध्यावरती सखि अडखळले ?
नयनांच्या अति सुरेख रेखा
रेखित रेखित फिरे कुंचला
तोच, चित्र ते हसण्यापूर्विच ,
मधें अचानक केंवि कुठला ?
रूमछुम रुमछुम झंकारित सखि,
पदपीठावर पाऊल फिरले
नृत्यलता तिथ फुलण्यापूर्विच
काय म्हणुनि ते खिळून बसले ?

जगण्याची ही कला अशाने
कधी पूर्णता सखि पावावी ?
कधी जीवने आत्मानंदी
एकरसाने विलीन व्हावी ?
पहायचे तर धिटाइने बघ
म्हणायचे ते धिटाइने वद
करायचे ते वेडाने कर -
मस्तकि चढु दे वेडाचा मद !.....
तरीच रंगुनि जीव - कलेने
हसेल कोरा जीवन - कागद !
जरा धिटाई , जरा लढाई
जरा चढाई - हा जीवन -पथ !!

---

माधवपुर - वडगाव प्रकाशित
२० ऑगष्ट १९५१ "प्रेरणा "
वर्षारंभ विशेषांक २ ऑक्टोंबर १९५१

---

**७७ ) तुझिया या नयनांत -**

---

तुझिया या नयनात गौळणी, मैत्रिणी
निराळेच चमके पाणी !
भाव तयांतिल सखोल सगळा
माझ्या हृदयाला आकळला !
-मुग्ध कळीचा कोश उमलला

घमघमला केवडा मनीं !

परन्तु सावध उचल पाऊलें -
निश्चयपूर्वक अपुलीं बाले !
पुढचे पाउल पुढेच पडले -
असेच होऊ दे तरुणी !

प्रीतीचा या अर्थ जाणुनी
इथेच घेई अजाण हरिणी !
ना तर मार्गीं मधेच बुजुनी
जाशिल जीवन-पथ चुकुनी !

प्रीतीस्तव नित समर लढविणे
प्रीतीस्तव कधी लागे मरणे !
झुंजारानिच म्हणून धजणे
प्रीत कराया या भुवनी !

साहस असलें असेल लंवही
तर प्रीतीची उघड तू वही ;
पहिल्या पानावर चल लिही -
प्रीती -अक्षर मधु हासुनी !

---

माधवपूर -वडगाव
९सप्टेंबर १९५१

---

**७८). मन,श्रद्धा बुद्धी पुन्हा निराश्रित झाली!**

---

तुज तुझ्या जगानें वेढियलें, पाहियलें :
मन निश्वसले हळु : 'बरे 'जाहले ,झाले ! '
श्रद्धाहि बोलली : ' सर्व बऱ्यास्तव घडते '
हो ठीक ठीक: नच जुळले अपुले नाते !

तव विश्वसोबती ' पहिल्या वर्गा 'मधले
तव जीवन त्यांच्या ओलीने हिर्वळले !
हा रथ अवजड मम धुळीत , फुफाट्यांत
प्रतिकूल आतपी उभा जीव मम येथ !
तव कक्षा न्यारी : सीमा माझी न्यारी
तव फुले सुगंधी : मम केवळ कांटेरी !
सुखफळे तुजपुढे प्रत्यक्षी राशीनें
कोंडा मज ; मांडा झाला तर भावाने !

जुळते जर नाते मीलन नच तें ठरते
जल -अग्नि -मीलनी विकसन कधि संभवते ?
विपरीत मिलनी सुकणे - विझणे फक्त
बाहेर -आतुनी अशांति तेथे नक्त

बुद्धीला पटले : ' सर्व बऱ्यास्तव घडते ;
हो ठीक ठीक ! नच जुळले अपुले नातें ! '
इतुक्यात मारुनी प्रीत चोच हृदयांत
करि जागर : ' लोपे द्वैत प्रीतिप्रीतींत !
तक्षणी दुखावे जखमेवरची खपली
मन ,श्रद्धा ,बुद्धी पुन्हा निराश्रित झाली !

---

माधवपुर -वडगाव. प्रकाशित
९नोव्हेंबर १९५१ 'कल्पना 'डिसेंबर १९५१

---

**७९) 'नसला'च मी पहिल्यापुनी !**

---

'उध्वस्त ' शब्द न यापुढे लटकेल ओठांना कदां
जे व्हायचे 'उध्वस्त 'ते झालेच आहे एकदा !
जरि वादळे घोंगावली ना 'वादळे' गमतील तीं
घोंघावले आहे असे अतिघोर वादळ मागुती !
माझ्या तनूस जितेपणी डंखून गेल्या 'यातना'-
नरकांतल्या ! नच राहिल्या मज आज त्या कविकल्पना.
' संहार 'तो कसला अता होणार आहे यापुढे ?
संहार- नाटक रंगले : मी त्यातलेच जिते मढे !
अनभिज्ञ ना मी राहिलों 'प्रलयास' ही सर्वान्तक
हो 'आदि' लाच मला विलक्षण तो पसारा ठाऊक !

*. *. *. *. *

मंगल जगाचे नव फुलें नयनी तुझ्या 'आश्वासन'
आश्वासनांची ही मुळांतच राहिली मज आस न !
" समृद्धिशांति 'पुन्हा मला तव हस्त हा देऊ करी
मी 'शून्य बाकी 'आज ; ती पसरेल तव सुंदर घरी !
जा दूर जा ! वाऱ्यासही माझ्या मुळी राहू नको
घरकुल तुझे राहो अबाधित ! साहसी लोटूं नको !
दुःखी न मी : इतुके असूनहि मी खराच न दु:खित
इच्छी न मी लंवही दया ! माझे कळे मज जीवित !
- स्थितप्रज्ञ कोठिल ? काय ही करिशी इथे भाषा जुनी
स्थितप्रज्ञ तो 'असुनी' नसे ;'नसला' च मी पहिल्यापुनी! ______________________________ माधवपुर- वडगाव
९नोव्हेंबर१९५१.

---

**८०) आपण आता दोघे झालों** !

आपण आतां दोघे झालो !
दोघे असुनी एकचि उरलो !

जीवित इथले निगूढ कोडें
उलगडेल ना त्यातिल थोडें ?

सखे , आपुले मीलन घडतां
येइ्ल ना जीविता पूर्णता ?

समाधान - शांतीची जोडी
वाहिल ना सदनांत कावडी?

स्वप्ने भिरभिरणारी भंवती
अवतरतिल ना अल्गद हाती ?

मी तर येथें ह्रदयी कातर
काय तुझेही असेच अंतर ?

मलाच माझी पुसते कविता
"कराल ना मंदीर जीविता ?"

जीवकलेची आपण बनुं ना
कलापूर्ण नवनवीन रचना ?

---

माधवपूर -वडगांव
६ एप्रिल१९५२

---

**८१) स्वप्नांनी सखि ,निशा बहरली** !

स्वप्नांनी सखि , निशा बहरली !
नयनीं सुमनें मृदु कुस्करली !

महाकवीची प्रतिभा फुलता
समूर्त झाली उत्कट कविता ;
त्या कवितेतिल तू -मी सजलो दोन ह्द्यतम ओळी !

सहज  सहलता , दूर गिरीवर
दोन बिलगले दिसले तरुवर
हळूहळू ते अदृश्य होउनी रूपे अपुली हंसलीं !

जलवन्तीच्या प्रशान्त पृष्ठीं
नौका दो करिती गुजगोष्टी ;
तू -मी तर त्या नौका सजवित वलयकला भंवताली !

अवचित आले अंधारुनि नभ
खगोल झाला क्षणात निष्प्रभ
तारे एकीकडुनि उदेलो तू -मी हांसत गालीं!

प्रखर उन्हाने म्लान वसुमती
जीव जिवाणू व्याकुळ दिसती
तू - मी झालो गडद निळे ढग ,वोळित अमृत खालीं!

मानवतेस्तव किती महात्मे
लढले झिजवित अपुले आत्मे
तु-मी त्यांचे अखेरचे दो अश्रू वेळोवेळीं!

---

माधवपुर -वडगाव. १०एप्रिल १९५२ प्रकाशित "कल्पना" दिवाळी अंक १९५२

### ८२) नटेन नवनव रूपीं ग !

नटेन नवनव रुपीं ग
तव सुन्दरता बाह्यांतर्गत लाख तऱ्हांनी टिपेन ग !

मखमलीचा मऊ मऊ सुन्दर
कचसंभार तुझ्या डोईवर
वीज त्यातली कुरवाळिन मी पुष्प सुगंधित फुलून ग !

तुझे सुरेखित विलोल डोळे
जणु रसरसली ताजीं कमळें ;
तींत निशीथीं मिटतां राहिन रसिक रंगला अडकुन ग !

अधर तुझा -ज्यातुन स्मित फुलते -
पक्क तोंडले रसरसले ते !
जरा फोडुनी , जराजरासे चाखित शुक मी राहिन ग !

मोहरलेली तव देहलता
पेटुन उठते मिठीत घेता
एकरूप मी होइन तुजशी , बनून इंधन ज्वलन्त ग!

तव हृदयीं तर अमृत भरले
- देवानी का तिथे लपविले ?
वैनतेय मी पुनरपि येउन , झेप घेउनी लुटेन ग!

---

माधवपूर -वडगाव ९ मे १९५२

## ८३). या इथें टेकडीजवळी

या इथे टेकडीजवळी
ही उजव्या बाजुस पहा प्रगटली
नयन मनोहर हिरवी - हिरवी काळींतिल लक्ष्मी !
हे जे दिसते विशाल भूतल
भूतल नच तें
ती तर आहे पृथ्वीच्या या सौधावरची विस्तृत गच्ची.
त्या सौधाच्या निळ्या महाली
जग-जीवन -जननी निजलेली !
जग -कल्याणाची नि मनोहर
पहात रमली  ती जी स्वप्ने
तीच आज या सौधावरच्या गच्चीवरती
अल्गद उतरुन काय विसावत बसली ?
या इथे टेकडीजवळी
हीं उजव्या बाजुस डुलती येथे
नयन मनोहर, सुभगशामल ,हिरवीहिरवी स्वप्ने !
आणि इथे ही ,याच टेकडीजवळी -
पण डाव्या बाजुस ,
या स्वप्नांच्या विरुद्ध बाजुस -
खाणींच्या भगदाडांमधली
भगदाडांच्या काठांवरती
खडी पडे राशींनी !
- कोण ही दैना धरणीची !
इथे ही कुरुपता रडते ?
अन ओबडधोबड अश्रूंचे हे ढीग इथे उठले ?
ज्या पृथ्वीच्या पोटामधुनीं
उजूंस हिरवे स्वप्न उमललें
डाव्या बाजुस त्याच धरेचें
 पोट खरडुनी मानवहस्ते खडे निघाले !
 काय हेतूने ?
 - प्रगतीसाठी ?
 झाले असती याच खडीने  नागररस्ते रुंद- सुगमही !
 रुंद ,सुगम तर नागररस्ते खरेच झाले !
पण -
        हे व्हाया
 उकराया लागल्या बरगड्या पृथ्वीच्या मानव -हाताना
कुरूप असल्या खाणींचीही भगदाडें त्यातून निपजलीं !
आणि उजूंच्या स्वप्नासम जें
 स्वप्न मनोरम डावीलाही फुलले असते
 त्याला मानव -नेत्र सदाचे

मुकुनी बसले !
जिकडे तिकडे हिरवळ बघुनी ज्या डोळ्यांची तहान निवती
ज्या डोळ्यांना शांति लाभती
त्याच्या बदला
आज नयनि ही खडी बोचतें ,-
जळजळते ,रखरखते , सलते !आग उसळते !!

---

माधवपूर-वडगांव
२०ऑक्टोबर १९५२

---

## ८४)नित्यनूतन कविता सखी !

---

कवीची कांता म्हणाली एकदा आपल्या पतीला :
"काय हो ,कुणीहि तुम्हांकडे कधी येत कसें नाही ?
मित्र का कुणीच नाहींत आपले ?

विस्मित होऊन म्हणाला कवि :
"नाहीत मित्र मजला म्हणून सांगितले कुणीं
अगणित माझे मित्र असताना ?
तुलाही कसे दिसले नाहीत -
माझ्या भोंवतीने नेहमी मित्रांची असून गर्दी ?"

भुंवया सहज चढवून ती विस्मित म्हणाली :
"माझीच उलटी थट्टा करता ?
एक तर मी दृष्टिविहीन असले पाहिजे
किंवा तुम्ही तर बोलत लबाड  असाल झाले!"

कवी अधिकच गंभीरतेने प्रत्युत्तरला :
"डोळे असुनी तू आंधळी आहेस !
माझ्या भोवतीने
कल्पना -मैत्रिणी
विचार - मित्र
नेहमी माझ्याशी गुज करितात
मीहि त्यांच्यासवे हृद्गत कथिता  रमून जातो
किती काव्यमय
किती  भावोदात्त
किती निकटचे , मोकळ्या मनाचे
सर्वस्व आपुले ज्यांनी अर्पिलेले आहे मजशी!
काय मित्र असे , स्वार्थी या जगात लाभतात कधी ?
तुज (अभि)प्रेत असलेला मित्र
एखादा जरी जवळ आला
तर -

जिवलग माझे सारे मित्र
क्षितिजात दूर सोडून मला , लपून जाती !
आणि मग मला मित्राच्या संगती
एकटे, एकटे ,एकटे वाटते !
म्हणून टाळून सारा मित्र -मेळा
बसतो ;- 'एकटा' तुजला दिसतो !
परंतु तेव्हाच परमप्रिय मित्रांचा माझ्या
माझ्या भोंवतीने
भरतो मेळावा !"

"अस्सं का !"- म्हणाली काढून हेल कवीची कान्ता
अधिकच पुन्हा होऊन विस्मित !
कातर हृदयी शंका व्यक्तविली :
" तर मग बाई असेन मीहि वाटत तुम्हाला
एक अडगळ !-
"छे,छे! भलतेच " घाईने म्हणाला तिजला कवि
बाहूंची आपुल्या भूषणे तिच्या देही लेववून ,
तिच्या ओठींचे ते अभद्र शब्द ओठांनी पुसून -
लिहिले ओठांनी ओठांवर त्याने :
" तू तर माझें साक्षात् काव्य -
भावरम्य माझी नित्यनूतन कविता सखी

---

माधवपुर -वडगाव
२१ऑक्टोबर १९५२.

---

**८५)अशाच एका गच्चीवरतीं** -

---

अशाच एका गच्चीवरती
उगाच क्षणभर मन रेंगाळत
इवल्याशा या तनूंत येथें
लोळ विजेचा कसा उफाळत !

गहू वर्णाची नाजुक आकृति
फुलासारखी अल्गद फिरते
कटींभोंवतीं अल्गद तिचिया
सहज कसे मन बाहु गुंफिते

सहज कसे मन मांसल, कोमल
उन्मादाने मान हुंगिते
कपोल लालस प्रफुल्ल हंसरे
आवेगाने दीर्घ चुंबितें !

उगाच हंसते, हंसतच सुटते

क्षणैक  तरि हंसहसुनि  घुसळते
सुन्दरता  सम्मोहुन प्राशित
उगाच अस्फुट  लंव पुटपुटते !

उगाच निरखत उगाच हरखत
उगाच वेडे हो झाल्यागत
अशाच एका गच्चीवरती
उगाच क्षणभर मन रेगाळत !

---

माधवपुर -वडगाव
२७ ऑक्टोबर १९५२

---

## ८६)  सहजीवन हे अपुले !

---

किती स्निग्ध आपुलें  नातें सखये जडले!
बाजूं दो आपण - नवीन नाणे घडले !

तू कांच मनोहर सुरेख पैलूदार
मी पारा तुझिया पाठीवर भरदार -
आरसा बिलोरी सहजीवन हे अपुले ;
किती स्निग्ध आपुले नाते सखये जडले !

तू काव्यामधली ललित नादमय ओळ
मी अर्थ सत्य ,शिव ,सुन्दर तवमागील !
सखि, भावगीत अन् सहजीवन हे अपुले ;
किती स्निग्ध आपुले नाते सखये, जडले !

तू गोल तबकडी सुडौल दोन करांची
मी यंत्र ;तालमय टिक् टिक् ही प्रेमाची
घटियंत्रच अनुपम सहजीवन हे अपुले ;
किती स्निग्ध आपुले नाते सखये ,जडले !

तू पानें सखये , लिहिल्या गुजगोष्टींची
रंगीत बांधणी सुरेख मी वस्त्रांची
- नवग्रंथ रसात्मक सहजीवन हे अपुले
किती स्निग्ध आपुले नाते सखये , जडले !

तव  जीवनांतल्या  क्षणाक्षणाच्या पुष्पां
मम जीवनांतल्या पळापळाचा धागा -
सुमहार टवटवित सहजीवन हे अपुले
किती स्निग्ध आपुले नाते सखये ,जडले !

---

माधवपुर -वडगाव

१४ऑगस्ट १९५३

---

## ८७). अर्थ आज मज आकळलें !

---

दोन तरुंच्या सान्निध्यांतिल अर्थ आज मज आकळले
परस्परीं गुंतल्या तयांच्या मुळांतले - फांद्यामधले !

गालावरती गाल घांंसती
आज तयांची पानें कां तीं !
फुलाफळांतिल बहर उमजले ऋतु-बहार -रस थबथबले!

एक उशी घेऊनि क्षितिजाची दोन टेकड्या विश्रमल्या ;
विरल धुक्याच्या पडद्यामागे मंद ,मदिर, मधु का हसल्य!
नयन तयांचे फुलती हंसरे
मदिरा त्यांच्या गाली पसरे !
जाणवते मज आज तयांच्या उरातले स्पंदन पहिले !

पाऊलवाटा दोन चालल्या : आज कळे ते सह-रमणें
वळण नागमोडी कां ! कळते वळणावरचें ते मिळणे !
एकमेकां सोबत त्यांची
पलीकडल्या त्या विजनवनींची !
कुजबुज त्यांची दिनरात्रीची : प्रतिवेद त्यांनी रचिले
- अर्थ आज मज आकळले

---

माधवपुर- वडगाव
३ जानेवारी१९५४

---

## ८८) भारताची भूपाळी

त्रिभुवन भूषणवरा , भारता ,अरुणोदय झाला
उठि लौकरि उदयाचळी स्वातंत्र्य -सूर्य आला !!धृ!!

दाट धुके या प्रभात समयी : अजुनी न पथ स्पष्ट|
परन्तु आता भीति विरतसे तिमिर होय नष्ट |
भाग्य तुझे होईल प्रफुल्लित ,आज न ते रुष्ट |
तुजवरि ते भाळेल उपसता स्वखुशीचे कष्ट|
सुवासिनि तुजवरुनि घरोघर काढतील दृष्ट |
तुझिया सन्निध ठरेल न कुणी आता नथद्रष्ट |

लोहदंड अवजड गळले; दास्याची मरूभू सरली|
तव जीवन -आकाशी या तेजाची रत्ने हंसलीं|
दशदिशात्रिकालाची ही तुज दारे उघडी झाली|

काल असा हा मंगल, सुन्दर, चिन्मय अवतरला|
उठि लौकरि उदयाचली स्वातंत्र्य -सूर्य आला||.१||

सुवर्णभूमीच्या भूदेवा, उठि सरली राती |
धन संजीवन तुझे अशा तव धेनू हंबरती |
सुरेल सनईतून सुकुमोल सूर मधुर झरती |
गोड गळ्यातुन तान लहरते दळूजात्यावरती |
करुनि सडा -संमार्जन, घेउनि कुंभ कटीवरती|
जलभरणास्तव वाट चालती हसत मुखी गरती|

अलिगण कमलिनिकोषींचे मुक्त होत जागत उठले|
गुंजारव करतां करतां उषःसूक्त म्हटले |
ब्रह्मतेज भवती उजळे, चैतन्य चराचरि नटलें |
अभ्युदयाची तुझ्या पातली परम रम्य वेला |
उठि लौकरी उदयाचली स्वातंत्र्य सूर्य आला||२||

दास्याची ती आंवस असता दडलेले वृक्षीं |
प्रभात होता आकांक्षेचे भरारले पक्षी |
आता बंधन यास कोठले ? दूर -देश लक्ष्यीं|
अनन्तातला प्रदेश आता सामावत अक्षीं |
अगणित स्पुरणे , अतूट धैर्य अजिं यांच्या वक्षीं |

स्वप्ने हृदयांतिल साकारित होतिल प्रत्यक्षी|

ही संघटनेची मुरली घुमवी बा धरुनी अधरी|
सद्-विचार सद्भावांची तींतून स्फरो ललकारी |
ऐकता गरीबहि गायी झुंजतिल प्रसंगी समरी |

हाकारित तुज बाहेरिल हे जग झाले गोळा |
उठि लौकरि उदयाचली स्वातंत्र्य- सूर्य आला ||३||

श्रीरामाच्या, श्रीकृष्णाच्या उठि भारतवर्षा, |
' सुजला सुफला सस्य शामला 'उठि भारतवर्षा |
पुनरपि करि तव उन्नत आता शतसहस्त्रशीर्षा |
कोटि चरण चालवी, उरातून कोटि धरूनि इर्षा |
कोटि बाहुनी सुस्ती झटकी उठी पुराणपुरुषा, !
कोटि मुखानी बोल अमृतमय वेदांची भाषा|

शुभशंकर,शिवशंकर हे,प्रलयंकर अतिव कठोरा,|
ऋषिवरा,महान तपस्वी,मुनिवर हे अतिव उदारा!
उठि ऐक तुझीभूपाळी संसृतिच्या तारणहारा |
पांडुरंग कवी आळवीत तुज उभा तव उशाला|
उठि लौकरि उदयाचली स्वातंत्र्य -सूर्य आला||.४||

---

**वरील कवितांची दोन कडवी खाली देत आहे.जी ऑगष्ट-१९५२. प्रकाशित "कल्पना" मासिकमधे छापून आली आहेत**

---------------------++--------------

त्रिभुवन भूषणवरा , भारता अरुणोदय झाला |
उठि लौकरि उदयाचलीं स्वातंत्र्यमित्र आला ||धृ||

सुवर्णभूमीच्या भूदेवा उठि सरली राती |
गोड गळ्यातुन तान लहरते दळुजात्यावरती |
दाट धुके या प्रभात समयी अजूनि न पथ स्पष्ट |
परन्तु आता भीति विरतसे तिमिर होय नष्ट |
दास्याची ती आंवस असता दडलेले वृक्षीं |
पहाट होता आकांक्षेचे भरारले पक्षीं |
अगणित स्फुरणे, अतूट धैर्ये अजिं यांच्या वक्षीं |
स्वप्ने हृदयांतिल साकारित होतिल प्रत्यक्षी |
अभृदयाची तुझ्या पातली परमरम्य वेला |
उठि लौकरि उदयाचली स्वातंत्र-मित्र आला ||१||

श्रीरामाच्या ,श्रीकृष्णाच्या ,उठि भारतवर्षा |
'सुजला -सुफला- सस्य -शामला'उठि भारतवर्षा |
पुनरपि करि तव उन्नत आता शतसहस्त्रशीर्षा |

कोटि चरण चालवी उरांतुन कोटि धरुनि इर्षा |
कोटि बाहुनी सुस्ती झटकी उठि पुराण-पुरुषा |
कोटी मुखानी बोल अमृतमय वेदांची भाषा |

शुभशंकर ,शिवशंकर हे, प्रलयंकरअतिव कठोरा|
ऋषिवरा,महान तपस्वी ,मुनिवर हे अतिव उदारा |
उठि ऐक तुझी भूपाळी संसृतिच्या तारणारा |
पांडुरंग कवि आळवितो तुज बसुनि तव उशाला!
उठि लौकर उदयाचली स्वातंत्र्य- मित्र आला|.२||

---

**८९) दगडू धोंडूची विद्यार्थीदशा** -

कोण मला पुसणार ?
मनाचा मी माझ्या सरदार !

कुठले शिक्षक , कुठली शाळा
शाळा म्हणजे टाळा ,टाळा
भले दांडगे टाळे घाला -
हा माझा ललकार

शिक्षक म्हणती 'निर्भय व्हा रे ,
स्वतंत्र बाणा सदा जपा रे !',
तक्षणि माझ्या कानी वारे
शिरे तुफानी फार

स्वतंत्र बाणा सदा राखितो
म्हणती पण शिस्तच बिघडवितो
निर्भय बनुनी पळून जातो ,
तर मज म्हणति चुकार !!

बापालाही अक्कल नाही
फुकट भरितसे फी माझी ही
त्या पैशातच येत्या पाही
किति इडल्या -सांबार

परवा कुणि तरि खलास झाला
बंद राहिली तेव्हा शाळा
कधी पुढारी तसाच सगळा
रोज रोज मरणार ?

तेव्हा कुणि विद्यार्थी बुडाला
सुट्टी मिळाली मग शाळेला
ही कार्टी तर जगति कशाला
करति न का उपकार

थिएटरे म्हणता उपकारी
'मॅटिनि' असतो मंगळवारी
तींही साली  कंजुष सारी
मॅटिनि' ना प्रतिवार

परन्तु आम्हीहि का कमि आहो?
जेवुनि बारसे यांचे आहो
श्राद्ध कराया  सज्ज सदा
शाळेचे हरबार !!

---

माधवपूर-वडगांव
८/३/१९६६

---

**९०) रंगलो माझ्या गावात** !

सन्ध्येच्या उंबरठ्यावरतीं दमलेला सूर्य
पाउले जाई झाडून ,
दिवस उगवतां क्षितिजांच्याही पल्याड गेलेलीं
पाखरे येती परतून !
चराचरांवर नजर ठेविण्यांसाठीं आलेल्या
सावल्या , -दिवसाचें दूत
दिवसाचे संपता कार्य त्यां देण्या अहवाल
जाहल्या दिसासवे गुप्त !
परंतु दुसऱ्या क्षणांत येतां मायावी रात्र
पातल्या इथे तिच्या छाया
आणि लागल्या वावरावया चराचरासंगे
पांघरूनि काळोखी माया !

' वारा येईल तसा फिरवितो पाठ'- असा वारा
जाहला रवीसवे  तप्त ;
अन् आता चंद्राचे येता राज्य जगावरतीं
होतसे तयासवे शीत !

वाजतात  घुंगरे गळ्यातिल बैलांच्या दूर ......
- हम्बरव गाय वासरांचा.....
नव्यानेच घे ठाव उराचा आज रिघुनि कानी;
आठवहि उसळे आईचा ! -
कितिक दिसांनीं आज येत मी माझ्या खेड्यात
कलांगें संपादुनि सारी
सहजासहजी नयनी तरळे इतुक्या दिवसांचें
साठले विरहाचे पाणी !

-आधीच धूसरं झालेला पथ सायंसमयीचा !
दिसेना नयनांना काही ;
म्हणुनि मोकळा करित पूर तो प्रीती -जान्हवीचा
उभा मी मार्गातच राही

रेंगाळत जे मनात होते जीवन शहराचे
-हार तो नकली मोत्यांचा !
मणी त्यातले गळू लागले सरसर एकेक
काय तो अध:पात त्यांचा

अल्प परि किती अमोल माझ्या स्मृती - बालपणच्या—-
सहज सुंदर खेड्यातिल त्या -
दाटूनि आल्या लेवुनि स्नेहल भावांचा साज !
-कशा त्या आवरावयाच्या !
कितीक दिसानीं हरिणांमधला शावक हा एक
परतला हरिण - कळपात---
- पाणी गेलें कुठेहि तरि ते पाण्यातच मिळते !
- रंगलो माझ्या गावात

---

२०एप्रिल१९४६

### ९१) कैदी

बाहेर करारत काळोखाची रात्र
उद्दाम निराशा ह्रदयाच्या ह्रदयांत

ताठरल्या नयनी लळलळणाऱ्या ज्वाला
-क्रुरताच जणु ती टपलेली ध्वान्तात

बदलती क्षणोक्षणिं भाव मुखीचे उग्र
-सागरी मुसंडी वादळ मारुनि जात

नि:श्वास दीर्घ , जड क्षणक्षण राहुनि निघती
फुत्कारी नागच टोपलीत बन्दिस्त !

पिंजारी ,ओढी राठ केस चेवून
जमिनीवर दणकी वज्रमुष्ठि जोषांत

क्षण कोपऱ्यांत त्या अगतिकापरी बसतो
क्षण उठतो , फिरतो क्षण, बसतोही क्षणात

हा हाय ! मारिली टक्कर या भिंतीला
चेंडूपरि मागें क्षणीं फेकला जात

घासीत पाय क्षणिं पडला आणि उताणा

रक्तात नाहला माथा त्याचा तप्त !

का अशीच मानवजाति आज जगतांत
अवतरे ,चरफडे ,करी निसर्गी मात ?

## ९२ मृदुल फूल आले!

---

जीवन -लतिकेस आज फूल मृदुल आलें!
मूर्तिमंत वैभव कीं हे करात खेळे!
सखिनो ,माझ्या कुशींत
इवलासा देवदूत
यांच्या स्पर्शात पुलक रोमरोमिं आले

प्रभू घरचा हा प्रसाद
आला माझ्या करात
याचा स्वर प्रथम श्रवुनि श्रवण पुनित झाले!

ही मृदू पाकळि पाकळि
अमृताने लवथवली
-एकच 'पापा' ;नि ओठ मधुरतेंत न्हाले!

गृहिं सुवास ,जनि सुहास
अंगणि उल्हास - लास
दशदिशि नर्तत प्रमोद ,नयनी तृप्ति डोले

घर भरले ,मन भरले!
हृदयहि दुधडी भरले !
नाचतात पंचप्राण (बघुनी बाल चाळे !)
जीवन लतिकेस आज फूल मृदुल आले!

---

३०/७/५४
मा.वडगांव

---

## ९३) तुझ्या बाळलीला

---

तुझ्या बाळलीला-
बघुनि बाळा
भरते येत मनाला!

इवल्या इवल्या तुझ्या मुठी या
उगारिशी कवणावर वाया?
दटाविशी का या वाऱ्याला

झोंबे जो अंगाला!

'हां हां'करिशी, 'फुर् फुर्' करिशी
मधेच जोराने चीत्कारिशी -
मनाजोगते काहि न म्हणुनी
का येशी रागाला!

अंगावर तुज घेउनि बसतां
निजशी झाडित बुक्या -लाथा-
अंग मळविशी ,तयानेच परि
धन्य प्राण हा झाला !

तुज तिटकारा अंधाराचा
उजेड प्रिय तुज आकाशाचा
बघूनी तो कधि खदखद हसशी
हसवितोस सकलाला !

आज अचानक पडुनि पालथा
तोलुनि धरशी उचलुन माथा
मिठी मारिलिस काय सहर्षे
या प्रिय भूमातेला!

______________________________

१९-१२-१९५४

----------------------------------

**९४)डोळ्यांना या सर्व लाभलें** -

______________________

बाळ जरासा रांगु लागला
हृदयाचा मम कोश बहरला
आंतुनि उठल्या कसल्या लहरी
आदळल्या अन् हृदय तटाला !
ठेविल तेथे तडफडणारा
बाळ आजवर होता गोळा
आज स्वतःच्या प्रेरणेतुनी
पुढे, पुढे हा सरकत असता-
मना वाटले, याला आला
आज खरा आकार चांगला!
- स्वप्न एक ते होते माझे
आज प्रगटले या समयाला!

स्वप्न एक ते होते माझे
माझी हो ,इवलीशी प्रतिमा
समोर माझ्या सरकत यावी
डोळे भरुनी तिला पहावी !

-स्वप्न तेच साकार जाहले
डोळ्यांनी या अहा !पाहिलें
डोळ्यांनी या ब्रह्म पाहिले !
डोळ्यांना या सर्व लाभले !!
--------------------------
२०-१०-५५
------------------------------------------------

**९५)नभी झेपावतो आहे**
-----------------------

नव्याचा सोस मज आहे
सदा नाविन्य मज बाही :
तयाची हाक ये कानीं
थरारे कंप क्षणि देही

करोडो दृष्टीचे धागे
दुरी खेचून कुणि नेई
कळा अन् कानशीलांना
कशा या लागती पाही!

फुले हृदयात कांहीसे:
भरोनी भीतरी राहीं
नवे जाणून घ्यायाते
उताविळ जीव हा होई!

नव्याची भूक मज आहे
- अनिश्चितता नवी आहे!-
- चढाई आणि विजयाची
अखेरी धुंदिही आहे !!

सदा तारुण्य नाविन्यी
सदा मी जीवनी राहे
करांनी कापुनी वारा
नभी झेपावतो आहे!
---------------------------------
२९/६/१९५५
------------------------------------------------

## ९६) **स्मृति**

हात मायाळू फिरावा माझिया पाठीवरी
आणि व्हावी कंटकांची रासही पुष्पापरी

शब्द तुझे ऐकता यावी उताला चेतना
संकटे भेसूर सारीही बनावी हासरी

पाहुनी  वात्सल्ययुक्ता दृष्टी नेत्रीची तुझ्या
लोपुनी नैराश्य आशा फेसळावी अंतरी

या मुखी तू घालता कोंड्याचिही ती भाकरी
पंचपकवानेहि झाली तुच्छ त्या घासावरी

चोळुनी तू अंग ,पाणी घालताना वाटले:
अमृताचे कुंभ झाले पालथे माझ्या शीरी

मागुनी तू चालता टेकीत काठी वाकडी
मृत्यु झाला खेळणे तूझ्याच आधारावरी

आणि गाठी ठेवले तू अल्प कांहीं राखुनी
काय त्याचे या जगा ? श्रीमंत मोठा मी परी

साठलेल्या अंतरी गे ज्या स्मृतींच्या दौलती
त्या कुठे ठेवू ? -तिजोरी या जगाची ना पुरी!

१९नोव्हें १९४६

## ९७) **हवेवर हेलावत आलेल्या पिसा**

कोठुनि इवल्या पिसा, हवेवरून हेलावत येशी?
बसलो असता जळत्या चित्ते बाहूवर बसशी?

कालच झाला जातिय दंगा, त्यात स्वजन कैक
जखमी झाले: सलते त्यांचे अंतरात दुःख
कालपासुनी सुचले नाही दैनंदिन काम

रमवित नाही ,हसवित नाही, शांति न दे धाम!

बावळटापरी कवटाळुनिया भ्रांतराष्ट्रवाद
राष्ट्राचा उत्कर्ष साधिला किती थोर येथ !

आजही यांचे डोळे नसती पूर्ण उघडलेले
हिंदूमुस्लिम ऐक्याचे ते स्वप्नहि नच विरले !

-किती थोर मन !-हित करिती हे खूनशी सर्पांचे
शत्रू जगविति प्राण खर्चुनी अपुल्या घरच्यांचे
अशीच ठेवा नेत्यांनो, ही अतुलनीय नीति
मानवता सजवायाची ही स्फूर्तिप्रद रीती !
भ्रष्टवावया आया बहिणी द्या परक्या हाती
मानवतेची अब्रू निश्चित वाढवाल वा,ती !
सुखनैव हे बळी घेऊ द्या कच्च्याबच्च्यांचे
भरेल तुमच्या मानवतेचे घर त्याने साचें!
खुशाल लावा हिता मशाली बहुसंख्यांकाच्या
त्याच पताका लोक- युगाच्या उज्वल प्रगतीच्या!
कालच जखमी झालेल्यानो ,माना उपकार-
देवाने हे दिधले नेते आम्हा किति थोर!

विचार असले बोचत असता जळत्या हृदयासी
पिसा ,कोठुनी लहरत येउनि बाहुवर बसशी ?
असशी का तू पीस कोठल्या विद्ध पाखराचे
दुःख तुला का -कथुनि मज-असे हलके करण्याचे
थरथरशी का ?सोड ,कोंडला सोड, सख्या श्वास
उषःकालच्या पूर्वीचा हा असे तम उदास!

---

२६ ऑक्टोबर १९४७

---

पिसाला ही कविता उद्देशून घेण्याचे कारण?
- इथे इतकेच सुचित करावयाचे आहे की ,उद्याच्या उषःकालात कुठल्याही निरपराध मनुष्यप्राण्यालाच नव्हे तर कुठल्याही निरपराध पक्षाच्या पंखालाही धक्का लागणार नाही. निदान कवि तशा उषःकालाची मार्गप्रतिक्षा करीत आहे असे वाटते!

---

**९८) एक माझ्या कुंडीत आहे -**

एक माझ्या कुंडीत आहे
हिरवे रोपटे
त्याच्या मुळांत उर्मी आहे-
उसळी मारून
हिरव्या पात्यांमधून
निथळत आहे !
पात्यास चांगली धार आहे
शेंड्यास त्याच्या अणकुचीदार
टोक आहे
जीवनसर्वस्वाचा परिपाक
रोमारोमात सांठतो आहे
सांठणार आहे
साफल्याचा अग्रदूत
कळीत एका कोंडून आहे
कळी अशी ही
विकसते आहे !
-प्रचंड वाराहि टपून आहे!
भवितव्याचा प्रदेश सारा
अज्ञात आहे!!......
एकदा वाटते;
प्रचंड वारा
प्रभंजनाचे अक्राळ विक्राळ घेऊनी रूप
थैमान येथे मांडणार आहे
पाकळी पाकळी कोमल कळीची
पिंजून फुंकून देणार आहे
अशी मात्र इच्छा मनाच्या मुठीत
झाकली आहे
हा वायू व्हावा
कळीहूनहि मृदु
हळूच एकीकडेने
उंचवावी आपुली मान त्याने
त्याची असावी चोच चांदण्याची
कळी उलगडता -
हळुवार त्याने चोच खूपसावी थोडीशीच
अन् गंध घ्यावा आकंठ पिऊन
जपून .......जपून!

---

३१/१२/१९५४

---

**९९)अशीच ये तू-**

अशीच ये तू
नित्य नवी ये
लाव्हा-रस तू!-
आकस्मिक ये
स्फोट ऐकवित

असेच होवो
शरीर हलके,
अशीच वाणी
वाहो खळखळ

कान ऐकते
काहि न ऐकुन
नयन पाहते
काहि न पाहुन
प्राण जाणते
काही न जाणुन
स्थिती- गतिची ही
नित्य  वाहिनी;
तिचीही जाणिव
विरून जावो !

बद्ध मला कर
नाचव मजला
नाचव  हृदिंची
कारंजी ही!
आकाशाला
भिडेल इतुकी
विभूती माझी
उंच उंच कर -

अशाच काही
क्षणाक्षणास्तव
जगतो आहे
सोत्सुक आहे ;
अशाच काही
क्षणाक्षणांनी
दिनानुदिन हे
जीववित आहे!

३/२/१९५

**१००)आत्मरक्षणी शक्ती अमुच्या-**

काढ शोधुनी आज काय जे विपरितसे घडले:
रसिकत्वाचे खरेच का ते झरे गुप्त झाले !
नृत्यसंगे तुझ्या न नाचे आज हृदय बाले
संगीताचा एकहि सूर न श्रवणी रेंगाळे
रसनेवरती नाव गोड तव आता नच खेळे
डोळ्यामधुनी प्रीति- उषाचे रंगहि ना खुलले
उल्हासाचे पाहुनि तुज ना कमळ- पुष्प फुलले
तवस्पर्शास्तव रोम रोम हे आज न उत्सुकले!

काढ शोधुनी, आज काय जे विपरितसे घडले
रसिकत्वाचे खरेच का ते झरे गुप्त झाले !

तुझा शारदे, भार वाटतो आज जीविताला
काव्याच्या तर मधुवीणेचा तिटकारा आला;
तहान नाही आज तुझा तो विलास बघण्याची
तुझ्यासवे वा मधुर ,मदिरशी गीते गाण्याची ;
वेडे होऊनि जन्मजन्मभर तेव पायी बसणे -
मनात नाही ,जनात नाही: ते न आज जगणे !

काढ शोधुनी आज काय ते विपरितसे घडले
रसिकत्वाचे खरेच का ते झरे गुप्त झाले!

स्थंडिल कुठले धगधगताहे या पायाखाली ,
वणवा कुठला लळलळताहे अमुच्या भवताली,
लक्ष खड्ग हे लटकत असती कसले अवकाशी,
धरा कधिंपुनी वखवखलेली आहे उपवाशी
जाणुनि हे, सौंदर्या,लप जा निवान्त घरट्यांत
आत्मरक्षणी शक्ती आमच्या लागल्यात येथ!

---

1१३ऑक्टोबर १९४७

---

**१०१) प्राणांनो घ्या पिउनी** -

प्राणांनो घ्या पिउनी इथली सृष्टीची माधुरी
भान घडीभर विसरूनि जा हो ,कालाच्या सागरी!
गमवायाचे सदाच आहे स्वत्व  तिथे संगरी:
इथे काहिसे ऐसे आहे, जे तुमते उद्धरी !

प्रकाश किंचित ,किंचित् तम,हे गुंफुनिया कांहिसे
मोहन कुणि हे इथे तरंगत ठेवियले धुंदसे
या किमयेने पछाडलेला तरु हा सडपातळ
फुलवूनि पानन्पान कुणाची चाहुल घे निश्चल
त्या तिकडे प्राचीस ढगांची दोन उंच शिखरे -
हिमालयाच्या शिखरांचे की प्रतिबिंबच गहिरे!
एका शिखराआडुन अर्धा गहुवर्णी चंद्रमा !
-शिखरे नच ही ;समोर शंकर ;कापुरगोरी उमा!
शिखरस्कंदी  रेलुनि वरती आरोहत चंद्रमा
ध्वजा आपुली  चढवी हळु की कोजागिरी   पौर्णिमा!
तिकडे अजुनी पश्चिमक्षितिजा किनारितो रक्तिमा
सह्याद्रीवर अजुनि वर्षतो स्वप्नातिल नीलिमा !
कभिन्नकाळी मेघमालिका ओठा 'ॐ'कारुनी
प्रणयाकुल चुंबाया गिरिवर केव्हांची वाकुनी !
हटयोगी अन् वृक्ष इकडचे किंचित् आरक्तले
क्षणैक ऐसे वस्तूजात हे उभे इथे भारले !
प्राणांनो घ्या पिउनी क्षणभर यामधली माधुरी
वेला असली दुर्लभ समजा कालाच्या सागरी !

---

३१/१०/ १९५६-माधवपूर - वडगांव

**१०२) नाजुक पातें-**

हृदयात आज या माझ्या
थरथरते नाजूक पाते -
कसले हे नाजूक पाते?
काही नच कळतें ! कळतें-
थरथरते नाजूक पाते !

अन् कंपन स्फुरते ,स्फुरते
मन वेडे शोधू बघते
ते कंपन पकडू बघते!-
मन फसते ,फसते ,फसते ,
परि कंपन स्फुरते ,स्फुरते !

---

२०/१/१९५५

## १०३). मी

निराकार मी ;
नीराकारच !-
नीराशय घे भिन्न घटांचा
भिन्न भिन्न आकार, त्यापरी
घाट बदलत्या काळाचा मज.

निर्गुण मी हो
निर्गूणच मी !-
गुणातीता  गणावयाला संख्या नाही -
गणना माझी करण्या निश्चित
वागर्थाचे हात टेकती

सनातन अशी
या विश्वाची
पार्श्वभूमि मी
-विश्वाहुनही भव्य ,दिव्य मी
विश्वामागे अंधुक, धूसर.
पिंगट माझे केस मोकळे
रुळती माझ्या खांद्यावरती
युगायुगातिल
उन-हिंवाच्या वर्षावाला
पाउस- वाऱ्याच्या माऱ्याला
उघडी काया अहोरात्र मम
- ठसे तयावर उमटत असती!
साहत आहे,साहत आहे!
डोळे लंवही मिटूं न देता
जागत आहे, जागत आहे :
खेळ जगाचा पाहत आहे
स्थिर मी आहे, अविचल आहे.
ओठी माझ्या मर्मर आहे-
हृदयाच्या कमलातून अविरत
मंत्र सत्यसौंदर्य शिवाचा
स्फुरतो प्रस्फुट होतो आहे.......

....... केव्हा केव्हा प्रभंजनाची
रोंरावत उठते भुतावळ –-
उत्पातांनी चंड घालिते
गदारोळ या वातावरणी

जिकडे तिकडे दिवसाढवळ्या
अंधाराचे रान माजवित
राक्षस -बल अपुले जुंपुनिया
स्थान -भ्रष्ट मज करू पाहते
मंत्र अडवुनी मम ओठांतच
दाबूनि आतच ठेवू बघते

- खुळी बिचारी! दीन बिचारी !
स्थिर मी अविचल विश्वामागे
माना मोडुनि पडे बिचारी! ----
ओठी मम तो पुनरपि मर्मर.......

---

३/२/१९५५

---

## १०४) उगीच कोठे -

उगीच कोठे नयनासंगे
धीट जराशी झडते चकमक
परंतु मागे रेंगाळत ती
विणते रेशिम  साधक बाधक!

उगीच कोठे नयनावरती
ओठावरची लाली उडते
हृदयामधल्या तप्त रसाशी
जराजराशी सलगी होते !

उगीच कोठे नयनापुढती
कटीलगतचे लास्य थरकते
आणिक नंतर दृष्टि अनावर
चक्रामधूनी चक्र प्रसवते !

---

१६/४/१९६६
माधवपूर वडगांव

---

**१०५) अजून थोडा -**

तुझा नि माझा असेल थोडा
असेल काही ऋणानुबंध
म्हणून आलो समोर यापरि
जीवास जडवित विशेष छंद?

सहेतुकपणे हसलो ,खुललो
सार्थ कटाक्षी गुंतून गेलो
सहवासास्तव धडपडताना
कायावाच्यामने भुकेलो

अजून थोडा आहे उरला
अजून काही ऋणानुबंध
देत उजाळा स्मृतीस म्हणुनी
हा पाझरतो कविता- छंद?

७-१-१९५५

**१०६) असताना वर चंद्रमा -**

असताना वर चंद्रमा ,
असतांना अगणित तारे ,
असताना थंड हवा
असताना नीरवता,

पलीकडचा तो डोंगर
डोळे मोठे करून
बघताना नवलाने
मान जरा उंचावुन ,

इथला हा रानझरा
उत्सुक ,व्याकुल होऊन
श्वास आपुले रोधुन
मंदावुनि जाताना,

राई ही भोवतीची
गंधित,पुष्पित सुफलिंत
कान आपुले सहस्त्र
टवकारुनि असताना

आकाशाची गंगा
शुद्ध दुधाने सकला
शत तुषार -धारांनी
न्हाऊ घालीत असता-

तू प्रकाश -झोतापरि
अकस्मिक झेपावुनि
अंतरास डागुनिया
बिजलीपरि लोपलीस

देहाचा हा मिनार
नादाने दुमदुमला
कंप कसा कणकणात
क्षणभरात भरभरला

- कायमचा व्रण उरास !
कायमचा ओला हा !!
नयनापुढती अजुनी
स्वप्न एक लटके हे

तू प्रकाश- झोतापरि
आकस्मित झेपावुनि
व्रण ओला हा माझा
फुंकरूनी चुंबितेस!

---

९/१/५५

---

**१०७)रम्य रम्य ते मीलित जगणें !**

---

रम्य रम्य ते मिलित जगणे
इतर  सौख्य त्यापुढे ठेंगणे!
स्वप्निल ,धुंदिल त्या मधुकाली
अवघी पृथ्वी अल्गद गमली
धुंदी अवताली -भवताली
तीत तू नि मी नित तरंगणे! ||१||

नुपूर नसता पायामधुनी
रुण् झुण् रुण् झुण् स्त्रवे रागिणी
काहिकाहिसे धीट होउनी
बिचकत बिचकत तव वावरणे! ||२||

हातांतिल कंकण लडिवाळे
करता गोंडस ,हिरवे चाळे
मंद्र, सांद्र स्वरतरंग उठले-
कान जीवाचा करून ऐकणे ! ||३||

देहलतेचे तव धनु करूनी
प्रत्यंगातुन बाण योजुनी
मदन करी मम पारध सजणी ! ||४||
हवे हवे ते विव्हल होणे

जिवाजिवाचे ऐक्य साधुनी
कुजबुजणे गे तू -मी कानी
जणु विश्वाची रहस्य वाणी
भावगर्भ ती प्रस्फुट करणे
रम्य रम्य ते मीलित जगणे ! ||५||

---

३/८/१९५४
माधवपूर वडगांव

---

**१०८) अशाच एका सायंकाली**

---

अशाच एका सायंकाली
तांबूस असता रंग भंवतिने
धूसरतेच्या पडद्यामागे
दूरदूर त्या भूपृष्ठावर
क्षितिजाच्या त्या कमानिखाली
एकमेकां समोर होत्या
आकृति अपुल्या अंधुक मोहक .....
-आणि जगाला नवल वाटले !
आपण होतो परंतु तेथे
जगास पुरतेपणी विसरूनी
तृप्तीच्या अन नशेत झिंगुन !
स्वर्गच होता अमुच्या भंवती
फुले पदतली ,फुले शिरावर
मृदुता होती अंवती भंवती
फुले कुठुनशी सांडत होती
कोमलता नयनांवर वर्षत !
वृक्ष बहरला माझ्या हृदयी
लता डंवरली तुझिया हृदयी
दिव्य, सुगंधी ,अभिनव ,संस्कृत
दुनिया उभयांतरि फुललेली !
नयनांमधुनी नानारंगी

स्वप्ने होती सुखद उद्याची
एकमेकांसमोर होतो
रचीत जीवनरास उद्याची

१८/८/५४
माधवपूर वडगांव

## १०९) इच्छा

हृदयाची विणा ही
छेडी कुणिं गूढ हात
अन् अपाप नादमधुर
स्वर मंजुल नादतात
क्षणि समाधि ही लागे
देह तरल फूल होत
पृथ्वीवरुनी लवभर
होतो क्षणभर अलगद
परिमलयुत वायूची
मंद झुळुक आत्म्याला
अति हळुहळु स्पर्शितसे -
- सीमा ती सौख्याला !

गूढ मंद गीतांचे
स्वर येती सांतांतुन
श्रवणाभंवती करिती
गुंजारव ,मधुकूजन !

त्या सुस्वर संगतीत
क्षणभर या जगताचा
कोलाहल कलकलाट
विरुनि जात अक्षयिंचा!.......

........ त्याच नादसंगमात
मी विरलो असताना
देवा, विरु दे तुझ्यात
माझ्या या प्राणांना !

&

२७/११/५४

**११०). एक रात्र ती!**

एक रात्र ती अशी पाहली
मिठीत होते देह तापले
अंधाराचे केवळ देही
होते नसले -वसन राहिले !

एक रात्र ती अशी पाहली
ग्रासुनि होता राहू चंद्रा
परी चांदणे जीवनदायी
वितरित होत्या अपल्या मुद्रा !

एक रात्र ती अशी पाहली
नीज जिंकुनी प्रसन्न झालो
नकळत पुढल्या आयुष्यास्तव
अविट स्मृतीचे अमृत जिंकलो !

अमृत मधुर ते अनपेक्षित ये
उसळुन कधिमधि मनसिंधूवर
अडले जीवन नाठाळाचे
आरुढते, धावते दूरवर !

२१/३/५७

**१११) मी तुझ्याविण -**

मी तुझ्याविण की भिकारी!
कोणते ऐश्वर्य दावू ?
दीनता माझीच सारी येथे उघडी ही बिचारी!

तू जिथे गेलीस तेथे
बाग माझा आज गेला
राहिला येथे सहारा; - चुकुनि हिर्वळअन् झरी !

'मी 'पणातिल सर्व माझे
हिण्डते मागे तुझ्या
काय येथे आज बाकी ? -पोकळी केवळ उरी!

तू कुठे गेलीस हे तरि
ठाऊके राहावयाचे !
त्या विना -का नवल? - हे जगणे ,हमाली या शिरी!

- वाहतो ओझे तरीही?
आज ना , केव्हा तरी -
तू -जशी दिसलीस येशिल तीच - आशा मी धरी!

---

१६/१०/६६
माधवपूर वडगांव

---

## ११२). काही कवी

काही कवींनी
चालविला आहे
काव्याशी -----
------- संभोग !
संभोग ? छे! तयाला म्हणणे संभोग
जयात दोघांचा समभोग
इथे पहावे तो
कवीच करिती
अमर्यादपणे
मनात नसता काव्यशक्तीच्या ---
तिच्या विगलित गात्रांशी
बळेच घर्षण,
बळेच दांडगाई
आणि लेंढार हे
काढावया लाविती---
भराभर अन्
भाराभरही !
कशाच्या आधारावर ?
कशाच्या बळावर ?
कोणते नाते दाखवून?
- काव्यदेवतेशी एकदा संबंध
जोडला गेला
तीच झाली ब्रह्मगाठ!
तेव्हा तिच्याशी
हवा तसा आता
(आणि हवा तेव्हा)
संबंध जोडण्याची
सनदच मिळाली!

---

१५/८/१९५५-माधवपूर वडगांव

---

## ११३). स्वप्न

कळले आहे
वसुधैव कुटुंबकम् !
वळणे आहे :
वसुधैव कुटुंबकम् !
वळणे आता आहे आवश्यक:
या पृथ्वीच्या कणाकणाला
गुरुत्वाकर्षणाने
कशासाठी करकचून
निर्मात्याने
एकाच कण्याला बांधिले आहे?---
ही वसुधा एक नसती
तर कण एकसुद्धा
राहिला नसता कण्याला चिकटून;
- अशी ही आंतरिक एकता आहे ;
किंबहुना परमेच्छाच
गुरुत्वाकर्षणात व्यक्त झाली आहे.

कळण्या -वळण्यातील केवळ क- व च्या अंतरात
आमची सारी पापे आहेत
आमचे एकूण भोग आहेत
आम्ही झालो आहो षंढ
आम्ही झालो आहो नपूसंक
तुष्टिरस्तु.......पुष्टिरस्तुची सदीच्छाहि
वांझोटी झाली आहे ,
शांतरसाचा रसच झाला आहे शांत ......

............मानवतेचे स्वप्न साकार व्हावे
हे सर्व साहित्याचे स्वप्न आहे ;
पण साहित्याने शांत रसाला प्रधानपद् न देता
श्रृंगारला माथ्यावर चढविले
म्हणून तर साहित्याचेहि पाय पंगू नाही ना झाले ?
आणि याचीच होऊन जाणीव
ज्ञानेशाने
नुसधीच शांतिकथा | आणिजेल कीर वाक्पथा
जे श्रृंगाराचे माथा | पाय ठेविती
असे सांगून भावार्थदीपिकेचा
नंदादीप लाविला ?
पण साहित्यानेहि संभोग सारखा चालविला होता
म्हणून तो ज्ञानेशाच्या एकांड्या यात्रेने

आवरला गेलेला दिसत नाही ?
त्याची गळती थांबलेली नाही ?
----कदाचित् कितीतरी शतके
लोटावी लागतील
मग साहित्यहि  शांतियुक्त होईल,
पौरुषपूर्ण होईल?
- शांतीरस  श्रृंगाराच्या माथी बसेल
पुष्टि येईल ,तुष्टि येईल
पृथ्वीच्या माथीही शांती चढेल
विश्वावरहि शांती पाय रोवील
आणि तिच्यापुढे
जनसाधारणांची
मुत्सधांची , शास्त्रज्ञांची
राज्यकर्त्यांची
माथी नमतील.
-- त्यांच्याहि माथ्यात शांती नांदेल!

या माझ्या ओळींना
-- का ?--ते तुम्ही जाणणे !---
स्वप्न हा मथळा द्यावासा वाटला
आणि म्हणून
तोच त्यांच्या माथी ठेविला !

---

माधवपूर वडगांव ११/८/१९६६

**११४). म्हणवितो मानव!**

---

माशी इथे गुणगुण करी ---

ती  गेंगाणी गुणगुण करो;
परि   येऊनी तोंडावरी
बसते दरिद्री ,ती मरो!.....

हाती प्रवाह  सळाळतो;
ठायीच हात परी लुळा !
मन चिळसते नि शहारते...,...
हातास व्याप हवेतला !

उठते ,पुन्हा गंगाणूनी ----
बसते.... असे हे चालते......
----- बसते पुन्हा तोंडावरी!
मन थक्क पहात राहते........

---

७/४/१९५५ -मा.वडगांव

## **११५) अरे, ते द्यायचे होते -**

---

असा अन्याय का केला ? - गुन्हा मी कोणता केला?
दिले तू पंख झेपाया , लुळे हे ठेविले का ग ?
निळ्याचे वेड लावियले कशाला आणखी वरती ?
मुठीइवल्या उरी स्फुरणे कासया ही नभाइतुकी?
दिली औदार्य दावुनिया देणगी दोन डोळ्यांची
अधू ,दूबळी दिली दृष्टी दया देवा ,वदा कुठली ?
मला अभिमान तू दिधला परी का लादले दैन्य ?
दिशा दाहीहि हिंडुनिया फिटेना पाप लोचट हे !
सभोंती वाळवंटच हे जरी असते तरी पुरतें
दिखाऊ माळ देउनिया पिकाऊ मात्र ना केला!
फुलें ही एवढी माझ्या शरीरी हांसतीं फुलतीं
फळाचे नाव एकाही नसावे कोण हा कावा ?
कसा तू साधिला दावा ? दिला का सोबती हेवा?
अरे ,ते द्यायचे होते हांसणें या अशा दैवा !

---

२६/३/५५

---

## **११६) सांज टळताच -**

---

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो भुते:

**- गीता**

सांज ट़ळताच माझा ये दिस
जगाची पौर्णिमा माझी आवस
निशेचे दूत- कीटक !
माझ्या स्तुतीचे पाठक
आळवून गाणी कर्कश -राग
झोपेतून मला आणिती जाग !

गाण्यात नाही त्या बेगडी थाट
आलापांची नाही वा आडवाट
यातून जातसे उतां
नैसर्गिक आत्मीयता!
मनास तयांच्या पटे जेवढें
कंठातून सुटे तेंच तेवढें !

जगाचा राक्षसी पसारा होता
आहे तोही शांत झोपला आता
काही परी अवशेष
कण्हत कोठे बेहोष
त्यास झोपविण्यां घुबड येथे
जागत जागत अंगाई गाते

अरे जगाचा हा आजचा दीस
प्रगतीच्या पथी टाकी प्रकाश!
- केवढी भव्य प्रगती !
माझी कासवाची गति !!
असू द्या माझ्या या पायवाटेत
राज्य गाजवीत काळोखी रात!

सांज टळताच माझा ये दिस
जगाची पौर्णिमा माझी आवस !
निशेचे दूत- कीटक! -
माझ्या स्तुतीचे पाठक
आळवून गाणी कर्कश -राग
झोपेतून मला आणिती जाग ?

उठतो तेधवा केस पिंजून
माथे भडकून ऊर पेटून ,
कढत्या लाव्हा रसांनी
झट मुख प्रक्षाळुनी
भर्भर गिळतो आग -इंगळ
तेवढ्यात होते कामाची वेळ

लावून पाठीस कुऱ्हाड ,बर्ची
प्रखर करून धार धैर्याची
जगताच्या अनीतीची
पिशाच्चे युगायुगांची
चिरण्यांस जातो धावत पुढे.......
.......... परततो त्यांचे ऐकत रडे !!

सिंहावलोकंन होता करून
जगातून कानी ये आक्रंदन:
" भंगली नीतीची देवी
क्रांतिकारकाकरवी!"
ऐकत हेंलपे मी शर्वरीत
फरारी ,हवे ते -म्हणे जगत !!

सांज टाळताच माझा ये दिस
जगाची पुनव माझी आवस !
निशेचे दूत- कीटक !--
माझ्या स्तुतीचे पाठक
आळवून गाणी कर्कश- राग
झोपेतून मला आणिती जाग!

११डिसेंबर १९४५

### ११७) क्षितिजाच्या पलिकडून

क्षितिजाच्या पलिकडून
शीळ सखा वाजवितो
येथे परि हा विळखा
करकचून आवळतो

मन धूसर ढग बनते–
धूरापरि उंच उंच
पोकळीत विरु बघते
परि बंधन नच तुटते!

कुत्र्याचे एक पिलू
चिखलातच रुतरुतते !
नपुंसक तत्वल ठरते
मन माझे कळवळते!

पृथ्वीच्या बेंबीतुन
कस्तुरी नित दर्वळते;
परि पडसे दळभद्री
नाक चोंदुनी धरते!
शेण-किडे वळवळती
छे !;-विचकी शेण दात!.
—इतुका मी हा हतबल!
—आणु बघे नभ कवेत!!
—-----------------
२१/१/५५

**११८) – लोचन ओलावले!**

---

मरणाऱ्या या रात्रिच्या उरी मंद चंद्रमा जळे
सीमेवर तिष्ठल्या दिसाचे वेध असति लागले
अशाच रजनी कितीक गेल्या, दिवस कितीकहि सुने
सुनेच गेले ; शमली परि नच हृदयांमधली रणे

दारि न आली रात्र जीमधें मूर्त सुखें दाटली
वा ओलेती,– आनंदाच्या जान्हवीत नाहली!
वारा ,सेवक तिचा, न आला सामोरा होवुनी–
मम सौभाग्याची निश्वासिते ओंजळीत घेऊनी
अवसेच्या घन तमी कदाचित राया मम येइल
रात्र जागले म्हणुनि, सुखद परि वाजले न पाउल
पडेल त्याचे बिंब कदाचित पुनवेच्या गोलकी
खिळवुन बसले म्हणुनि नेत्र परि निराशाच येत की

दारि न आली उषा जींत मी हास्य मिळवु शकले
उभयींचे एकाच समयिं नच गालहि आरक्तले !
स्वप्ने सौख्यद प्रभातकाली अनन्त जी नाचली
त्यातिल मदिरा प्यावया परि प्रत्यक्ष न लाभली
विरल धुक्याच्या पटाआड मम असेल राया तरी–
नजर धावली ; समाधान परि बहरले न अन्तरी
भाट उषेचे वाऱ्यावरती स्वर-लहरी उधळिती
क्षणोक्षणी परि माझ्या ताना रुसुनी मंदावती

नको तोच तो अनुभव आजहि म्हणुनि शयनी रंगले
येणाऱ्याही दिवसाच्या नच स्वागतार्थ सज्जले !
आळस हृदयी तुडुंब भरता उठुनि दार उघडिले
चिरवांच्छित पद-चिन्हे बघुनी लोचन ओलावले!

---

३० डिसेंबर १९४५
—--------------------++--------------

## ११९). तरीहि का?

तुझिया वाणीत
वेदांचा विस्तार
तुझिया कानात
काव्याचा संभार

तुझिया डोळ्यात
फुलती कमळे
तुझिया ओठात
गुलाब दडले......

म्हणून बंधने
जगाची तोडून
यावेसे वाटले
सत्वर धावून

बेहोष होऊन
तुझिया ध्यासात
आलो मी सोत्कंठ
फाटका–पर्यंत

अनंत नेत्रांनी
फाटक खुणवी
माझिया श्रमांची
जाणीव दाखवी

असंख्य कानानी
चाहूल ऐकत
उभी हो प्रांगणी
वृक्षाली थाटांत

सहस्त्रो जिव्हानी
बागेत बोलत
पाण्याचा हा पाट
करतो स्वागत

पायरी पायरी
पाय हे झेलून
तालांत गातसे
रचिले कवन

निकटी येताच
चौकट फुलून
हालवी आपुले
मंगल तोरण

दगडभिंतीत
नाचती हृदये—
.......   .....
परंतु/तरीहि का व्हावे
मूक तू निर्दये?

---

२४जानेवारी १९४७

---

### १२०). तुझी थोरवी काय वर्णु मी?

---

तुझी थोरवी काय वर्णु मी ?
पुरी जाणतो उदारता तव!
जिथे शब्दरत्नाकर अपुरा
शब्दीं मम रचु कसा तुझा स्तव?
दाविलीस तू उदारता ती—!
म्हणुनी तर हा जगू शके मी !
नवीन आशा नव्या उमेदी—
नवी पालवी फुटली रोमी!
जेव्हा तव ऋणभार स्मरे मज
नतमस्तक मी नकळत होतो
मानाचा तुज मुजरा करुनी
आत्मा मम करभार अर्पितो !

उदारता तू किती दाविली
जाणीव न याची लंव तुजला:
मी जाणे ;—अन मीच एकटा —
पुनर्जन्म मज असे लाभला !
उणीवांसह ,चुकांसहित अन्
हृदी मला तू स्थान अर्पिलें
त्या हृदयाच्या सिंहासनि अन्
मानाने मज अभिषेकविले!
परंतु देवी अजूनही काही—
अजुनी काही असे मागणे
– मी स्वार्थी अति— लाज वाटते !—

सर्वस्व तुझे हिरावु जाणे!
जित्या जिवाची खोड असे ही!—
मेल्यानंतर तरि जाते का?—
स्वैर पुन्हा मी जगू इच्छितो
स्मरू इच्छितो मागील चुका!
मागील स्मृती शिळी शिते ती —
पुन्हा पुन्हा मी चघळू बघतो
तुझि शिवसुंदरसत्य बंधने
तुला दुखावुनी झुगारु बघतो !
आणि सर्व हे करावयाला
तुझी अनुमती हवी असे मज!
तुझी अनुज्ञा : तुझी अनुमती
ती "हक्कांची सनद" गमे मज!
आणि अनुमति ही देताना
लेशहि ना तू खिन्न बनावे
हासत ,हासत प्रसन्न वदने
कौतुक माझे करीत जावे !

निर्लज्जपणे तुझ्यापासुनी
चांगुणेपरी त्याग इच्छितो
पहिल्या बाजीरावापरि मी
'मस्तानीचे ' दान मागतो
दोष मागणीमधला माझ्या
मला स्पष्टतर दिसतो देवी!
तरि माझ्यांमधले 'माझेपण '
बरगडीत मज टांच लगावी !
अन माझे 'मीपण ' विसरून मी
अर्थपूर्ण वद कसे जगावे ?
'मीपण 'जाता वजा जीवनी
शून्य –बाकिविण काय उरावे?
' कला' जीवाची शपथ आमुच्या
कलेस बंधन सदा वावडें
शिवसुंदरसत्याचे झाले —
तरी ते बंधन!— विचित्र कोडे !

उदार तू तर; उदार –तर हो!
एरव्ही तसा प्रसन्न मी तर !
प्रसन्न –तर मज करण्यासाठी
दिव्य कराया बघ जमले तर !

दुरावेन मी तुझ्यापासुनी
भिती अशी ही घेते चावे?
निकट तुझ्या मी ; निकट –तर तुझ्या
का नच यावे ? कुणि सांगावे?